म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा
दा. क्र. २१५४
BVBK-0402154

नेहमीचा प्रकार झाला होता. काही यवन सुलतानांनी हिंदूवर करही बसवला होता.

तीनशे वर्षांच्या पारतंत्र्यामुळे हिंदूंची लाचारी फोफावली. त्यांची मने मरून गेली. गुलामी कटू वाटेनाशी झाली. जी जुनी क्षत्रिय घराणी महाराष्ट्रात होती त्यांपैकी बहुतेकांचा स्वाभिमान मेला होता. ते मुसलमानी सत्तेचे वतनदार नोकर बनले. त्यात त्यांना कमीपणा वाटेनासा झाला. उलट त्यात त्यांना भूषण वाटे! ते एकमेकांचा मत्सर करत त्यामुळे त्यांचे आपापसात अही-नकुलाप्रमाणे वैर असे; परिणामी ते एकमेकांचा जीवही घेत. आपापसांतील वैर परकी यवन राजांच्या हिताचेच होते. त्यामुळे त्यांना महाराष्ट्रात, नव्हे भारतात, आपले राज्य सहज पसरवता आले दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ होतो हे प्रसिद्ध आहे परंतु त्यापासून भारतियांनी कधीच धडा घेतला नाही! आपसातली दुही हा भारतियांना जुना शाप आहे असे वाटते. त्यामुळे परकी सत्तेला ह्या देशात नेहमी आपला प्रवेश सहज करता आला. कोणत्याही देशातील ऐक्याशिवाय राष्ट्र परचक्रापासून टिकू शकत नाही हा धडा शिकणे आपणास जरुर आहे.

जवळ जवळ तीनशे वर्षे वरीलप्रमाणे हालअपेष्टात महाराष्ट्रातील जनतेने काढली. तिची सर्व दृष्टीने दीन व केविलवाणी दशा झाली होती. कोण आपणास तारणारा मिळतो काय ह्याकडे आशेने ती पाहात होती, देवाला आळवत होती. अखेर देवाला परकी राक्षसांचा राग आला की दुःखी लोकांची कीव आली कोण जाणे? आशेचा किरण एक दिवशी महाराष्ट्रावर पडला व शिवरायासारखे अद्वितीय नररत्न अवतरले!

## शिवाजींचा जन्म व त्यांचे बालपण

महाराष्ट्रातल्या 'वेरुळ' गावी 'भोसले' नावाचे घराणे होते. त्या घराण्यातले लोक आपण श्रीरामाच्या व राजपुतान्यातला 'शिसोदे' वंशाचे आहोत असे समजत. ते धार्मिक वृत्तीचे होते, साधूसंतांना व गाई ब्राह्मणांना पूज्य मानत. ह्या घराण्यातच शिवाजींचा जन्म १९ फेब्रुवारी (शुक्रवार) सन १६३० रोजी झाला. या जन्मतारखेसंबंधी जाणत्या लोकात दुमत आहे काही सन १६२७ तर इतर १६३० साल मानतात. बहुमताला आता ही तारीख मान्य झाली आहे. **हिंदू पंचांगाप्रमाणे हा दिवस फाल्गुन वद्य तृतीया, शके १५५१** होता. शिवाजींच्या वडिलांचे नाव 'शहाजी' व आईचे नाव 'जिजाबाई' होते. जिजाबाई वऱ्हाडातल्या 'शिदखेड'च्या 'लुखजी जाधवरावां'ची मुलगी.

लुखजी निजामाकडे नोकरीस होते. सुरवातीस त्यांना पंचहजारी मनसदारी होती. त्यांच्या घराण्यात शिदखेडची पाटीलकीही होती. त्यामुळे त्याचे



BVBK-0402154

घराणं प्रतिष्ठित समजले जाई. जाधव व भोसले ह्यांचे दूरचे पूर्वीचे नातेही होते. शहाजींचे भोसले घराणेही वेरूळचे सुखवस्तू समजले जाई. त्यांचे वडिलापासून निझामाकडून दीड हजारी मनसबदारी मिळाली होती. शिवाय वेरूळची पाटीलकी व पुणे सुपे परगण्यातली जहागीरही त्या आधीची होती. शहाजी वडिलाप्रमाणेच शूर होते. त्यामुळे त्यांना 'राजा' ही पदवी निझामाकडून मिळाली होती. अनेक वर्षे निझामाकडे ते सरदार होते. अखेरीस ते तेथले मुख्य वझीरही झाले. खरे म्हणजे त्यांना मुसलमान राजांची नोकरी करणे आवडत नव्हते. ते महत्वाकांक्षी व मानी होते. त्यांनी पुणे सुपे जहागिरीच्या भागात निझामाच्या नावाखाली स्वतंत्र राज्य स्थापण्याचा एकदा प्रयत्न केला होता. पण आजूबाजूच्या शूर मराठे घराण्यांनी मदत न केल्यामुळे तो फसला! निरुपायाने त्यांना नोकरी करावी लागली. शहाजीचे वडिल मालोजी व लुखजी एकमेकांना परिचित होते हे स्पष्ट आहे. त्यामुळे शहाजी व जिजाबाईंचा विवाह जाधवराव व मालोजी ह्यांच्या पसंतीने पार पडला होता.

शिवाजींचे वेळी जिजाबाई गरोदर असताना शहाजींना, निझामाविरुद्ध मोगलांनी केलेल्या स्वारीमुळे बाल निझामाला घेऊन माहुलीचे किल्ल्यात जाऊन राहावे लागले त्यावेळी जिजाबाईही बरोबर होत्या. ह्यावेळी जाधवराव मोगलातर्फे लढत होते. त्यांनी निझामाच्या आईला फितूर केल्यामुळे, शहाजींना वाईट वाटले त्यांनी निझामाला सोडले व ते फलटणकडे गेले. वाटेत जिजाबाईंना शिवनेरी किल्ल्यात ठेवले. शिवनेरी पुण्याच्या उत्तरेस 'जुन्नर' गावाजवळ आहे. तेथेच शिवाजींचा जन्म झाला. शिवनेरी किल्ला सह्याद्री पर्वताच्या रांगामुळे सुरक्षित होता. त्यामुळे शहाजींनी जिजाबाईंना गरोदर अवस्थेत ह्या ठिकाणी ठेवले असावे शिवाय, हा किल्ला शहाजींच्या जहागिरीत होता. त्या काळांत आदिलशाह व निझाम ह्यांच्या एकमेकाविरुद्ध स्वाऱ्यांचा धुमाकूळ चालू होता व शहाजींना घरापासून दूर कामगिरीवर बरेच दिवस राहावे लागे. म्हणून जिजाबाईंना सुरक्षित ठिकाणी ठेवणे भाग होते. शिवनेरीवर 'शिवाई' देवीचे पुरातन मंदिर आहे. तिच्या कृपेने मुलगा झाला अशा भावनेने त्याचे शिवाजी नाव जिजाबाईंनी ठेवले. जिजाबाईंना मुलगा झाल्यामुळे जहागिरीतल्या लोकांना सहाजिकच आनंद झाला. त्यावेळी शहाजी कामगिरीवर होते. काही दिवसानंतर सवड झाल्यावर ते घरी परतले. जिजाबाईंना आनंद झाला. शहाजींनी मोठ्या प्रेमाने पुत्राला पाहिले. त्यांचे मन प्रेमाने सहाजिकच भरून आले. त्यांनी हत्तींपासून रत्नांपर्यंत अनेक दाने दिली! सर्वत्र आनंदी आनंद पसरला. नंतर लवकरच शहाजींना पुन: कामगिरीवर जावे लागले.

शिवाजी दिवसेदिवस चंद्रकोरीप्रमाणे वाढत होता. त्यांना योग्य वळण लावण्याच्या दृष्टीने जिजामातेचे त्यांच्याकडे सतत लक्ष होते. पित्याच्या अनुपस्थितीत माता ह्या नात्याने याबाबतीत त्यांच्यावर मोठी जबाबदारी होती. तो पार पाडण्यास जिजाबाई समर्थही होत्या. त्या स्वाभिमानी व महत्त्वाकांक्षी होत्या. धार्मिक वृत्तीच्याही होत्या. त्यांना रामायण, महाभारत, पांडवप्रताप वगैरे ग्रंथातल्या कथा ऐकणे आवडे. गोब्राह्मणांना त्या फार मानत. हिंदूंच्या देवतांची, देवळांची व पवित्र ठिकाणांची मुसलमानांचेकडून रोज होणारी विटंबना पाहून त्यांना फार दु:ख होई. अडचणीचा फायदा घेऊन जबरदस्तीने केले जाणारे हिंदूंचे धर्मांतर, स्त्रियांचे होणारे अपहरण पाहून तर त्यांचा राग अनावर होई. अशा असहाय्य स्थितीतून हिंदूंची मुक्तता करण्याकरता स्वतंत्र हिंदू राजा निर्माण झाला पाहिजे असे त्यांना फार वाटत होते. ह्या दृष्टीने शिवाजीना वळण लावायचा निश्चय त्यांनी केला.

जिजाबाई देवदर्शनाला जात तेव्हा शिवबाला बरोबर जरूर घेऊन जात. हेतू हा की देवाधर्माबद्दल श्रद्धा व आस्था त्याच्या मनात रुजावी. पुराणातल्या वीरांच्या (जसे राम, कृष्ण, अर्जून, भीम वगैरे) पराक्रमांच्या कथा त्याला ऐकवत. मातेच्या अशा प्रयत्नांचा परिणाम योग्य व इष्ट असाच झाला. शिवाजींच्या बालमनात देव, धर्म साधूसंत, पवित्र गोष्टी यांच्याबद्दल आदर उत्पन्न झाला, वीर वृत्ती जोपासली गेली, दयाबुद्धी वाढीला लागली. याउलट, हिंदंवर होणारे अत्याचार, देवतांची होणारी विटंबना, निष्कारण होणारी गोहत्त्या, हिंदू स्त्रियांचे वारंवार होणारे अपहरण वगैरे गोष्टी पाहून त्यांच्या मनात यवनांच्याबद्दल तिरस्कार व चीड उत्पन्न झाली. जिजामातेंच्या देखरेखीखाली अशा प्रकारे शिवाजी राजांची घडण होत होती.

काही वर्षांनी घराबाहेर खेळण्याइतके मोठे झाल्यावर, आजूबाजूची मुले शिवबा गोळा करी. या मुलांना घेऊन तो जे खेळ खेळत असे ते सूचक होते. शिवबा त्यांना मातीचे ढीग करायला लावे, त्यांना 'गड' समजून त्यावर लुटुपुटूचे राज्य स्थापन करे. त्या राज्याच्या रक्षणाकरता मुलांचे दोन गट केले जात व त्यांच्यात लुटुपुटूचीच 'लढाई' होई. शिवबाचा असा खेळ पाहून जिजामातेला कौतुक व समाधान वाटे.

सन १६३५ मध्ये निझामाचे राज्य अखेरीस बुडाले. मोगल व अदिलशाह ह्यांच्यापासून ते वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न शहाजीराजांनी मुख्य वझीर ह्या नात्याने केला पण यश आले नाही. म्हणून त्यांना अदिलशहाची नोकरी करणे भाग पडले. अदिलशहाने त्यांना दूर कर्नाटकात 'बंगळूर'कडे (आतांचे बंगलोर)

कामगिरीवर पाठवले. शहाजी सन १६३७ त तिकडे गेले. त्यांच्याबरोबर दुसरी पत्नी तुकाबाई व शिवाजीपेक्षा मोठे पुत्र संभाजीही तिकडे गेले.

बंगळूरकडे जाण्यापूर्वी जिजाबाई व शिवाजी ह्यांना पुण्यास पाठविण्याचे शहाजींनी ठरवले. कारण पुणे हे त्यांच्या जहागिरीतच होते त्यामुळे त्यांचाच अधिकार तेथे चालत होता. शिवाय जहागिरीवर लक्ष ठेवणारे व तेथील कारभार नीट पाहाणारे कोणी शहाजींच्या गैरहजेरीत तेथे असणे जरूर होते. शहाजींनी दादोजी कोंडदेव नावाच्या आपल्या जुन्या, एकनिष्ठ व हुषार स्नेह्याला जिजाबाई व शिवाजी त्यांचेबरोबर पुण्यास ठेवण्याचे ठरवले. दादोजींना कारभाराचा अनुभवही होता. दादोजी सन १६३७ त जिजाबाईंना व शिवाजींना घेऊन पुण्यास आले. काही वर्षांपूर्वीच मोगली फौजांनी पुण्यातली देवळे, इमारती वगैरे सर्व उध्वस्त केले होते त्यामुळे दादोजींनी जिजाबाई व शिवाजी ह्यांना राहाण्यासाठी नवा वाडा बांधला. त्याचे नाव लालमहाल ठेवले. त्यांनी जवळच एक बाजार पेठ वसवली. पडलेली देवळे व वाडे पुन: बांधवले.

दादोजींचा शहाजी भोसल्यांशी घनिष्ट संबंध होता. तेही निझामशाहीत एका गावचे कुळकर्णी व कोंडाण्याचे किल्लेदार होते. ते इमानदार व कष्टाळू होते. त्यांनी भोसले घराण्याला आपले इमान पूर्णपणे वाहिले होते. जिजाबाईही त्यांच्या वरील गुणांमुळे व वयामुळे त्यांना मान देत. दादोजींचे शिवाजीवरही फार प्रेम होते. त्यांनी शिवाजींच्या शिक्षणाची योग्य व्यवस्था केली. शिवाजी थोडे मोठे झाल्यावर, त्यांनाही जहागिरीच्या कारभाराची माहिती व्हावी म्हणून दादोजी, कामे करताना, त्यांना बरोबर ठेवत. पुढे पुढे दादोजींनी शिवाजींच्या नावानेच कारभार करायला सुरवात केली. शिवाजींची बुद्धी तल्लख व निरीक्षण सूक्ष्म असल्यामुळे त्यांना कारभाराची बरीच माहिती लवकर झाली.

कारभाराच्या शिक्षणाबरोबर, शारीरिक व्यायाम व मर्दानी खेळ यांचेही शिक्षण देण्याची व्यवस्था दादोजींनी केली होती. अशा खेळात घोड्यावर बसणे, तलवारीचे वार करणे, भाला फेकणे, निशाणबाजी करणे दऱ्या खोऱ्यांतून संचार करणे, कुस्ती खेळणे वगैरेंचा समावेश होता. एकंदरीत शिवाजींना सर्व प्रकारचे शिक्षण दादोजींच्या व जिजामातेच्या देखरेखीखाली मिळाले होते.

दादोजींनी जहागिरीचीही पुष्कळ सुधारणा केली होती. चोरांना व बदमाश लोकाना जरब बसवून शांतता स्थापन केली. रानटी जनावरांचा गावात सुळसुळाट नाहीसा केला. पाटील, कुळकर्णी वगैरेंच्या तक्रारी ऐकून त्यांना न्याय दिला. शेतकऱ्यांना शेतीत उत्तेजन दिले. त्यामुळे जहागिरीचे उत्पन्न वाढून लोकांना खाण्यास भरपूर धान्य झाले. व्यापारालाही उत्तेजन दिले. उध्वस्त

झालेल्या देवस्थानांचा उद्धार त्यांनी व जिजाबाईंनी करवला शेतसाऱ्यांची न्याय्य पद्धत ठरवून दिली. अशा तऱ्हेने उध्वस्त झालेली जहागीर दादोजींनी पुनः उत्तम स्थितीस आणली.

## शिवाजींचा विवाह

शिवाजी दहा वर्षांचे झाले होते. त्या काळच्या रितीनुसार त्यांचे लग्नाचे वय झाले होते. या दृष्टीने जिजामातुश्री त्यांचेसाठी योग्य मुली न्याहाळत होत्या. अशी एक मुलगी त्यांच्या दृष्टीत आली. पुण्याजवळच 'फलटण' गावी निंबाळकर नावाचे माहितीतले घराणे होते. त्यांची सई नावाची मुलगी पसंत होऊन तिच्याशी सन १६४० त शिवाजींचे लग्न थाटात पार पडले. शहाजी ह्यावेळी बंगळूरास कामगिरीवर असल्यामुळे, ते लग्नासाठी पुण्यास येऊ शकले



मातृभक्त शिवाजी

नाही. तथापि त्यांनी आपले हार्दिक आशीर्वाद शिवाजीकडे पोचते केले. जिजामातेने व दादोजींनी काही कमी पडू दिले नाही; शहाजींच्या अनुपस्थितीची जाणीवही होऊ दिली नाही.

ह्यानंतर चार वर्षे गेली. शिवाजी, जिजाबाई व नवीन सून ह्यांना भेटण्याची फार इच्छा शहाजींना झाली. त्याप्रमाणे त्यांना घेऊन बंगळूरला येण्याबद्दल दादोजींना त्यांनी कळवले. त्याप्रमाणे दादोजी सर्वांना घेऊन गेले. बरेच वर्षांनंतर पत्नी व पुत्र ह्यांना भेटून शहाजींना अति आनंद झाला. जिजाबाईंनाही पती भेटीमुळे आनंद झाला हे सांगणे नकोच. शिवाजींनी तर चांगले समजायला लागल्यानंतर बरेच दिवसांनी वडिलांना पाहिले तेव्हा त्यांनाही आनंद वाटणारच. धाकटया राणीसाहेब 'तुकाबाई', त्यांचा मुलगा एकोजी उर्फ

व्यंकोजी, शिवाजींचे वडील बंधू संभाजी तेथे होते. त्या सर्वांच्या भेटीमुळे एक-मेकांना संतोष वाटला. विशेषतः शिवबाची मधल्या काळात झालेली सर्वांगीण प्रगती पाहून शहाजींना समाधान वाटले.

शिवाजींच्या लग्नात शहाजी उपस्थित राहू शकले नव्हते. म्हणून की काय त्यांनी शिवाजींचे आणखी एक लग्न मोहिते घराण्यातल्या सोयराबाई नावाच्या मुलीशी लावले. त्या काळात राजे लोकांची एकापेक्षा अधिक लग्ने होत. हेही लग्न शहाजींच्या हौशीप्रमाणे बंगळूरात थाटात पार पडले.

काही दिवसानंतर दादोजी सर्व मंडळीसह पुण्यास परतले. परतताना, शिवाजींना जहागिरीचा जवळ जवळ राजा करूनच, अष्टप्रधानांसह व ध्वजासह, शहाजीराजांनी पुण्यास पाठवणी केली. शामराव निळकंठ रांजेकर ह्यांना मुख्य प्रधानपद दिले. इतरांना सरनोबत, मुजुमदार, डबीर अशी पदे दिली. ही सर्व मंडळी अनुभवी होती. काही हत्ती, घोडे व खजिनाही दिला.

जहागिरीचा कारभार उत्तम रीतीने दादोजींनी ठेवला होता. त्यांनी तिची पुष्कळ सुधारणाही केलो होती. त्याबद्दल शहाजींनी सर्व माहिती करून घेतली. दादोजींचो ही सर्व कामगिरी पाहून शहाजी बेहद्द खूप झाले. त्यांनी दादोजींची खूप तारीफ तर केलीच पण त्यांना उत्कृष्ट कामगिरीबद्दल योग्य मोबदलाही दिला.

## मावळ प्रदेशात

शिवाजीराजे पुण्यास परतल्यावर त्यांचा पूर्वीप्रमाणे कार्यक्रम सुरू झाला. लालमहाल पुनः गजबजला लोकांच्या वर्दळीने तो जणू पुनः सजीव झाला. पुण्याच्या भोवतालच्या प्रदेशांत दोन डोंगरामधल्या खोऱ्याच्या भागाला 'मावळ' म्हणतात. पुण्याच्या भागात बारा व जुन्नरच्या भागात बारा अशी चोवीस मावळे होती. मावळात राहणाऱ्या लोकांना मावळे म्हणत. ते प्रामाणिक, काटक, मेहनती व शूर होते. वेळ पडल्यास जीव देण्यासही ते मागे पुढे पाहाणारे नव्हते. मावळ्यांच्या ह्या गुणांचा उपयोग चांगल्या कामासाठी करून घेणारा दूरदर्शी पुढारी आतापर्यंत मिळाला नव्हता. शिवाजी राजांच्या रूपाने तो जन्मास आला. त्यांनी मावळ्यांतील गुण पूर्णपणे हेरले व त्यांचा उपयोग स्वराज्य स्थापनेच्या कामासाठी करून घेण्याचे ठरवले.

महाराष्ट्राला सह्याद्री पर्वत हे एक निसर्गाने दिलेले अमोल लेणे आहे. त्याच्या उंच व दाट जंगलांनी झाकलेल्या टेकड्यांच्या रांगांनी पश्चिम महाराष्ट्राची दक्षिणोत्तर पट्टी व्यापलेली आहे. ह्या जंगलात नाना प्रकारचे उपयोगी वृक्ष आहेत, वेलीही आहेत. हिरव्यागार वृक्षांच्यामुळे डोळे सुखावून जातात,

भरपूर पाऊस मिळतो व सृष्टी सौंदर्यांत भर पडते. सह्याद्रीच्या कुशीतून अनेक लहान मोठे पाण्याचे झरे जन्माला आले आहेत. उंच पर्वतावरून दऱ्यांकडे धाव घेणारे हे शुभ्र जलौघ पाहाणाऱ्याचे मन मोहून टाकतात. त्यांपैकी काहींचे रूपांतर पुढे 'कृष्णा', 'गोदावरी' 'भीमा' वगैरे सारख्या पवित्र नद्यात झाले आहे. अनेक मावळ्यांचे पोट ह्यापैकी काही वृक्षांच्या फळांवर चालते. शिवाजी राजांच्या पुढील आयुष्यातल्या धाडशी उद्योगांना संरक्षण ह्या पर्वतराजीनेच दिलेले आहे. ज्या किल्ल्यांच्या आधाराने त्यांना स्वतंत्र राज्य स्थापता आले त्यांपैकी बहुतेक सह्याद्रीच्या उंच शिखरावरच बांधलेले आहेत. सहाजिकच महाराष्ट्रास ह्या गिरिराजाचा मोठा अभिमान वाटतो.

पुण्याजवळील मावळात जे देशमुख होते त्यांची आपल्या वतनांवरून आपापसात भांडणे होत. ती इतकी विकोपाला जात की ते एकमेकांचे कधीकधी प्राणही घेत. ह्या देशमुखांचे त्यांच्या प्रदेशांत बरेच वजन होते. त्यांचा उपयोग स्वराज्याच्या कामासाठी करून घेतला पाहिजे हे चाणाक्ष दादोजींनी ओळखले. त्यांचेपैकी 'कान्होजी जेथे' व 'बाजी फासलकर' हे सज्जन होते. कान्होजी शहाजीचे बरोबर पूर्वीपासूनच होते. फासलकरांना दादोजींनी शिवाजींच्या बाजूस वळवून घेतले. हळू हळू साम, दाम, दंड, भेद ह्या मार्गांचा उपयोग करून त्यांनी इतर देशमुखांनाही स्वराज्याच्या कार्यात सहभागी करून घेतले. दादोजींचेबरोबर शिवाजीराजे मावळात हिंडत तेव्हा देशमुखांच्या मुलांचा परिचय होई. राजांनी त्या मुलांना लवकरच आपलेसे करून घेतले. ते त्यांच्याशी इतक्या जिव्हाळ्याने वागत, त्यांच्या सुखदुःखांची चौकशी करत की राजांचेवर त्यांचा जीव जडत असे. हे आपलेच राजे आहेत ही भावना दृढमूल होई. राजांच्या अशा सवंगड्यांपैकीच तान्हाजी मालूसरे, बाजीप्रभू देशपांडे, मुरारबाजी देशपांडे, बाजी जधे, येसाजी कंक वगैरे होते. स्वराज्याच्या कार्यात ही माणसे पुढे अखरपर्यंत कामास आली हे दिसून येईल.

राजे मुलांना वाड्यात खेळावयास बोलवत. जिजा माताही त्यांना प्रेमाने वागवत, त्यांची विचारपूस करत. एके दिवशी खेळता खेळता राजे त्यांना म्हणाले. "महाराष्ट्रात श्रीचे राज्य व्हावे अशी ईश्वरी इच्छा दिसते." अर्थात हे राज्य म्हणजे हिंदूंचे. देवाचे. धर्माला, साधूसताना संरक्षण देणारे राज्य होय. राजांच्या वरील बोलण्याने सवंगड्याच्या मनांची पक्की पकड घेतली. पुण्याभोवतालच्या किल्ल्यांची व अदिलशाहाच्या मुलखांतील चोरवाटांची माहिती मिळवण्यास त्यांनी सुरवात केली. काही दिवस अशा उद्योगात गेले. एके दिवशी शिवाजींनी जवळ असलेल्या रोहिडेश्वराच्या मंदिरात आपल्या सहकाऱ्यांसह स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली !

## स्वराज्याचे तोरण बांधले

शिवाजीराजांच्या व त्यांच्या सहकाऱ्यांच्या वरील चळवळी हळू हळू वाढल्या. ही मित्रमंडळी स्वराज्याची स्थापना करण्यास आता आतुर झाली. त्या काळात महाराष्ट्रात तरी किल्ल्यांना फार महत्त्व होते. त्यांच्या आश्रयानेच प्रदेशाचे शत्रूच्या आक्रमणांपासून संरक्षण करणे शक्य होते. त्यातच लढाईची सामुग्री तसेच धनधान्यही साठवून ठेवता येई. त्यांच्याच जोरावर शत्रूशी अनेक दिवस लढता येऊ शके. म्हणून किल्ला हे शक्तिकेंद्रच होते. ह्या दृष्टीने शत्रूंचा एकादा तरी किल्ला प्रथम आपल्या ताब्यात घेतला पाहिजे असे शिवाजीराजांना वाटले. जवळच आदिलशाहाच्या हद्दीतला तोरणा नावाचा एक किल्ला होता. त्याच्याकडे आदिलशाहाचे बरेच दिवसांपासून बिलकुल लक्ष नव्हते. राजांनी ओळखले की तो विशेष मेहनत न करता ताब्यात घेता येईल. एके दिवशी शिवाजीराजे व त्यांचे सहकारी ह्यांनी तोरणा किल्ल्यात प्रवेश केला! हे सन १६४६ साल होते. किल्ल्यावर स्वराज्याचे भगव्या रंगाचे निशाण चढवण्यात आले. साडेतीनशे वर्षांच्या पारतंत्र्यानंतर स्वातंत्र्याचा व स्वराज्याचा पहिला सुदिन महाराष्ट्रात उगवला! स्वराज्याचे तोरण राजांनी जणू तोरणा किल्ला घेऊन त्या दिवशी बांधले. हिंदूंना हा दिवस किती आनंदाचा वाटला असेल! पुढील मराठी साम्राज्याचा पाया भरण्याचा आरंभच आज केला गेला असे म्हणता येईल.

तोरण्याचे तट पडलेले होते. त्यांची दुरुस्ती राजांनी हळूहळू करवली, किल्ल्यावर मावळ्यांचे पहारे बसवले, किल्लेदार नेमला व किल्ल्याच्या इतर देखरेखीची व्यवस्था केली. दुरुस्तीचे काम चालू असताना एक चमत्कार घडला. धनाने भरलेला हांडा जमिनीत सापडला! भवानी देवी पावली व स्वराज्याचा हा शुभशकूनच झाला असे राजांना वाटले. हे सर्व धन त्यांनी स्वराज्याच्या वाढीसाठी खर्च करायचे ठरवले. तोरणा किल्ल्याच्या जवळच आदिलशाहाचाच एक दुसरा अर्धवट पडलेला किल्ला होता. तोही राजांनी लवकरच आपल्या ताब्यात घेतला. त्याचे नाव राजगड ठेवले. शिवाजीराजांनी तेथे आपली राजधानी करण्याचे ठरवले व राजधानीला शोभेल अशी सुधारणा करण्यास सुरुवात केली.

मावळ प्रदेशाचा सरकारी वसूल विजापूरकरांकडे म्हणजे आदिलशहाकडे पूर्वी जात असे. लोक तो आता शिवाजींना देऊ लागले. ह्याचा अर्थ असा होता की लोक आता आदिलशाहाच्या जागी शिवाजींना 'राजा' मानू लागले. ही फार महत्त्वाची मानसिक क्रांती होती; कारण बरेच दिवस काही वतनदार शिवाजींना आपला राजा मानायला तयार नव्हते. ह्या संबंधात दादोजी कोंडदेवांना बरेच प्रयास करावे लागले होते. लोकांची निष्ठा एकदम बदलत नसते, विशेषता

वतनदारांची व श्रीमंत लोकांची ती बदलवण्यासाठी दादोजींनी कधी गोड बोलण्याचा तर कधी भीती दाखवण्याचा प्रयोग केला होता. त्यांचे हे कार्य वरवर दिसत नव्हते पण फार मोलाचे होते.

ह्या वेळी राजांचे वय केवळ सोळा वर्षांचेच होते. आज आपण पाहतो की इतक्या लहान वयात साध्या संकटालाही तोंड देणे तरुणांना सामान्यपणे जमत नाही. शिवाजी राजांनी भोवताली पसरलेल्या बलाढ्य यावनी सत्तांची पर्वा न करता, स्वराज्य स्थापनेचा धाडसी प्रयत्न ह्या लहान वयात केला व तो पुढे यशस्वी करून दाखवला ! ही अद्वितीय गोष्ट नव्हे काय ? जेथे मुसलमानांच्या विरुद्ध एक शब्दही बोलायला कोणी धजत नव्हते; अधिक लोक त्यांची थुंकी झेलण्यात धन्यता मानत व आपला फायदा करून घेण्यासाठी त्यांचा धर्म घेण्यात ही त्यांचे मन कचरत नव्हते, तेथे शिवाजी राजांनी स्वातंत्र्याचा झेंडा फडकवला ! हे अद्वितीय धाडस नव्हे काय ? हे धाडस पाहून जिजामातेला आनंद झाला हे सांगणे नकोच.

## दादोजी कोंडदेवांचा मृत्यु

तोरणा व राजगड किल्ले घेतल्यानंतर लवकरच आदिलशाहाचे 'कोंडाणा' म्हणजेच 'सिंहगड' व 'सुभानमंगळ' हे किल्लेही शिवाजी राजांनी हस्तगत केले. कोंडाणा फार कठीण जागी वसलेला किल्ला होता.

मध्यंतरीच्या काळात सन १६४७ मध्ये दादोजी कोंडदेव वारले. ते म्हातारपणामुळे थकले होते. मरण्यापूर्वी त्यांनी आपल्या मुलास शिवाजीराजांचे स्वाधीन केले. दादोजींचे राजांचे वर मन:पूर्वक प्रेम होते, एकनिष्ठ सेवक व सल्लागार ह्या नात्याने त्यांनी शहाजीराजे व शिवाजीराजे ह्यांच्याशी पूर्ण सहकार्य केले होते. स्वराज्याचा पाया मजबूत करण्यात त्यांचा फार मोठा वाटा होता. मरणसमयी त्यांनी शिवाजीराजांना पुढील जिव्हाळ्याचा उपदेश केला. "वडिलीं वाढवलीं माणसें, मुलुख, द्रव्य आम्ही जतन केले. आता पुढे साहेब खावंद आहेत सर्व पाहून जतन करावे." दादोजी शिवाजी राजांना वडिलांचे जागी होते. त्यांनी राजांना वडिलांची माया पूर्णपणे देण्यात काही कमी केले नव्हते. राज्य कारभाराच्या संबंधात जितके शिकवता आले तितके शिकवले. रोजच्या व्यवहारातही कसे चातुर्याने वागावे व माणसांची पारख कशी करावी, जी आपल्या कामाची असतील त्यांची पारख करून त्यांना आपल्याकडे आकर्षित करून कसे ठेवावे वगैरे गोष्टींची शिदोरी राजांना भरपूर दिली होती. दादोजींचे राजांना मनापासून पूर्ण सहकार्य होते.

दादोजींच्या मृत्यूमुळे आपला पायाखालचा एक मोठा आधार गेला असे राजांना सहाजिकच वाटले. असे जरी वाटले तरी स्वराज्याचा गाडा अडण्याचे

कारण नव्हते. शिवाजी स्वत: बुद्धिवान, धाडसी, समतोल विचार करणारे, कनवाळू कुशल संघटक असे स्वयंभू राजपुरुष असल्यामुळे, व आतापर्यंत पुरेसे बरेच शिक्षण मिळाल्यामुळे, गाड्याचो वाटचाल अबाधित चालू राहिली. शिवाय, जिजामातुश्रींचा राजांना मोठा आधार होताच. शहाजीराजांनी बंगळूरहून मागे शिवाजींचे बरोबर पाठवलेलो अनुभवी माणसे होतीच. त्यामुळे स्वराज्याचा वृक्ष उत्तरोत्तर फोफावत गेला.


शिवाजीने आपले काही किल्ले घेतले आहेत व मावळातले बरेच लोक सरकारी वसूल आता आपणास न देता शिवाजीला देतात ह्या गोष्टी आदिलशाहाच्या कानापर्यंत पोचल्या. त्यांचेकडे प्रथम त्याने विशेष लक्ष दिले नाही पण पुढे त्याने कारवाई करायचे ठरवले. त्याने 'मुस्तफाखान' नावाच्या आपल्या सरदारास शहाजींना कपटाने पकडून आणण्यासाठी कर्नाटकात पाठवले. खानाबरोबर बरेच सैन्यही दिले. खानाने कर्नाटकांत जाऊन आपली छावणी शहाजींच्या छावणीपाशी टाकली.

त्याने आपला हेतू गुप्त ठेवला होता. एके रात्री खानाने शहाजींना आपल्या सैन्याकडून अचानक पकडले. ही गोष्ट २५ जुलै १६४८ मध्ये घडली. शहाजींच्या हाता पायात बेड्या ठोकून त्यांना विजापूरला आदिलशाहाकडे पाठवण्यात आले! ही कामगिरी बाजी घोरपडे व अफझलखान ह्यांनी केली. दोघेही शिवाजींचा फार द्वेष करणारे होते.

दुसरीकडे, शिवाजीराजांचा बंदोबस्त करण्यासाठी 'फत्तेखान' नावाच्या सरदारास आदिलशाहाने पाठवले. ही खबर राजांना आपल्या हेरांच्याकडून मिळाली होती. शहाजीराजांना कैद करुन विजापूरला पाठवल्याची बातमीही त्यांच्यापर्यंत पोचली होती. राजांचे समोर दोन संकटे एकाच वेळी आदिलशाहाने उभी केली होती. पण राजे संकटात डगमगणारे पुरुष नव्हते. हा त्यांचा विशेष गुण होता. त्यांनी एक नामी युक्ती योजली जवळच आदिलशाहाचा 'पुरंदर' नावाचा किल्ला होता. त्याचे गडकरी महादजी नाईक हिंदू होते. त्यांना शहाजींचेबद्दल फार आदर होता. शहाजींना कैद केलेले ऐकून नाईकांना राग आला. ह्याचा फायदा घेऊन राजांनी, फत्तेखानाशी लढण्याकरता पुरंदराचा आपणास उपयोग करू द्यावा अशी विनंती नाईकास केलो. ती त्यांनी मान्य केलो. नाईकांनी किल्ला, आतील लोकांसह, राजांच्या स्वाधीन केला. किल्ल्यामुळे खानाचा लढाईत पराभव झाला व त्यास परत जावे लागले. राजाचा 'बाजी पासलकर' नावाचा सहकारी मात्र ह्या लढाईत मारला गेला. ही घटना १६४८ साली घडली.

2948

ह्यानंतर शिवाजीराजांचे पुढे आपल्या वडिलांची कैदेतून सुटका कशी करायची हा कठीण प्रश्न होता. आदिलशाहाशी लढून सुटका करणे अशक्य होते, कारण शिवाजीराजांचे सैनिक बळ त्यावेळी क्षुल्लक होते. म्हणून त्यांनी एक राजकीय युक्ती योजून पाहाण्याचे ठरवले. त्या काळात दिल्लीचा मोगल बादशाह, अहमदनगरच्या निझामाचे व विजापूरच्या आदिलशाहाचे राज्य नष्ट करून, आपले साम्राज्य वाढविण्याच्या प्रयत्नात होता. ह्याचा फायदा घेऊन राजांनी बादशाहाला कळवले की शहाजीराजांची आदिलशाहाच्या कैदेतून सुटका करवल्यास आपण व वडील बादशाहाची नोकरी करण्यास तयार आहोत ही बातमी आदिलशाहापर्यंत पोचली व त्याला भीती वाटली की ह्या संधीचा लाभ घेऊन बादशाह कदाचित आपल्यावर स्वारी करेल. घाबरुन आदिलशाहाने शहाजींची लगेच सुटका केली ! मात्र सुटकेपूर्वी त्याने कोंडाणा किल्ला परत मागितला. शहाजींनी तो परत देण्याचे कबूल केले. कोंडाणा उर्फ सिंहगड परत करावा लागल्यामुळे शिवाजी राजांना राग आला व दुःखही झाले. कारण



प्रतापगड

कोंडाणा स्वराज्याच्या मध्यभागी होता शिवाय तो परत घेणे फार कठीण काम होते. वडिलांच्या सुटकेसाठी राजांना राग पोटात घालणे भाग होते.

## मोऱ्यांची जावळी काबीज

'सातारा' जिल्ह्यात 'महाबळेश्वर–वाई' जवळ 'जावळी नावाची, एक लहान जहागीर होती. ती मोरे घराण्याला आदिलशाहाकडून मिळालेली होती. जहागिरीच्या मोबदल्यात मोरे आदिलशाहाची नोकरी आठ पिढ्यापासून करत

होते. शाहाने मोऱ्यांना 'चंद्रराव' हा किताब दिला होता. जावळी जहागीर शिवाजी राजांच्या स्वराज्याला लागून होती. हा भाग डोंगराळ व जंगलाने व्यापलेला म्हणून महत्त्वाचा होता. शिवाजींची सहाजिकच इच्छा होती की मोरे आपल्यास अनुकूल असावेत परंतु स्वराज्यास विरोध करणारांपैकी मोरे प्रमुख होते. राजांनी त्यांना पुष्कळ समजावून पाहिले परंतु त्याचा बरेच दिवस उपयोग झाला नाही. काही दिवसांनी जावळीच्या गादीवर असलेला 'दौलतराव' मोरे मरण पावला. त्याला मुलगा नव्हता. दौलतरावाच्या बायकोला आता भीती वाटली. ह्या संधीचा लाभ घेऊन आदिलशाहा दौलत जप्त करेल. म्हणून तिने आपल्या घराण्यातले एक मूल दत्तक घ्यायचे ठरवले. ह्या कामात तिने शिवाजीराजांची मदत मागितली. त्यांना जावळीच्या कारभारात चंचुप्रवेश करण्याची संधी आयतीच मिळाली. त्यांनी बाईला तिच्या पसंतीच्या मुलाला जावळीच्या गादीवर बसवण्यास पूर्णपणे मदत केली. राजांनी आशा केली होती की मोरे आता आपणास विरोध करणार नाही व स्वराज्याच्या कुशीत बोचणारा काटा दूर होईल. परंतु ही अपेक्षा खोटी ठरली ! नवीन मोरेही स्वराज्याला विरोध व आदिलशाहाला मदत करू लागला. अखेर जावळी जहागीर हस्तगत करण्याशिवाय राजांना गत्यंतर राहिले नाही सन १६५६ त स्वारी करून जावळीचे राज्य शिवाजी राजांनी स्वराज्यात सामील केले. राज्यावर असलेला मोरे मारला गेला. मोऱ्यांचा शूर सरदार व सेनापती मुरारबाजी देशपांडे राजास येऊन मिळाला. जावळीच्या राज्यातील सहा किल्लेही स्वराज्यात आले. त्यातच 'रायरी' किंवा 'रायगड' होता.

जावळी भाग स्वराज्यात आल्याने स्वराज्याचा बराच विस्तार झाला. राज्याची हद्द पश्चिमेस जवळ जवळ समुद्र किनाऱ्यापर्यंत वाढली. सातारा जिल्ह्यातील डोंगराळ भाग व उत्तर कोकणच्या वाटा ह्यांवर स्वराज्याचे नियंत्रण झाले. स्वराज्यासाठी दुर्गम व सुरक्षित ठिकाणे मिळाली. अपार संपत्ती मिळून स्वराज्याचा खजिना संपन्न झाला. जावळी भागातच अत्यंत कठीण पर्वतावर 'प्रतापगड' किल्ला शिवाजीराजांनी पुढे बांधून घेतला. एकंदरीत, जावळी जहागीर काबीज केल्याने स्वराज्यास अनेक तऱ्हेने लाभ झाला व स्वराज्याची शक्ती वाढली.

### स्वराज्याचा अधिक विस्तार : संभाजीचा जन्म

जावळीच्या गादीवर असणाऱ्या मुख्य मोऱ्याला शिवाजीराजांनी जरी मारले होते व जावळी जहागिरीचा भाग स्वराज्यात आणला होता तरी त्याचे नातलग मोरे राजांच्या विरुद्ध आदिलशाहास गुप्तपणे मदत करत होते, राजांच्या हे लक्षात आल्याबरोबर त्यांनी त्या मोऱ्यांचाही नि:पात केला.

धोका होऊ शकतो हे आई व पुत्र दोघांनाही माहीत होते कारण खान कपटी असल्याचे प्रसिद्ध होते. आपला घात झाल्यास संभाजींना गादीवर बसवून त्यांच्या आज्ञेनुसार कारभार चालवावा अशी आज्ञा राजांनी आपल्या मंत्र्यांना निघण्यापूर्वी देऊन ठेवली.

खानाशी लढाई न करता तह करावा असा सल्ला काही कारभाऱ्यांनी राजांना दिला पण तो त्यांना आवडला नाही. शहाजीराजांना मागे कैद करण्यात व त्यांच्या पायात बेडचा ठोकून विजापूरला नेण्यात अफझलखानाचा मोठा वाटा होता हे आठवत असेल. कदाचित ही गोष्ट राजांच्या मनात खुपत असावी. त्यामुळे तह न करता कपटी खानाला तोंडच द्यावे असे राजांनी ठरवले असावे.

शिवाजीला भेटीसाठी बोलवावे व भेटीत त्याला कैद करावे किंवा मारावे अशी खानाची योजना असावी असे राजांना समजले होते. म्हणून राजांना सावधगिरीने वागायचे ठरवलेच होते. खानाने वाईहून आपला हुशार वकील कृष्णाजी भास्कर ह्याला राजांकडे पाठवून कळविले, "शहाजीराजांचा व आमचा फार दिवसांचा स्नेह आहे. आमची इच्छा आहे की तुम्ही पुंडपणा न करता आदिलशाहांच्या आज्ञेत राहावे. म्हणजे तुमचा मुलूख व आणखी सरंजाम तुम्हास मिळवून देण्याची मी हमी घेतो. तेव्हा मनात शंका न बाळगता आम्हाला भेटावे." खानाच्या वकिलाने भेटीस चलण्याचा राजांना पुष्कळ आग्रह केला. राजांनी धूर्तपणाने उत्तर दिले. 'खानसाहेबांच्या स्वारीमुळे मी फार घाबरून गेलो आहे; म्हणून त्यांनीच जावळीस यावे म्हणजे माझे भय नाहीसे होईल. खानसाहेब मागतील ते सर्व मी देईन. जावळीत मी त्यांची भेट जरूर घेईन. ते आम्हाला काका प्रमाणे आहेत!" वास्तविक स्थिती अशी होती की राजे घाबरणारे नव्हतेच. घाबरल्याचा देखावा त्यांना करावयाचा होता. देखाव्याची मात्रा वकीलावर लागू पडली व तो परत जाण्यास तयार झाला.

खानाच्या वकीलाबरोबर राजांनी आपले वकील पंताजी बोकील ह्यांना खानाबरोबर आपल्यातर्फे बोलणे करण्यास पाठविले. पंताजी फार इमानदार व हुषार होते. खानाच्या वकीलाने त्याला झालेला वृत्तान्त सांगितला. त्याने पंताजी बोकिलांची खानाशी भेटही करून दिली. पंताजीनी खानाला मुजरा केला व शिवाजी राजांनी दिलेली मानाची वस्त्रे त्याला दिली. राजांचे पत्रही दिले. त्या पत्रांत राजांनी लिहिले होते, 'माझ्याकडून झालेल्या अपराधांची क्षमा असावी ह्यापुढे बादशाहाची हुकुमाप्रमाणे मी नोकरी करेन. हुकुमाबाहेर वागणार नाही" पंतानी खानास कळविले, "शिवाजी राजे आपणास जरूर भेटतील परंतु आपण जावळीस यावे अशी त्याची इच्छा आहे ते वाईला

येण्यास असमर्थ आहेत. ते फार घाबरून गेले आहेत!" पंतांनी शिवाजी राजांना भेटीत दगा होणार नाही ह्याबद्दलही वचन मागितले. त्यांनी खानाला पूर्णपणे पटवले की शिवाजीराजे फार घाबरून गेले आहेत! खान खूष झाला व जावळीस यायला जवळ जवळ तयार झाला.

खानाच्या भेटीनंतर पंताजी रात्री छावणीत राहिले. राजांच्या आज्ञेप्रमाणे त्यांनी खानाच्या सरदारांच्या भेटी घेतल्या व त्यांना सुंदर व मुल्यवान वस्तू भेट म्हणून दिल्या. सर्वांशी गोड बोलून खानाचा भेटीमागे खरा हेतु काय आहे ह्याचा शोध लावला. पंतांना कळले की भेटीच्या वेळी दगा करून राजांना कैद करून विजापूरला न्यावे असा खानाचा दुष्ट हेतू आहे! पंताजींनी दुसऱ्या दिवशी खानाचा निरोप घेतला. शेवटी खानाने भेटीसाठी जावळीस येण्याचे कबूल केले.

परत येऊन पंतांनी झालेले बोलणे व मिळालेली माहिती राजांना कळवली. राजे खूष झाले. त्यांनी पंतांना ५००० होन बक्षीस दिले.

जावळीचा मुलूख प्रवासास फार कठीण होता. वाईहून जावळीस येताना तीन मैलाचा डोंगर चढावा लागे. त्यानंतर दहा मैल जंगलातून चालायचे व नंतर पुन: तीन मैलांचा घाट उतरावयाचा होता खान निवडक सैन्य व सरदार बरोबर घेऊन जावळीकडे निघाला. शिवाजी राजांनी त्याची वाटेत छान व्यवस्था ठेवली होती. तरी कठीण घाट चढताना खानाच्या फौजेची फार हानी झाली. हत्ती घोड्यांचे पाय सोलून निघाले! खानाने कोयना नदीच्या खोऱ्यात तळ दिला. ते ठिकाण प्रतापगडापासून दोन एक मैलावर होते.

शिवाजींनी आपणास आपल्या तळावर भेटावे अशी खानाची फार इच्छा होती परंतु येथेही राजे खानाच्या जाळ्यात सापडले नाहीत. त्यांनी पुन्हा पंताजीच्या हाती खानास कळविले की, "मला आपली फार भीती अद्याप वाटते म्हणून आपल्या तळावर येण्यास धीर होत नाही. आपणच गडाचे पायथ्याशी योजलेल्या ठिकाणी यावे ही विनंती आहे." खान तयार होत नव्हता पण पंताजींनी पुन्हा त्याचे मन वळवले. खानास आपल्या शक्तीची व शौर्याची फार घमेंड होती. तेव्हा क्षुल्लक शिवाजी आपल्याकडे येण्यास घाबरतो असे त्याला वाटले! वकीलाच्या मध्यस्तीने असे ठरले की खानाने भेटीच्या जागी सशस्त्र पालखीतून यावे. आपल्या रक्षणाकरता बरोबर फक्त दहा सैनिक आणावे पण त्यांना बैठकीपासून थोडे दूर ठेवावे, भेटीच्या शामियान्यात फक्त दोन किंवा तीन शरीररक्षक ठेवावेत. शिवाजी राजे ही तसेच करतील.

भेटीची जागा फार हुषारीने, प्रतापगडाच्या पायथ्यापासून अर्धा पर्वत चढून गेल्यावर, एके ठिकाणी निवडलेली होती. खानाने भेटीत दगा केल्यास तेथे

त्याचे सैनिक लवकर पोचू शकत नव्हते ! निवडलेल्या जागी शानदार शामियाना उभारला होता. तो गाद्या गालिच्यांनी व रत्नांनी शोभिवंत केला होता. भेटीची वेळ १० नोव्हेंबर १६५६ रोजी दुपारी ठरली होती. भेटीच्या आदल्या दिवशी राजांनी आपल्याबरोबर जाणाऱ्या माणसांची नावे ठरवली. त्यांची कामे नेमून दिली. एकंदर ठरलेल्या योजनेप्रमाणे, ह्या माणसांनी सभोवतालच्या जंगलात लपून राहावे व दगा होण्याची शक्यता वाटल्यास, तोफा होतील तेव्हा खानाची फौज कापून टाकावी असे ठरले.

भेटीच्या दिवशी सकाळी शिवाजी राजांनी वकील पंताजींना पुनः खानाच्या छावणीत पाठवले. खान आपल्याबरोबर प्रत्यक्ष किती लोक घेतो ह्याबद्दलही शोध घेण्यास त्यांना सांगितले. पंताजींना दिसले की ठरलेल्या संख्येपेक्षा बरेच अधिक सैनिक खानाबरोबर जाण्यास तयार झाले होते. त्यांनी खानास पुनः सांगितले की इतके लोक महाराज पाहातील तर निश्चित घाबरून जातील व ते भेटीस येणारही नाहीत. हे ऐकून खानाने अखेरीस ठरलेले लोकच बरोबर घेतले. त्यात वकील कृष्णाजी भास्कर व शूर सैनिक 'सय्यद बंडा' होता.

भेटीची वेळ होत आली. राजांनी अंगात चिलखत चढवले, वर जरीची कुडती घातली. डोक्यावर जिरेटोप चढवून त्यावर मंदिल (उंच पागोटे) बांधले. कंबरेला शेला बांधला. पायात सुरवार घातली. अस्तनीत बिचवा ठेवला व हातात वाघनखे चढवली.

ठरलेल्या वेळी खान शामियान्यात आला. तो आल्याची बातमी शिवाजी राजांना जासूदाने दिली. जासूदाकडून हेही कळले की सय्यद बंडा खानाच्या अगदी जवळ उभा आहे व बरोबर आणलेले सैनिक काही अंतरावर आहेत. राजे हळू हळू गड उतरू लागले. बरोबर 'जिऊ महाला' व 'संभाजी कावजी' हे दोन जिवास जीव देणारे अंगरक्षक होते. राजांनी खानास निरोप पाठवला की बंडास दूर ठेवावे कारण आपणास त्याची फार भीती वाटते. खानास आश्चर्य वाटले. शिवाजी बंडास इतका घाबरतो ! त्याने बंडास दूर उभे केले. राजे शामियान्यात पोचले. त्यांनी आपल्या अंगरक्षकांनाही आपल्यापासून काही अंतरावर उभे राहण्यास सांगितले.

शिवाजी राजे सदरेवर चढले. त्यांना विश्वास वाटावा म्हणून की काय खानाने आपली तलवार आपल्या वकीलास दिली. राजांनीही तसे केले. खान राजांना सामोरा गेला. राजांनी स्मित केले. शिवाजी आता आपल्या कचाट्यात सापडणार असे वाटून खानास आनंद वाटला. त्याने राजांस आलिंगन देण्यासाठी दोन हात पसरले व त्यांना मिठी मारली. खान धिप्पाड व उंच

असल्यामुळे राजांची मान खानाच्या खाकेपर्यंत पोचली होती. त्याने राजांची मान डाव्या खाकेत धरून दाबली व उजव्या हाताने कमरेची कटचार राजांच्या कुशीत खुपसली ! राजांच्या अंगात चिलखत असल्यामुळे कटचार 'खरखर' करत निसटली. राजांनी दगा ओळखला व आपली मान चपळाईने खानाच्या पकडेतून सोडवली. त्यानी लगेच आपली कटचार खानाच्या पोटात खुपसली. खानाच्या पोटातली आतडी बाहेर आली व भळाभळा रक्त वाहू लागले. 'दगा' दगा' असे खान जोराने ओरडला, चपळाईने राजांनी खानावर दोन वार केले व सदरेवरून खाली उडी मारली! सय्यद बंडाने व खानाच्या अंगरक्षकांनी राजांवर वार केले पण त्यांनी आपली तलवार वकीलाकडून घेऊन ते वार अडवले. इतक्यात जिऊ माहालाने सय्यद बंडाला ठार केले. खान, आपली आतडी सावरत कष्टाने आपल्या पालखीपर्यंत पोचला ! भोयी पालखी घेऊन पळू लागले परतु संभाजी कावजीने भोयांचे पायच छाटले ! पालखी जमिनीवर पडली. कावजीने खानाचे मुंडके उडवले ते राजांजवळ नेले ! राजे अधिक वेळ तेथे न दवडता आपल्या साथीदारांसह गडावर गेले. ह्या गडबडीत राजांच्या डोक्याला एक लहान खोक पडली.

राजे गडावर पोचताच तोफांचे वार झाले. ते ऐकून राजांच्या सेनेने तळावर असलेल्या खानाच्या सैन्यावर हल्ला केला. खान मारला गेल्याचे त्याच्या सैन्याला माहीत नसल्यामुळे सर्व लोक बेसावध होते. त्यामुळे कित्येक लोक, हत्ती व घोडे मारले गेले. खानाचे दोन मुलगे कैद झाले. राजांनी त्यांना अभय वचन दिले ! नेताजी पालकराने वाईला असलेल्या खानाच्या सेनेवरही हल्ला केला. ती पळू लागली तेव्हा नेताजीने तिचा पाठलाग केला. ह्या धामधुमीत खानाचे ४ हजार घोडे, ६५ हत्ती, १२०० उंट, ३ हजार माणसे मारली गेली. खानाकडचे जे लोक शरण आले होते त्यांना शिवाजी राजांनी जीवदान देऊन परत पाठवले बायका मुलांना संरक्षण देऊन जावळीच्या बाहेर पोचवण्याची व्यवस्था केली! यवनांनी केलेल्या स्वाऱ्यात, शत्रुपक्षाकडील बायका मुलांची अमानुषपणे कत्तल केल्याची किंवा बायकांना धरून नेऊन त्यांच्याशी बळजबरीने लग्ने केल्याची अनेक उदाहरणे आढळतात. त्याच्या तुलनेत शिवाजीराजांचे वतन किती उदारपणाचे व उच्च नैतिक स्तराचे होते हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. राजांनी खानाच्या शरीराचे इस्लाम धर्माप्रमाणे दफन करवले ! व पुढे गडाच्या पायथ्याशी त्याची कबर उभारली!

ह्या प्रकरणात राजांच्या बाजूच्या ज्या लोकांनी शौर्य गाजवले त्यांना राजांनी बक्षिसे दिली. दरबार भरवून त्यांचा गौरवही केला. जे मारले गेले

होते त्यांच्या मुलांना नोकऱ्या दिल्या. बायकांना धन दिले. उलट जे लोक फितूर झाले त्यांना कडक शिक्षाही केली.

आपली सरशी झाल्याची आनंददायक वार्ता राजांनी राजगडला मातुश्रींना कळवली. आईसाहेबांचा आनंद गगनात मावेनासा होता. स्वराज्यातल्या लोकांचीही मने राजांचे यश ऐकून हर्षाने भरून गेली. राजे व स्वराज्य एका महान गंडातरांतून वाचले.

राजांनी खानावर मिळवलेल्या विजयामुळे स्वराज्याने अनेक दूरगामी लाभ झाले. 'शककर्ते शिवराय' ह्या ग्रंथात श्री विजय देशमुख लिहितात, "अफझलखान मारला जाऊन महाराज विजयी झाले या बातमीमुळे विजापूरकर सुन्न झाले. मोगल दचकले तर पोर्तुगीज–इंग्रज गोंधळून गेले. वयाच्या तिसाव्या वर्षीच महाराजांची कीर्ती परदेशी पोचली! ... स्वराज्य तर महाराजांच्या विजयवार्तेने मोहरुन गेले होते." ह्या विजयामुळे राजांचा व त्यांच्या सहकार्यांचा आत्मविश्वास खात्रीने बळावला. आतापर्यंत काही वतनदार लोक आदिलशाहालाच बादशाह मानत पण आता राजांना ते 'राजा' मानू लागले. काही लोक तर त्यांना ईश्वरी अवतार मानू लागले !

अफझलखानाच्या स्वारीच्या प्रसंगी राजांच्या अंगचे लष्करी हालचालीतले कौशल्य दूरदृष्टीने डावपेचांची आखणी करणे, अत्यंत सावधगिरी, कमालीचे प्रसंगावधान व शत्रूशी वागण्यातला सुसंस्कृतपणा हे गुण स्पष्ट झाले.

### पन्हाळगडाला वेढा

अफझलखानाचा निकाल लागल्यावर राजे आईला भेटायला राजगडलाही गेले नाहीत कारणही तसेच असावे. आपला एवढा बलाढ्य सरदार राजांचेकडून मारला गेल्याने आदिलशाह हादरुन गेला होता. दरबारातले सर्व सरदार भयभीत झाले होते! शत्रूच्या अशा मनःस्थितीचा पूर्ण फायदा घेण्याचे राजांनी ठरवले असले पाहिजे.

प्रतापगडाहून ते स्वतः सरळ कोल्हापूरकडे गेले. 'दरोजी' सरदारास कोकण प्रदेशात पाठवले. नेताजीला वाईकडे काम दिले होते. ते पूर्ण झालेच होते. तेव्हा त्याला राजांनी स्वतः बरोबर घेतले. दोघांनी हा हा म्हणता दहा बारा दिवसात कोल्हापूरपर्यंतचा भाग काबीज केला. हा सर्व भाग आदिलशाहाचाच होता. आता 'पन्हाळगड' जिंकून घ्यायचा होता. तो फार महत्त्वाचा किल्ला होता कारण कोकणपर्यंतच्या सर्व वाटांवर पन्हाळ्याहून नियंत्रण ठेवता येत होते. लवकरच पन्हाळा व विशालगड हेही आदिलशहाचे किल्ले घेतले गेले कारण तेथे विशेष प्रतिकार झाला नाही. आदिलशाहीत प्रतिकार करण्याची

शक्तीच जणू आता उरली नव्हती ! दरोजीने कोकणात खंडणी वसूल केली व नेताजीने पन्हाळ्याहून निघून खुद्द विजापूरवर स्वारी केली.

ह्या सर्व चढाईमुळे आदिलशाहाला काय करावे ते सुचेना. शिवाजी राजांच्या आक्रमणाला तर थांबवणे जरूर होते. हे काम करण्यास कोणी योग्य मनुष्य आदिलशाहाला दिसेना ! शेवटी आदिलशाहाचा जुना बंडखोर सरदार 'सिद्दी जौहर' हे काम अंगावर घेण्यास तयार झाला. शाहाने मंजुरी दिली. जौहर आपल्यावर चालून येत आहे हे कळताच राजांनी पन्हाळा किल्ल्याचा आश्रय घेतला. हा किल्ला कोल्हापूरहून दहा मैल अंतरावर होता आदिलशहाने मोगल बादशाहाकडेही मदतीची मागणी केली. औरंगजेबाने आपला मामा शाहिस्तेखान ह्यास पाठवले, परंतु तो जौहरच्या मदतीस न येता पुण्याकडे प्रदेश काबीज करू लागला!

जौहरने प्रचंड सेनेसह पन्हाळगडास वेढा घातला. त्याच्या विनंतीवरून 'रेव्हिंग्टन' नावाचा इंग्रज व्यापारी राजापूरहून आपल्या तोफा घेऊन मदतीस आला. जौहरचा वेढा तीन महिने चालला. राजे किल्ल्यात अडकून पडले होते. अधिक दिवस अडकून पडणे ठीक नव्हते कारण शाहिस्तेखान पुण्याकडे स्वराज्यावर आक्रमण करत होता. म्हणून किल्ल्यातून निसटून जाण्याचा विचार राजांनी केला! पण निसटायचे कसे? शिवाजीराजांच्या डोक्यात अनेक युक्त्या भरलेल्या होत्या. त्यांनी त्यापैकी एक योजली. आपल्या वकिलाचे हाती सिद्दी जौहरला संदेश पाठवला की मी आपली सर्व दौलत आदिलशाहाच्या स्वाधीन करण्यास तयार आहे. ह्याकरता मी तुमच्या भेटीस येत आहे. माझे गुन्हे माफ व्हावेत! ह्या पत्रामुळे जौहरची सेना बेसावध राहिली. राजांना हेरांकडून माहीत झाले होते की वेढ्यातून निसटण्यास, जेथे पहारा नाही अशी, एकच कठीण वाट आहे. रात्र अंधारी होती तरी राजे त्या वाटेने पालखीतून चुपचाप निसटले ! बरोबर एक रिकामी पालखी ठेवली. निवडक सहाशे मावळेही राजांच्याबरोबर निसटले. काय हे राजांचे धाडस! बऱ्याच वेळाने राजे निसटून गेल्याचे शत्रूच्या लक्षात आले.

लगेच जौहरने राजांचा पाठलाग करण्यासाठी 'सिद्दी मसूद' व 'फाजलखान' ह्यांना पाठवले. कीर्र अंधार व वाट अति अडचणीची असूनही, राजांनी 'विशालगडा'कडे बरीच मजल मारली होती. शत्रू आपला पाठलाग जरुर करणार हे शिवाजीराजांना माहीत होतेच. 'गजापूरच्या' खिंडीत पोचल्यावर शत्रूस तेथे अडवून धरण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी शूर व विश्वासू 'बाजी प्रभू देशपांडे' ह्यांना दिले. राजांनी त्यांना सांगितले की आपण गडावर पोचल्याची खूण म्हणून

२९५४

तोफांचे आवाज होतील, तोपर्यंत शिकस्त करून शत्रूस थोपवावे. बाजींच्या मदतीस बरोबरचे आणखी मावळे दिले बाजीने आनंदाने ती कामगिरी स्वीकारली व काम फत्ते करण्याचे राजांस आश्वासन दिले. लौकरच शत्रूची फौज खिंडीत पोचली. बाजी व मावळे ह्यांनी तिला थोपवून ठेवले. दोन्ही पक्षात घनघोर लढाई झाली. अनेक मावळे धारातीर्थी पडले. शत्रूकडचेही पुष्कळ लोक मेले, लढाई चालूच होती. इतक्यात तोफेचा एक गोळा येऊन बाजींस लागला व तो खाली पडला. तोफेचे आवाज ऐकू येण्यापूर्वी आपणास मृत्यू येतो की काय अशी चिंता बाजीला वाटू लागली. पडल्या पडल्याच तो मावळ्यांस लढण्यास उत्तेजित करत होता! इतक्यात सुदैवाने तोफेचे आवाज त्याच्या कानी पडले. राजे गडावर पोचल्याचे कळून बाजी प्रभूस परमानंद झाला. आपण आपले कर्तव्य पार पाडले ह्या समाधानाने त्याने प्राण सोडला. बाजीच्या आत्मबलीदानाने खिंड पावन झाली म्हणून राजांनी त्या खिंडीचे नाव 'पावन खिंड' ठेवले. स्वराज्याच्या इतिहासात स्वामीनिष्ठ मावळ्यांनी राजांच्या शब्दावर केलेल्या बलीदानांच्या अनेक उदाहरणांपैकी हे एक आहे. राजे विशाळगडला काही दिवस राहून नंतर राजगडला गेले.

आदिलशाहाच्या काही फौजेने विशालगडलाही वेढा घातला. काही दिवसांनी, त्याचा काही उपयोग नाही हे पाहून तो उठला. वेढा चालू असतांना मसूदखानाने एक पालखी पकडली. त्याला वाटले आपल्या हाती शिवाजीच लागला परंतु पालखीतला 'शिवाजी' राजांचा वेष केलेला दुसराच मनुष्य निघाला! पन्हाळ्याचा वेढा सिद्दी जौहरने बरेच दिवस चालू ठेवला होता पण त्याला गड घेता आला नाही. पुढे राजांनी आदिलशाहाशी आपण होऊन तह करून पन्हाळगड त्याला दिला. तह करण्याचे कारण असे होते की शाहिस्तेखान पुण्याकडे स्वराज्याचे भाग काबीज करत असल्याने त्याचा बंदोबस्त करणे आवश्यक होते. एकाच वेळी दोन शत्रूंना तोंड देणे योग्य नव्हते. पन्हाळगड आपणास घेता आला नाही म्हणून वाईट वाटून सिद्दी जौहरने पुढे आत्महत्या केली! कोणी म्हणतात, त्याला विष प्रयोग झाला.

## शाहिस्तेखानाची बोटे तुटली

औरंगजेब बादशाहाच्या हुकुमावरून आदिलशाहाच्या मदतीकरता, त्याचा दक्षिणेतील सुभेदार, शाहिस्तेखान औरंगाबादहून निघाला परंतु तो विजापूरकडे न जाता पुण्याकडे आला होता. त्याने स्वराज्यातील गावे एका मागून एक काबीज करण्याचा व ती जाळपोळ करण्याचा सपाटा चालवला. पुणे-सुपे परगण्यातली बरीच गावे त्यामुळे उध्वस्त झाली लोक भीतीने घरदार सोडून पळाले. शाहिस्तेखान दोन वर्षे असा धिंगाणा घालत होता. त्यावेळी

शिवाजी राजे पन्हाळगडाच्या वेढ्यात अडकून पडले होते. खानाने अखेरीस राजांच्या लाल महालात मुक्काम ठोकला. राजांच्या अनुपस्थितीत, मराठे तानाजी मालुसरेच्या नेतृत्वाखाली खानाचा जितका प्रतिकार गनिमीकाव्याच्या पद्धतीने करता येईल तितका करतच होते. इतकेच नव्हे तर खानाला जराही विसावा त्यांनी घेऊ दिला नाही.

खानाने चाकणच्या किल्ल्यावर हल्ला केला हा किल्ला पुण्यापासून १८ मैलावर होता. तेथे 'फिरंगोजी नरसाळा' नावाचा शूर किल्लेदार होता. त्याने ५६ दिवस किल्ला शौर्याने लढवला. खानाजवळ प्रचंड सेना असल्यामुळे नरसाळ्याचा टिकाव लागला नाही व किल्ला खानाला देणे भाग पडले. नरसाळ्याचे शौर्य पाहून खानाने त्याला आपल्या नोकरीत बोलावले परंतु त्याने नकार दिला! काय ही स्वामीनिष्ठा! अशी अनेक नररत्ने राजांचे पदरी होती. चाकण किल्ला घेतल्यावर खान परत पुण्यात जाऊन राहिला.

सरनौबत नेताजी पालकर ह्यास शाहिस्तेखानावर लक्ष ठेवण्यास सांगून, शिवाजीराजे दक्षिण कोकणकडे गेले. बरोबर काही सैन्य व सरदार घेतले. त्यात तानाजी मालुसरे होता. राजांनी 'दाभोळ, 'चिपळूण' 'संगमेश्वर' वगैरे ठिकाणे हस्तगत केली. 'राजापूर'ला पोर्तुगीज, डच, इंग्रज, व इतर मोठे व्यापारी होते त्यांच्या वखारीही होत्या राजानी सर्व श्रीमंत व्यापाऱ्यांच्याकडून भरपूर खंडणी वसूल केली. चिपळूणजवळ परशुरामाचे मंदिर आहे. तेथे दर्शन घेऊन पूजा केली सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग येथील किल्ल्यांची डागडुजी केली व आपले आरमार मजबूत केले. शिवाजी राजांनी दक्षिण कोकणाचा आदिलशाहाच्या राज्यात येणारा दाभोळ ते विजयदुर्गचा हा भाग भराभर काबीज केला कारण आदिलशाही दुर्बळ झालेली असल्याने, त्यांना प्रतिकार असा फारसा झालाच नाही. कोकणभाग स्वराज्यात आल्यामुळे तेथील हिंदू प्रजेस आनंद झाला.

वाडीचे सावंत, राजापुरीला असणारे इंग्रज व्यापारी, शृंगारपूरचे सुर्वे वगैरेंनी पन्हाळ्याच्या वेढ्यात सिद्दी जौहरला मदत केली होती. शिवाजी राजांनी त्यांना चांगली शिक्षा केली. इंग्रज व्यापाऱ्यांना बरेच दिवस कैदेत ठेवले होते. त्यात रेव्हिंग्टन होताच. काही दिवसांनी राजांनी त्यांना क्षमा करून सोडून दिले. कोकणचा बराच भाग हस्तगत करून व बरीच संपत्ती घेऊन राजे राजगडला परतले.

आता ते शाहिस्तेखानाचा समाचार घेणार होते. त्याच्यावर हल्ला करणे कठीण काम होते, कारण त्याच्याजवळ प्रचंड सैन्य होते. म्हणून त्याच्याशी समोरा समोर न लढता, तो लाल महालात तळ ठोकून बसला होता तेथेच

अचानक हल्ला करण्याचे राजांनी ठरवले. त्यांनी हेरांकडून खानाच्या छावणी संबंधी बरीच माहिती मिळवली. हल्ला करण्यासाठी ५ एप्रिल १६६३ हा दिवस निश्चित केला.

शिवाजीराजे राजगडहून सिंहगडला येऊन राहिले होते. तेथून राजे नेताजी पालकर, मोरोपंत पिंगळे, निळोपंत मुजुमदार ह्यांच्यासह, रात्री छापा घालण्यास निघाले. बरोबर निवडक एक हजार सैनिक घेतले. पुण्याजवळ आल्यावर एका तुकडीस कात्रजच्या घाटात लपून बसावयास सांगितले. नेताजी व मोरोपंत ह्यांच्या हाताखाली एकेक तुकडी देऊन त्यांना राजाच्या वाटेवर परंतु खानाच्या छावणीपासून जरा दूर रहावयास सांगितले. मध्यरात्रीच्या सुमारास राजे आपल्या तुकडीसह छावणीजवळ पोचले. तो चैत्र शु. ८ चा दिवस होता. चौकीवर पहारेकऱ्यांनी हटकले. राजांचे तुकडीत 'बाबाजी' 'चिमणाजी' नावाचे पुण्यात राहणारे दोन हुशार गृहस्थ होते. त्यांनी उत्तर दिले की आम्ही चौकी पाहाऱ्याचे लोक आहोत. चौकीवरचे पाहारे आळी-पाळीने बदलत. त्यामुळे पहारेकऱ्यांस संशय आला नाही! मोगलांच्या छावणीत नेहमी गबाळेपणा असे. चौकीवरून लोकांना आत सोडण्यात आले.

राजे व त्यांच्या तुकडीचे लोक सरळ लालमहालात घुसले राजे स्वत: लहानपणी लालमहालात राहिलेले होते. त्यामुळे त्यांना महालाची पूर्ण माहिती होतीच. मराठे जेथे पोचले तो भाग मुदपाकखाना (म्हणजे स्वयंपाकघर) होता काही स्वयंपाकी जागे झालेले होते. तो मुसलमानी पंचांगाप्रमाणे 'रमजान' महिना होता. ह्या महिन्यात धार्मिक मुसलमान फक्त सूर्योदयापूर्वी व सूर्यास्ता-नंतर जेवतात. दिवसभर कडक उपवास करतात. म्हणून पहाटेच्या जेवणाची तयारी स्वयंपाकी करत होते. इतर सर्व गाढ निजलेले होते. राजांच्या तुकडीने स्वयंपाक्यांना कापून टाकले. तसे केले नसते तर त्यांनी आरडाओरड केली असती. त्यानंतर पलीकडे खानाचा जनानखाना होता. मधल्या भिंतीला असलेले लहान दार विटांनी बंद केलेले होते. विटा काढून राजांची तुकडी जनानखान्यात शिरली. खान तेथे स्वस्थ झोपलेला होता पण काही बायकांना कोणी आल्याची चाहूल लागली. त्यांनी आरडाओरड केली. खान जागा झाला. राजांनी स्वत: त्याच्यावर तरवारीने चपळाईने वार केला. खानाने तो चुकवला. तरी त्यात खानाची तीन बोटे कापली गेली. बायकांनी दिवे मालवून अंधार केला व खानाला मुष्कीलीने सुरक्षित ठिकाणी हालवले. मराठ्यांनी जो सापडेल त्याला कापले. पुरुष की स्त्री आहे हे समजणे अंधारात शक्य नव्हते. खानाचा एक मुलगा कापला गेला. हळू हळू लोक जागे झाले. त्यामुळे आता अधिक वेळ थांबणे धोक्याचे होते. राजांनी आपल्या मंडळीसह

लालमहालातून पाय काढला. जे जे आडवे आले त्यांना मराठ्यांनी कापून काढले. मराठ्यांची अशी समजूत होती की खान मारला गेला पण तो जिवंत सुटला होता! राजे व त्यांची तुकडी पुण्याबाहेर पोहताच कर्णे वाजवून कात्रजच्या घाटात लपून बसलेल्या मराठ्यांना, छापा यशस्वी झाल्याचे सुचवण्यात आले. पूर्वी ठरल्याप्रमाणे, कात्रजच्या रस्त्यावरच्या झाडास बांधलेल्या मशाली मराठ्यांनी पेटवल्या. त्यामुळे खानाच्या सैन्यास असे वाटले की शिवाजीराजे कात्रजकडे पळाले. म्हणून ते तिकडे पाठलागास गेले पण ते अखेर फसले. खरोखर राजे कोंडाण्याकडे (सिंहगडकडे) गेले होते! शत्रूला चकवण्याची ही एक राजांची युक्ती होती! नंतर खानाच्या लष्कराने सिंहगडास वेढा घातला. परंतु त्याचा गडावरून होणाऱ्या तोफांच्या माऱ्यापुढे काही उपयोग झाला नाही. अखेर दिमाखाने शिवाजीराजांवर चालत आलेल्या शाहिस्ते खानास नामुष्की पदरात घ्यावी लागली.

खानावरच्या स्वारीत खानाकडच्या ६ स्त्रिया, खानाचा एक मुलगा ४० रक्षक मेले व खानाचे दोन मुलगे घायाळ झाले. राजांचे कडील केवळ पाच लोक मारले गेले. कमालीची मानहानी व नुकसान पत्करून शाहिस्तेखानास परत औरंगाबादेस जावे लागले. खानाच्या झालेल्या पराभवाची व फजीतीची हकीकत औरंगजेबास दिल्लीस कळल्यावर त्याला खानाचा फार राग आला. खान औरंगजेबाचा मामा होता पण ह्याजवळच्या नात्याचा काही उपयोग झाला नाही. औरंगजबाने खानाची बंगालमध्ये बदली केली. त्याला भेटायचेही बादशाहाने नाकारले!

ह्या छाप्यामुळे शिवाजीराजांच्या कीर्तीत महत्त्वाची भर पडली. त्याच्या महान धाडसीपणाचे हे आणखी एक ठळक उदाहरण होते. त्यांची अद्वितीय कल्पकता ही पुन: एकदा परिचयास आली. धोका समोर दिसत असतानाही राजे स्वत: स्वारीचे पुढारीपण करत. आपण मागे राहून इतरांना तोफेच्या तोंडी देण्याची त्यांची वृत्ती कधीच नव्हती. राजांच्या ह्या धाडसी छाप्यामुळे इतिहासकारांनी लिहिले आहे. 'आता जगातली कोणचीही जागा शिवाजीपासून सुरक्षित नाही. जगातले कोणतेही कृत्य त्याला अशक्य नाही!"

## सुरतेची लूट

शाहिस्तेखानाने पुणे सोडल्यावर शिवाजीराजांनी सुरतवर स्वारी करण्याचे ठरवले. स्वारीसाठी सुरतच निवडण्याची दोन कारणे असावीत. एक असे की हे गाव मोगलसत्तेखाली होते, म्हणून ते लुटून मोगलसत्तेला उघडपणे धक्का द्यावा. दुसरे कारण (व हे अधिक सयुक्तिक वाटते) हे असावे की स्वराज्याच्या

अफाट खर्चासाठी सुरत लुटल्याने अमाप पैसा मिळणार होता. पैशाची त्यावेळी राजांना निकड होती. ह्या बंदरातूनच अरब व युरोपीय देशांशी व्यापार चालत असल्यामुळे येथे मोठमोठे श्रीमंत व्यापारी राहात होते.

सन १६६४ च्या जानेवारीत राजे सुरतच्या स्वारीवर निघाले. पण प्रत्यक्षात सावधगिरी म्हणून व शत्रूला चकवण्यासाठी आपण गोव्यावर स्वारी करण्यास जात आहोत असे उठवले! ते नाशिक मार्गाने गेले व सुरतेच्या अलीकडे २८ मैलावर असलेल्या गणदेवी गावाला पोचले. येथपर्यंतचा प्रवास त्यांनी रात्री केला कारण लोकांना तो समजू नये. राजांनी आधीच आपल्या हेरांच्याकडून सुरतबद्दल माहिती काढली होती. गणदेवीला पोचल्यावर राजांनी इनायतखान नावाच्या सुभेदारास व इतर व्यापाऱ्यांना कळवले की आपण उद्या सुरतेस येत आहोत. कळवत असलेली रक्कम त्यावेळी आपल्या स्वाधीन करावी. नाहीतर जबाबदारी तुमची राहील. सुभेदाराने, राजांच्या निरोपाची पर्वा न करता, पत्रास उद्धट उत्तर पाठवले. राजांनी उत्तर घेऊन येणाऱ्या दूतासच कैद केले व ते सुरतेत पोचले. तो ६ जानेवारी १६६४ हा दिवस होता. राजे आल्याचे कळताच सर्वत्र भीती पसरली, लोक पळू लागले! इनायतखान तर आपल्या लोकांना घेऊन किल्ल्यात लपून बसला! राजांचा निरोपाप्रमाणे जे व्यापारी आले नाहीत त्यांचे वाडे लुटण्याची आज्ञा राजांनी दिली. मात्र गरीबांना व बायका मुलांना त्रास देऊ नये अशी सक्त ताकीद दिली होती. चार दिवस लूट चालली होती! इंग्रज व डच वखारींच्या लोकांनी राजांना कोणताही त्रास दिला नाही. तेव्हा त्यांना राजांनीही त्रास दिला नाही सोने, चांदी, हिरे, माणके वगैरेंची प्रचंड लूट मिळाली. लुटीत एकंदरीत एक कोटी रुपयांची मिळकत झाली. कापड मिळाले ते गोर गरिबांना वाटले. इतर वस्तू बरोबर नेल्या.

सुरतेवरील स्वारीची बातमी बऱ्हाणपूरला पोचल्यावर तेथून मोगल सेना निघाली. ती सुरतेस पोचण्याच्या आधीच राजांनी सुरत सोडले होते. ते सुखरूप रायगडला संपत्तीसह परत आले.

अफझलखानाचा वध, शाहिस्तेखानाची नाचक्की व सुरतची लूट म्हणजे शिवाजीराजाच्या वाढत्या शक्तीचा चढता आलेखच होता. शेवटच्या दोन गोष्टींमुळे तर मोगलशाहीला दक्षिणेत राजांनी आव्हानच दिले होते!

## शहाजीराजांचा मृत्यु व कोकण मुलुखगिरी

सुरतेहून परतल्यानंतर लवकरच शहाजीराजांच्या अकस्मात झालेल्या मृत्यूची वार्ता राजगडावर येऊन थडकली! मृत्यूचे वेळी शहाजी कर्नाटकात 'होदीगेरे' येथे होते. २३ जानेवारी १६६४ रोजी ते शिकारीला गेले होते. शिकारीमागे त्यांचा घोडा धावत असताना त्याचा पाय वेलीत अडकला व तो

जमिनीवर कोलमंडला शहाजीही जमिनीवर आदळले व बेशुद्ध झाले. पुष्कळ औषधोपचार अर्थात झाले. पण दुर्दैवाने काही उपयोग झाला नाही. अखेरीस त्याच दिवशी शाहाजीराजांचा मृत्यू झाला! मृत्यूचे वेळी शहाजींचे लहान पुत्र व्यंकोजी उर्फ एकोजी त्यांच्याजवळ होते. मृत्यूची वार्ता राजगडावर पोचताच सर्वत्र दुःखाची छाया अर्थातच पसरली.

पतीच्या मृत्यूचे दुख: सहन न होऊन जिजाबाईंनी सती जायचे ठरवले. शिवाजीराजांपुढे दुहेरी दुःख उभे राहिले; एकीकडे वडील गेले व दुसरीकडे प्रियतम आई सती जाणार म्हणून आईचा वियोग राजांना आतापर्यंत कधी ठाऊक नव्हता. त्यांचे आई हे सर्वस्व होते. त्यामुळे आपल्या पायाखालची भुईच जणू खचणार असे त्यांना वाटले. सती न जाण्याबद्दल आईला राजांनी विनविले इतर सर्वांनी तेच म्हटले परंतु जिजाबाई ऐकेनात. अखेरीस शिवाजींनी आईच्या गळयास घट्ट मिठी मारली व हंबरडा फोडला. ते आईला म्हणाले, "आई, तू मला टाकून जाऊ नकोस; तुला माझी शपथ आहे!" अखेर मातेचे हृदय हेलावले व त्यांनी सती जाण्याचा विचार सोडला. राजांना हायसे वाटले. त्यांनी वडिलांची यथासांग क्रिया केली. उदंड दानधर्म केला.

मध्यंतरी काही काळ लोटला. काळानेच राजांचे दु.ख थोडे हलके केले. स्वराज्याच्या कामाकडे लक्ष देणे भाग होते. राजांच्या आक्रमणांना पायबंद घालण्यासाठी आदिलशाहाने 'खवासखान' नावाच्या सरदारास पाठवले होते. तो कोकणात 'कुडाळ' जवळ आला होता. 'मुधोळ'च्या बाजी घोरपडयासही खानाला मदत करण्याबद्दल शाहाने हुकूम सोडला होता.

घोरपडेने मागे शहाजींना कैद करण्यात पुढाकार घेतलेला होता. तो आदिलशाहाचा निष्ठावान नोकर व स्वराज्याचा शत्रू होता. म्हणून बाजी घोरपडयास चांगली शिक्षा करण्याची राजांची फार इच्छा होती. म्हणून राजे 'मधोळ' वर एकदम चालून गेले. घोरपडे चकित झाला. दोघांची निकराची लढाई झाली. त्यांत घोरपडे मारला गेला नंतर कुडाळला जाऊन राजांनी खवासखानाचा समाचार घेतला. खानाचा पराभव झाला. तो जीव घेऊन विजापूरला परत गेला. त्यानंतर राजांनी सावंतवाडीच्या सावंतावर स्वारी केली. सावंत शरण आला, त्याचे अर्धे राज्य राजांनी स्वराज्यात सामील केले. नंतर राजांनी आपल्या आरमाराची पहाणी केली. त्यासाठी ते 'मालवण' बंदरास गेले, आरमाराचे अधिकारी 'दर्यासारंग' व "दौलतखान' नावाचे होते. त्यांनी आरमाराची व्यवस्था उत्तम ठेवलेली होती. राजे खूष झाले.

मालवणच्या समुद्रकिनाऱ्याजवळच एक बेट राजांनी पाहिले. किल्ला बांधण्यासाठी ते ठिकाण त्यांना उत्तम वाटले. राजांनी लगेच भूमिपूजन केले

व त्या किल्ल्याचे नाव 'सिंधूदुर्ग' ठेवले. किल्ल्याचे काम सुरू करवून राजे 'हुबळी, वेंगुल्याकडे गेले. तेथील व्यापारपेठा लुटल्या. अपार संपत्ती घेऊन राजे प्रतापगडला परत आले.

राजे प्रतापगडावर पोचल्यानंतर जिजामातुश्रींना सूर्यग्रहणाच्या निमित्याने दानधर्म करण्याची इच्छा झाली. राजे आईचा शब्द कधी वाया जाऊ देत नव्हते. त्याच्या इच्छेनुसार महाबळेश्वर येथे मंदिराजवळ मातेची सुवर्णतुला राजांनी ग्रहणाच्या मुहूर्तावर करवली व ते सर्व धन गोर गरिबांस वाटले.

## मोगलांची प्रचंड स्वारी: पुरंदरचे युद्ध

राजे स्वराज्यविस्तार झपाट्याने करत होते. आदिलशाहाला तर ते मुळीच जुमानट नव्हते. जुमानण्यासारखे आदिलशाहीत त्राणच राहिले नव्हते. राजांचे मोगलबादशाहाच्या मुलखावरचे आक्रमणही वाढतच होते. बादशाहाने आतापर्यंत राजांचा बीमोड करण्याकरता जसवंतसिंग, शाहिस्तेखान ह्यांच्या सारख्या बलाढ्य सरदारांना पाठवले होते पण त्याचा विशेष उपयोग झाला नव्हता. राजांनी शाहिस्तेखानाची तर चांगलीच फजिती केली होती. अखेरीस बादशाहाने मिर्झा राजा जयसिंग ह्या आपल्या अनुभवी व शूर रजपूत सरदारास राजांवर पाठवण्याचे ठरवले.

जयसिंग वयाच्या तेराव्या वर्षापासून मोगलशाहीत नोकरीस होता. तो बुद्धिमान, शूर व गंभीर स्वभावाचा होता. तो हिंदू असून धार्मिक वृत्तीचाही होता. परंतु इतर रजपूत राजांप्रमाणे, जयसिंगाने आपले सर्व इमान मोगल सत्तेला वाहिले होते. त्याचा त्याला अभिमान वाटे! औरंगजेब बादशाह फार संशयी व कपटी होता. त्याला असा संशयी होता की जयसिंग हिंदू असल्यामुळे कदाचित तो शिवाजाला मिळेल म्हणून त्याच्यावर लक्ष ठेवण्यासाठी बादशाहाने 'दिलेरखान' नावाच्या पठाण सरदारासही जयसिंगाबरोबर पाठवले! अखेरीस, स्वातंत्र्यासाठी व हिंदूधर्माच्या रक्षणासाठी प्राण पणास लावून झगडणाऱ्या एका हिंदू क्षत्रियाविरुद्ध मोगलसत्तेतर्फे लढणारा दुसरा हिंदू क्षत्रिय असा अजब सामना महाराष्ट्रात दुर्दैवाने होणार होता!

जयसिंग ९ जानेवारी १६६५ रोजी दिल्लीहून निघाला; काही दिवसांनी बऱ्हाणपूरला पोचला व तेथे त्याने आपली छावणी टाकली. तेथून त्याने शिवाजी राजांच्या शत्रूंना एकत्र करण्यासाठी आपले वकील पाठवले. बऱ्हाणपूर नंतर तो औरंगाबादेस गेला. तेथे औरंगजेबाचा मुलगा मुअज्जम दक्षिणचा सुभेदार म्हणून होता. त्याला भेटून जयसिंग पुण्यास जाणार होता.

जयसिंग आपल्यावर चालून येत आहे ही गोष्ट राजांना माहीत झाली होतीच. मोगल सरदाराची गती फार सावकाश असे. म्हणून जयसिंगास पुण्यास

पोचायला काही महिने लागतील हे राजांनी ओळखले. स्वराज्याच्या खर्चासाठी पैशाची निकड होती. म्हणून राजांनी कर्नाटकातील बसनूर व महाराष्ट्रातील 'कारवार' कडे स्वारी केली ते वाटेत मालवणला गेले. तेथे सिंधुदुर्गाच्या बांधकामाची प्रगती पाहिली. तेथून आपल्या आरमाराने बसनूरकडे गेले. बसनूर लुटले, नंतर कारवारकडे गेले. तेथे इंग्रजांच्या मोठ्या वखारी होत्या. हे व्यापाराचे मोठे सधन शहर होते तेथील सुभेदाराच्या प्रतिनिधीने कारवार न लुटण्याची विनंती केली त्याने सर्व व्यापाऱ्यांकडून रक्कम वसूल करून ती राजांना दिली. कारवार वाचले. राजे संपत्ती घेऊन मार्चच्या आरंभी राजगडास पोचले. त्यानंतर लवकरच जयसिंग पुण्यास आपल्या सैन्यासह पोचला.

पुण्यास पोहचल्यावर जयसिंगाने स्वराज्याचा काही मैदानी मुलुख घेऊन पुणे, जुन्नर, सुपे वगैरे ठिकाणी लष्करी तळ बसवले. स्वराज्याला मिळणारी रसद बंद करावी हा त्याचा हेतू होता. जयसिंगाने आपल्या बरोबर असलेल्या दिलेरखानास पुरंदर किल्ला काबीज करण्याची परवानगी दिली. दिलेरखान सैन्य घेऊन तिकडे गेला. ह्या सैन्यात अफाट सैनिक, तोफखाना व इतर युद्ध साहित्य होते. पुरंदर गडाच्या पायथ्याजवळचा सर्व भाग शामियाने, राहुट्या, घोडे, हत्ती, तोफा वगैरेंनी भरून गेला होता!

पुरंदर किल्ल्याचे दोन भाग होते. एक बालेकिल्ला व दुसरा माची. किल्ल्याची उंची २५०० फूट होती. बाले किल्ला माचीपेक्षा ४०० फूट अधिक उंच होता. दोघात जायला एकच 'भैरवखिंड' होती. गडाचे कडे सरळ व तासीव होते. पुरंदरला शत्रूचा वेढा पडू शकतो ह्याची कल्पना राजांना होतीच. म्हणून त्यांनी आपला शूर सरदार मुरारबाजी देशपांडे ह्याला किल्ल्याच्या रक्षणासाठी आधीच तेथे पाठवले होते. पुरंदरला लागूनच वज्रगड नावाचा किल्ला होता. दिलेरखानाने पुरंदर व वज्रगड ह्या दोन्ही किल्यावर मारा सुरू केला. वज्रगडावर केवळ तीनशे मावळे होते. दिलेरने वज्रगड वर अधिक जोराचा तोफांचा मारा केला. तीनशे मावळ्यांनी प्राण हातावर घेऊन माऱ्यास तोंड दिले पण तीन दिवसांनी त्यांना शरण जाणे भाग पडले. दिलेरने आपल्या तोफा एका उंच ठिकाणी चढवल्या होत्या। हे करत असताना त्याची बरीच माणसे मेली होती।

वज्रगड मिळाल्यावर दिलेरने आपले सर्व बळ पुरंदरकडे वळवले. त्या किल्ल्याच्या तीन बाजूंनी हल्ला सुरु केला. खानाच्या सैन्याच्या मानाने राजांचे सैन्य अर्थात कमीच असणार. तरी स्वराज्याची सेना प्राणांची पर्वा न करता लढत होती. आपल्या स्वराज्याच्या रक्षणासाठी व आपल्या राजांसाठी

आपण लढत आहोत ही मुख्य जाणीव तिला सतत होती. हे तिला स्वत:चेच युद्ध होते. दिलेरखान वज्रगडावरून पुरंदरच्या माचीवर मारा करत होता. काही दिवसांनी खानाने तोफा माचीवर साखळदंडाने ओढून चढवल्या! तेथून तो मारा करू लागला. मराठे बंदुकांनी प्रतिकार करत होते. राजांनी काही सैन्य व दारूगोळा किल्ल्यावर पाठवला. सर्व बाजूंनी पुरंदरला शत्रूचा वेढा होता तरी देखील शूर मराठ्यांनी जीव धोक्यात झोकून तो आपल्या लोकांस गडात पोचवला! ज्या बाजूने मावळे गडावर पोचले त्या बाजूस 'दाउदखान' नावाच्या सरदाराचे मोर्चे होते. म्हणून दाउदखान मराठ्यांना फितूर झाला असा अरोप दिलेरखानाने केला. अखेरीस दाउदला जयसिंगाने दुसरीकडे पाठवले. बरेच दिवस मारामारी दोन्ही पक्षांत चालू राहिली. माचीवरून मारा करणारी दिलेरची बरीच माणसे ठार झाली. परंतु माची एकेदिवशी मोगलांचे हाती पडली.

आता दिलेरचे सैन्य बाले किल्ल्यावर मारा करू लागले. माची शत्रूच्या हाती पडल्यामुळे व बाले किल्ल्यावर मारा होऊ लागल्याने मुरारबाजीला खूप चीड आली. राजे आपणास काय म्हणत असतील असे त्याला रात्रंदिवस वाटत होते. आता त्याने सातशे निवडक कडवे सैनिक बरोबर घेतले व 'हर हर महादेव' अशी घोषणा करत, दिलेरच्या लोकांवर कडाडून हल्ला चढवला. त्याच्या व सैनिकांच्या अंगात जणू वीरश्रीच संचरली! धडाधड मोगलाकडचे लोक मरून पडले. शत्रूच्या लोकांना कापत कापत मराठे दिलेरच्या छावणीत घुसले. तेथे पुष्कळ लोकांना कापून काढले! काही मराठेही पडले. अखेर मुरारबाजी व दिलेरची गाठ पडली. दिलेरखान मुरारबाजीस म्हणाला, "तुम्हारी बहादूरी देख कर मैं निहायत खुश हुआ हूँ। हमारे साथ चलो। हम तुम्हारी शान रखेंगे'. मुरारजी हे शब्द ऐकून अधिकच चिडला. तो 'सूं सूं' करत खानावर जाऊन पडला. त्याने तरवारीने वार केला. दिलेरनेही आपला बाण मुरारबाजीवर सोडला तो नेमका मुरारबाजीच्या कंठात घुसला! मुरारबाजीचे तीनशे व दिलेरचे पाचशे लोक ठार झाले. मुरारबाजी जमिनीवर पडला, त्याचा प्राण स्वर्गास गेला! मराठे मुरारबाजीचे प्रेत घेऊन गडावर पसार झाले. मुरारबाजी इतिहासात अजरामर झाला. राजांचे आणखी एक वीररत्न हरवले!

मुरारबाजी पडला पण मराठे जिद्दीने लढतच होते. दोन महिने असे युद्ध चालत राहिले. दिलेरखान शिकस्त करत होता परंतु गड हाती येण्याचे दिसत नव्हते. शिवाजीचा एक किल्ला दोन महिन्यातही हाती येत नाही तर सर्व किल्ले घेण्यास किती वर्षे लागतील हे गणित दिलेरखानास निराश करू लागले!

मुरारबाजीच्या मृत्यूची वार्ता ऐकून राजांना सहाजिकच अति दुःख झाले. लाख लाख मोलाची नवरत्ने राजांनी स्वराज्यासाठी जपून ठेवली होती, त्यांपैकी आज एक हरवले होते. त्याची जागा भरून निघणार नव्हती!

मुरारबाजी स्वराज्याकरता झुंजता झुंजता काळाच्या पोटात गडप झाला परंतु शूर मावळे अद्याप पुरंदर लढवतच होते. दिलेरखान हट्टास पेटला होता पण मराठेही दुप्पट हट्टास पेटले होते ! खानाचा येथे सामना बाजारबुणग्यांशी नव्हता किंवा भाडोत्री लोकांशी नव्हता तर स्वराज्यासाठी वेडे झालेल्या स्वामी-निष्ठ शूर व चिवट मराठ्यांशी. पुरंदरचे युद्ध जवळ जवळ चार महिने निकराने चालले होते. ते संपण्याचे चिन्ह दिसत नव्हते. मोगलांचे सैन्यबळ व सामुग्रीबळ अफाट होते परंतु राजांचे जवळ ते सीमितच होते. मोगल साम्राज्याच्या वृक्षाची आणि नवीन स्वराज्य रोपाची कशी तुलना होणार? राजे चिंतेत पडले. शेकडो घरातले पोशिंदे पुरंदरच्या युद्धात आतापर्यंत कामी आले होते. जयसिंग स्वराज्याचा इतर मुलूख जाळपोळ करून उध्वस्त करत होता. त्यामुळे प्रजा हालअपेष्टात होती. असे अधिक दिवस चालू ठेवणे शहाणपणाचे नव्हते.

## पुरंदरचा तह

तेव्हा मोगली सत्तेशी सध्या समेट करावा व ह्या स्वारीतून सुटका करून घ्यावी हे शहाणपणाचे आहे असे राजांनी ठरवले. जेथे शक्तीशी शक्तीने सामना करणे शक्य होत नाही तेथे युक्ती वापरणे चातुर्याचे असते. राजे नेहमीच असे करत. त्यांनी एक डाव टाकून पाहिला. त्यांनी जयसिंगास कळवले की आपण बादशाहाचे नोकर आहोत- - - आदिलशाहाचा मुलुख जिंकण्याची मोहीम काढाल तर आपण सेवेस हजर होऊ ! जयसिंगाने राजांचा डाव ओळखला व उत्तर पाठवले, "तुम्हाला आपला जीव वाचवायचा असेल तर बादशाहाची गुलामगिरी पत्करून आधी शरण या" हे उत्तर ऐकून राजांना वाईट वाटले. त्यांची अपेक्षा होती की जयसिंग हिंदू असल्यामुळे त्याचे मन जरा तरी द्रवेल, त्याच्या स्वधर्माभिमानामुळे आपल्या विषयी थोडे मार्दव उत्पन्न होईल ! पण व्यर्थ. राजांनी आपला वकीलही जयसिंगाकडे पाठवला परंतु त्याच्या वृत्तीत फरक झाला नाही ! दुर्दैवाने जयसिंगाच्या अंगात गुलामगिरी वर्षानुवर्षे भिनली होती. खोट्या स्वामीनिष्ठेपायी स्वाभिमान पूर्ण करपून गेला होता. निरुपाय होऊन राजांनी त्यास कळवले, 'आमच्या जिवास अपाय होणार नाही असे वचन देत असाल तर मी स्वतः आपल्या भेटीस येतो." जयसिंग खूष झाला. त्याने राजांना कळवले, 'माझा मुलगा कुंवर रामसिंग आहे त्याप्रमाणेच मी तुम्हाला मानतो. तुमचे वाईट करणार नाही.' ह्या उत्तराबरोबर जयसिंगाने अभयवचन म्हणून शंकराच्या पिंडीवरच्या बेलतुळशी राजांच्या वकीलाबरोबर पाठवल्या.

राजांनी आपण येत असल्याचे जयसिंगाला कळवले. व त्याप्रमाणे ते दुसऱ्या दिवशीच निघाले. बरोबर काही कारभारी मंडळी, वकील रघुनाथ पंडित व पालखी वाहणारे इतकेच लोक होते. ते पुरंदरला जयसिंगाच्या छावणीपासून काही अंतरावर पोचले. रघुनाथपंतास छावणीत पाठवले. हा ११ जून १६६५ चा दिवस होता. पंताने राजे भेटीस येत असल्याचे जयसिंगास कळवले. जयसिंगाने आपले दोन सरदार, उग्रसेन कछवाह व उदयराज मुनशी राजांच्या स्वागतासाठी पाठवले. त्यांच्याबरोबर पुढील निरोपही पाठवला, ''आपले सर्व किल्ले आमच्या ताब्यात देणार असाल तरच पुढे पाऊल टाकावे; नाहीतर येथूनच परत जावे!'' हा निरोप ऐकून राजांना सहाजिकपणेच फार वाईट वाटले परंतु आपले मन मारून त्यांनी उत्तर दिले, "मी बादशाहाचा खिदमदगार आहे. मी माझे बरेच किल्ले बादशाहास देण्यास तयार आहे.'

जयसिंगाच्या सरदारांबरोबर राजे छावणीजवळ आले. जयसिंगाने आपला बक्षी जानी बेग ह्याला राजांना आत आणण्यास पाठवले. त्याच्याबरोबर राजे आत गेले. जयसिंग उभा राहिला राजांनी त्याला आलिंगन दिले. जयसिंगाने राजांना आपल्याजवळ बसविले. राजे त्याला म्हणाले, "पुरंदर किल्ला मी लगेच आपल्या ताब्यात देतो. किल्ल्यावरच्या आमच्या लोकांची कत्तल करू नये" जयसिंगाने राजांची विनंती मानली व लगेच हल्ले थांबवण्याची सूचना दिलेरखानास दिली. राजांनीही आपल्या माणसाना कळवले की ''गड सोडून सर्वांनी खाली उतरावे'' दुसऱ्या दिवशीच मावळ्यांनी नाखुषीने गडाचा ताबा सोडला व जयसिंगाच्या माणसांनी तो आपल्याकडे घेतला.

त्याच दिवशी रात्री वाटाघाटी झाल्या व पुढील प्रमाणे ता. १३ जून १६६५ रोजी तह झाला:-

१) शिवाजी राजांनी आपला सोळा लाख रुपये वसूलाचा प्रदेश व आपले तेवीस किल्ले बादशाहाला द्यावे. फक्त बारा किल्ले शिवाजींनी आपल्याकडे ठेवावे. तसेच चार लाख वसूलाचा मुलुख बादशाहाची मेहरबानी म्हणून ठेवावा.

२) शिवाजींनी अत्यंत इमानाने बादशाहाशी वागावे. दक्षिणेतील बादशाहाचा सुभेदार सांगेल त्या कामगिऱ्या त्यांनी पार पाडाव्या.

३) शिवाजींचे पुत्र संभाजी ह्यांना बादशाहाकडून पांचहजारी मनसबदारी मिळेल. संभाजी लहान आहेत तोपर्यंत त्यांचा प्रतिनिधी म्हणून नेताजी पालकराने सुभेदाराची नोकरी करावी.

४) शिवाजींनी आदिलशाहाचा मुलुख जिंकल्यावर तो आपल्या ताब्यात ठेवावा परंतु त्याबद्दल चाळीस लक्षांची पेशकश बादशाहास द्यावी.

हा तह इतिहासात पुरंदरचा तह म्हणून प्रसिद्ध आहे. दुसऱ्या दिवशी १४ जून १६६५ रोजी राजे जयसिंगाचा निरोप घेऊन निघाले. जयसिंगाने अतिशय मानाने त्यांना निरोप दिला. त्याच दिवशी राजे कोंडाण्यावर पोचले. निघण्यापूर्वी राजांनी कोंडाणा सोडून ठरलेले किल्ले जयसिंगाच्या ताब्यात दिले. कोंडाण्यावर म्हणजे सिंहगडावर त्यावेळी जिजामातुश्री राहात होत्या. म्हणून राजांनी जयसिंगास सांगितले की आपण लवकरच तेथे जाऊ व किल्ल्याचा ताबा देऊ. जयसिंगाने हे कबूल केले. कोंडाण्यावर पोचल्याबरोबर राजांनी तो किल्ला जयसिंगाच्या स्वाधीन केला. राजे उदास मनाने व जड अंतःकरणाने, आईसाहेबांना व इतर कुटुंबीयांना घेऊन प्रिय कोंडाण्याच्या खाली उतरले व राजगडला गेले. पुरंदरच्या तहाचा तपशील ऐकून आईसाहेबांना फार वाईट वाटले. राजांच्या मनात तर खोल जखम झालीच होती परंतु ती ते दाखवत नव्हते. रक्ताचे पाणी करून व अनेक जिवांचे बलिदान करून कमावलेल्या स्वराज्याचा केवढा मोठा तुकडा मोगलांच्या घशात आज गेला होता!

## आदिलशाहावरची मोहीम

पुरंदरच्या तहाच्या कलमांविषयी ऐकून दिल्लीस औरंगजेब खूष झाला. त्याने तहास मंजुरी दिली व जयसिंगास आणि इतर सरदारांस देणग्या जाहीर केल्या जयसिंगास यशामुळे सहाजिकच आनंद झाला.

आता जयसिंग आदिलशाहाच्या विरुद्ध स्वारीवर निघाला. ठरल्याप्रमाणे शिवाजी राजेही जयसिंगाच्या मदतीस नऊ हजार फौजेसह त्याच्याबरोबर गेले. संभाजींचे ऐवजी नेताजी पालकरही बरोबर गेला. २४ डिसेंबर १६६५ रोजी विजापूरला मोगल सैन्य व आदिलशाहाचे सैन्य ह्यांची गाठ पडली. आदिलशाहाला मोगल आपल्यावर चालून येणार ह्याची कल्पना असल्यामुळे त्याने शत्रूस तोंड देण्याची तयारी केलीच होती. विजापूरला पोचण्यापूर्वी वाटेत राजांनी व नेताजीने फलटण, खटाव वगैरे आदिलशाहाच्या राज्यातली ठिकाणे भराभर जिंकली. जयसिंगाने मराठ्यांनी मिळवलेल्या विजयांची बातमी लगेच बादशाहाला कळवली होती. त्याबरोबर हेही सुचवले होते की शिवाजी निष्ठेने आपणास मदत करत आहेत म्हणून त्यांचा मान करावा; म्हणजे ते बादशाहाच्या सेवेत अधिक लक्ष घालतील! औरंगजेबाने लगेच शाबासकीचे पत्र व बक्षीस म्हणून मानाचा पोषाख व जडावाची कटचार पाठवली.

विजापूर येथे दोन्ही सैन्यांची गाठ पडल्यावर किरकोळ चकमकी रोज उडत होत्या. दिलेरखानाने एक दिवस मोठी चढाई केली. त्याची सर्व फौज विजापूरकरांच्या फौजेवर तुटून पडली. आदिलशाहाचे सैन्य ही निश्चयाने तोंड देत होते. मोगल सैन्यात राजे आघाडीवर होते. आदिलशाहाच्या सैन्याने एकदा मोगलावर जोरदार हल्ला चढवला व मोगलसैन्याची फळी फुटली, दिलेरखानाने त्यावेळी मदतीसाठी दुसरी फौज पाठवली नाही. अखेर पराभव पदरात घेऊन मोगलांना छावणीत परतावे लागले! दिलेरखानाने पराभवाचे खापर शिवाजीराजांवर फोडले! दिलेरखान राजांचा द्वेष करतच होता त्याने जयसिंगास सांगितले, "शिवाजी आदिलशाहास फितूर झाल्यामुळे हा पराभव झाला. तुम्ही त्याला मारून टाका. तुम्ही असे करत नसाल तर मी ते काम पार पाडतो!

जयसिंगास हा दिलेरचा आरोप बिलकूल खरा वाटला नाही. तथापि त्याला दिलेरला काही बोलता आले नाही, कारण तो बादशाहाच्या मर्जीतला होता. तरीही जयसिंगाने दिलेरखानास बजावले की शिवाजीराजांच्या जिवाला कोणताही धक्का लागता कामा नये; आम्ही त्यांना तसे वचन दिले आहे. आता जयसिंगास, शिवाजीराजांचे जीवास दिलेर काही धोका पोचवेल की काय अशी चिंता मनातून वाटत होती. ह्या युद्धात दिलेरखानास अपयशच येत गेले. त्यामुळे एक दिवस जयसिंगाचे दिलेरखानाशी कडाक्याचे भांडण झाले. ह्या वातावरणातून सुटका करून घेण्याकरता राजांनी जयसिंगास सुचवले, "आपण हुकूम द्याल तर मी जातो व बादशाहाकरता आदिलशाहाचा पन्हाळगड काबीज करतो व त्याच्या इतर मुलखांतही धुमाकूळ घालतो. जयसिंगाने एकदम होकार दिला. ११ जानेवारी १६६६ रोजी राजांनी जयसिंगाचा निरोप घेतला व ते पन्हाळ्याकडे गेले. अशा प्रकारे राजांनी आपली सुटका करून घेतली.

राजे पन्हाळगडावर आपल्या सैन्यासह पोचले. त्यावेळी पहाटेची वेळ होती. त्यावेळी पहारेकरी बेसावध असतील अशी त्यांची समजूत होती परंतु पहारेकरी लवकरच जागे झाले. त्यांनी राजांच्या फौजेवर जोराचा हल्ला चढवला. आपल्याजवळ कमी सैन्य असल्यामुळे ह्यावेळी माघार घेणे बरे असा विचार करून राजांनी माघार घेतली व ते विशाळगडकडे निघून गेले. तेथून त्यांनी विजापूरकरांच्या मुलखात आपले सैन्य रवाना केले.

जयसिंगाचा निरोप घेऊन निघताना, राजांनी नेताजी पालकरास पन्हाळगडावर फौजेसह लवकर येण्यास सांगितले होते पण तो आला नव्हता. म्हणून

राजांना त्याचा राग आला. त्यांनी नेताजीला सेनापतीच्या पदावरून काढून टाकले! ह्यावरून राजे शिस्तीचे किती भोक्ते होते ह्याची कल्पना येईल. नेताजी रागावून आदिलशाहाकडे नोकरीसाठी गेला! आदिलशाहाने त्याला सन्मानाने नोकरीस ठेवले.

## औरंगजेबाचे निमंत्रण

शिवाजीराजे आदिलशाहावरच्या मोहिमेत जयसिंगाबरोबर असताना, त्याने राजांना दिल्लीस जाऊन औरंगजेब बादशाहास भेटण्याची सूचना केली होती. दोघांच्या भेटीत सलोखा घडवून आणावा, शिवाजींना बादशाहाकडून सरदारकी बहाल करवावी व राजांचा उपयोग मोगल साम्राज्यासाठी करून घ्यावा असे दूरदृष्टीचे राजकारण साधायचा जयसिंगाचा ह्या सूचनेमागे विचार होता. तुमची इच्छा असेल तर आदिलशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही नाहीशी करण्यासाठी बादशाहाकडून पैसा व युद्धसाहित्य ह्यांचा भरपूर पुरवठा मी करवून देतो; त्यानंतर तुम्ही दक्षिणचे मालक बनाल असेही मधाचे बोट जयसिंगाने राजांना लावले. हे आपले राजकारण साधले तर बादशाहा आपल्यावर बेहद्द खूष होईल असेही स्वप्न जयसिंग पहात होता!

प्रथम राजांनी जयसिंगाच्या वरील सूचनेकडे मुळीच लक्ष दिले नाही. तरीही ते मनात तिच्याबद्दल हळू हळू विचार करू लागले. पुढे त्यांनाही वाटू लागले की, जयसिंग म्हणतो त्याप्रमाणे, आदिलशाही व कुतुबशाही बुडवण्याकरता बादशाहाचा पैसा व युद्धसाहित्य मिळाले तर अनायासेच आपले दक्षिण भारतातले दोन्ही शत्रू नाहीसे होतील व स्वराज्य बळकट करता येईल. नंतर मोगल सत्तेचा समाचार आपणास अधिक चांगल्या तऱ्हेने घेता येईल. अशा दूर दृष्टीने राजे अखेर बादशाहाच्या भेटीस जाण्यास तयार झाले. त्यांनी जयसिंगास तसे कळवले.

जयसिंगाने बादशाहास राजे भेटीस तयार असल्याचे कळवले. बरेच दिवसांनी बादशाहाचे उत्तर आले. उत्तरास वेळ लागण्याची दोन कारणे असावीत. एक असे की मध्यंतरी औरंगजेबाचा बाप शहाजहान मरण पावला होता. दुसरे असे की औरंगजेब नाही तितका संशयी स्वभावाचा होता; त्याला आपल्या बापाचा व मुलांचाही भरवसा वाटत नसे. म्हणून शिवाजीला भेटणे किती सुरक्षितपणाचे राहील ह्याबद्दल तो विचार करत असावा अफझलखानाच्या व शाहिस्तेखानाच्या संबंधानला राजांचा इतिहास त्याच्या समोर होताच. अखेर जयसिंगाच्या आग्रहास्तव औरंगजेबाने शिवाजीस भेटण्याचे कबूल केले त्याने जयसिंगास कळवले की शिवाजीस आग्र्यास भेटीसाठी पाठवा. लगेच जयसिंगाने

बादशाहाचे उत्तर राजांना कळवले. त्याने लवकर आग्र्यास जाण्याची सूचनाही केली.

## औरंगजेबाच्या दरबारात राजांचा अपमान

शिवाजीराजांनी आग्न्यास जाण्याची तयारी केली. जाण्यापूर्वी नेताजी पालकराचे जागी 'कडतोजी गुजर' ह्याला राजांनी स्वराज्याचा सेनापती नेमले व त्याला 'प्रतापराव' असा किताब बहाल केला. मुख्य प्रधान मोरोपंत पिंगळे, मुजुमदार निळोजी सोनदेव व प्रतापराव सेनापती ह्यांना आईसाहेबांच्या आज्ञेत राहून राज्यकारभार करावयास राजांनी सांगितले. त्यांनी पुढील भावपूर्ण शब्दात कारभाऱ्यांना उपदेश केला, "एक दिलाने, धैर्याने व काळजीने वागा. जर कदाचित आग्र्याच्या भेटीत दगा झाला व मी मारला गेलो तरीही स्वराज्याचा उद्योग सोडू नका. हे राज्य व्हावे अशी श्रींची इच्छा आहे. ती तडीस न्या. श्री कृपेने आम्ही परत येऊ तेव्हा काही कमी न दिसावे. आता हे स्वराज्य तुमच्या पदरात घालत आहे सांभाळा." राजानी आईसाहेबांना पुढील शब्दात धीर दिला, 'काळजी करू नका. राजपुत्राचे (जयसिंगाचे) अभय वचन आहे. शब्दास मोल आहे. आपला आशीर्वाद व श्रींचे छत्र डोक्यावर आहेच."

राजे औरंगजेबाच्या भेटीस आग्र्यास जाणार हे माहीत झाल्यावर सर्वांना काळजी वाटू लागली त्यांना वाटले, कपटी औरंगजेबाशी भेट म्हणजे विषारी नागाशीच भेट. राजे विषाची परीक्षा कशाला पाहातात ? आणि ही भेट परप्रातांत इतक्या दूर, जेथे आपले कोणी नाही! राजे एकटे जात नव्हते तर एकुलत्या एक मुलाला संभाजीलाही घेऊन क्रूर वैऱ्याच्या घरात जाणार होते. आईसाहेबांचे काळीज सहाजिकच चर्र झाले असेल. परंतु त्या वीर घराण्यातल्या होत्या. त्यांनी राजांना धैर्याने आशीर्वाद दिला, "जा. मी वीरपुत्राची माता आहे असे सिद्ध करून ये !" राजांनी राज्यकारभाराचा शिक्का आईसाहेबांना दिला व निघाले.

राजे ५ मार्च १६६६ रोजी, आपल्या कुलदेवतेचे दर्शन घेऊन व मातुश्रींच्या चरणावर मस्तक ठेवून निघाले. राजे व इतर काही मंडळी पालखीतून निघाली. समोर स्वराज्याचे भगवे निशाण हत्तीवर फडकत होते. जयसिंगाने आपला विश्वासू सरदार तेजसिंग कछवाह ह्याला राजांच्याबरोबर आग्र्यापर्यंत पाठवले. त्याच्या हाती, आपला मुलगा रामसिंह ह्याला पत्राने बजावले की "शिवाजी राजांचा मुक्काम आग्र्यात असेपर्यंत त्यांच्या जिवास थोडाही दगा होणार नाही अशी काळजी घे. मी त्यांना तसे वचन दिले आहे. मी व तू त्यासाठीं जामीन आहोत." रामसिंह त्यावेळी दिल्लीत होता.

शिवरायांची आठवा... प/४१
५।२।=८
२९५४

राजांच्या प्रवासाची व्यवस्था औरंगजेबाने छान केली होती. त्यांच्या बरोबर आपला खास प्रतिनिधी गाझीबेग ह्याला ठेवले होते. प्रवासात राजांची व्यवस्था शहाजाद्याप्रमाणे ठेवण्याचे हुकूम बादशाहाने पाठवले होते. राजांचे बरोबर साडेतीनशे निवडक मंडळींनी जायचे ठरले. शिवाय खास मंडळी बरोबर होती. त्यांत कवींद्र परमानंद, निराजी रावजी, त्र्यंबकपंत डबीर वगैरे होते.

राजे निघाल्याची पत्रे बादशाहाकडे गेली. १२ मे १६६६ ला औरंगजेबाचा पन्नासावा वाढदिवस होता. त्या दिवशी तो मोठ्या थाटात आग्र्यात साजरा व्हायचा होता. त्याच्या एक दिवस आधी शिवाजीराजांनी आग्र्यास जरूर पोचावे अशी सूचना त्यांना करण्यात आली होती. शिवाजी आग्र्यास बादशाहाच्या भेटीस जात आहेत अशी वार्ता उत्तर हिंदुस्थानात पसरली होती. त्यामुळे ते ज्या ज्या गावातून गेले तेथे त्यांना पहाण्यासाठी विलक्षण गर्दी लोटली! आदिलशाही व मोगलशाही ह्यांना गदगदा हालवणारा दक्षिणेतला अजब हिंदूराजा शिवाजी आहे तरी कसा हे जाणण्याची उत्सुकता लोकांना लागली होती!

राजे बादशाहाच्या वाढदिवसाच्या आधल्या दिवशी आग्र्याजवळ पोचले. आपल्या स्वागतास बादशाहाचा वजीर येईल अशी राजांची अपेक्षा होती परंतु रामसिंगाचा मुनशी गिरधरलालच आला! त्यामुळे राजांना मनांतून वाईट वाटले तरी ते काही बोलले नाहीत. राजांची राहाण्याची व्यवस्थाही एका मामुली सराईत करण्यात आली होती! त्या सराईचे नाव होते. मुलुकचंदाची सराई. राजांनी तेथे रात्र काढली.

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता औरंगजेबाचा शाही दरबार भरणार होता. आपणास दरबारात नेण्याकरता कोणी तरी बादशाहाचा मोठा सरदार येईल असेही राजांना वाटले होते. पण ते ही खोटे ठरले! त्यांना दरबारात आणण्याची कामगिरी बादशाहाने रामसिंग व एक मामुली सरदार मुखलीसखान ह्यांच्यावर सोपवली होती परंतु त्या दिवशी रामसिंग दुसऱ्या कामात गुंतला होता. त्यामुळे राजांना दरबारात नेण्याकरता तो स्वत: वेळेवर येऊ शकला नाही. हाही आणखी एक अपमान राजांना बोचला. बादशाहाने जाणून बुजून आपला अपमान आरंभला आहे असे त्यांना वाटले; त्यांना रागही आला. तथापि त्यांनी तो आवरून धरला. ते मुनशींबरोबर दरबारात जाण्यास निघाले. तोपर्यंत दरबार सुरूही झाला होता. रामसिंग मोकळा झाल्यावर मुखलीसखानास बरोबर घेऊन राजांकडे निघाला. रामसिंग व राजे ह्यांनी निरनिराळे रस्ते धरल्यामुळे बराच वेळ दोघांची भेट झाली नाही! शेवटी

ती झाली. कछवाहाने राजांची ओळख करून दिली. रामसिंगाने घोड्यावरूनच राजांना अलिंगन दिले.

रामसिंगाच्या राहाण्याच्या जागेजवळच राजांच्यासाठी तंबू ठोकला होता. तेथे पोचल्यावर लगेच राजे व संभाजींना घेऊन रामसिंग व मुखलीसखान निघाले व आग्र्याच्या किल्ल्यात पोचले. त्यावेळी दिवाण–इ.–आम व दिवाण–इ–खास ह्या दोन्ही ठिकाणचे दरबार संपून, घुशलखान्यातला दरबार चालू होता. शिवाजी राजे आल्याची खबर बादशाहाकडे पाठवली. राजांना आत घेऊन येण्यासाठी बक्षी आसदखानास बादशाहाने पाठवले. त्याच्याबरोबर सर्व आत गेले. राजांनी दरबारात प्रवेश केला परंतु औरंगजेबाच्या चेहऱ्यावर कोणचाच भाव दिसला नाही! आणलेले नजराणे राजांनी आपल्या व संभाजी तर्फे बादशाहापुढे ठेवले व तीन वेळा पद्धतीप्रमाणे मुजरा केला. राजांची ओळख करून देण्यात आली. तरीही औरंगजेबाच्या तोंडावर साधे हसेही दिसले नाही. सहाजिकच बादशाहाचे वागणे राजांना विचित्र वाटले. तरीही राजे शांत राहिले.

राजे व संभाजी ह्या दोघांना पांच हजारी मनसबदारांच्या रांगेत उभे करण्यात आले! ती जागा पुष्कळ खालची होती. थोड्याच वेळात मानाची खिल्लत वाटण्यात आली. ती वजीरास व राजांच्या पुढे उभा असलेल्या जसवंतसिंहास देण्यात आली. राजांना वगळण्यात आले! आता मात्र राजांच्या सहनशीलतेचा शेवट झाला. ते रामसिंहाकडे पाहून कडाडले, "हमसेभी आगे यह कौन खडा है?" बादशाहाच्या दरबारात अशी गर्जना! कधी कोणी ऐकली नव्हती. ज्या दरबारात कोणी हसायचे नाही, मान वर करून बघायचे ही नाही, मग बोलायचे तर दूरच राहो, तेथे एवढ्या जोराने सिंहगर्जना! कोणी केली होती ती? दक्षिणेतल्या सह्याद्रीच्या सिंहाने, शिवाजी राजांनी! अपमान सहन न झालेल्या स्वयंभू छत्रपतींनी! गर्जना एकून रामसिंह दचकला. तो दुसऱ्या सरदारांच्या रांगेत उभा होता. तेथून तो धावत राजांजवळ आला व म्हणाला, हे 'आहेत महाराजा जसवंतसिंग.' राजे अधिक चिडून म्हणाले, "ह्या जसवंतसिंगाने माझ्या सैनिकांना कितीवेळा तरी पाठ दाखवली आहे. अशा पळपुट्या माणसाच्या खाली माझा दर्जा?" रामसिंह घाबरून गेला. राजांना कसे शांत करावे हे त्याला सुचेना. राजे पुन: गरजले, "हे काय चालले आहे? मी इतका दूर केवळ पाच हजारी मनसबदार बनण्याकरता आलो आहे?" पुन्हा गर्जना! सर्व दरबारात खळबळ माजली. सर्व राजांकडे पाहू लागले. त्यांना राजांचे धैर्य पाहून आश्चर्यच वाटले. गर्जना करून राजे खाली बसले होते. राजांचा संताप पाहून औरंगजेब रामसिंहास म्हणाला, "शिवाला काय

झाले आहे ते पाहा." रामसिंहाने राजांची खूप समजूत घालण्याचा प्रयत्न केला. निरुपाय होऊन रामसिंहाने बादशाहास घाबरत कळवले की शिवाजी नाराज झाले आहेत. बादशाहाने दुसऱ्या सरदारांना फर्मावले की शिवाला खिल्लत देऊन त्याची समजूत घाला व तख्तापुढे थोड्या वेळाने घेऊन या राजांनी खिल्लत स्वीकारण्याचे साफ नाकारले. सरदारांनी हे बादशाहास कळवले. बादशाहाने रामसिंहास सांगितले की "तू शिवाला आपल्या छावणीत घेऊन जा व त्याची समजूत घाल." (औरंगजेब 'शिवाजीं'चे ऐवजी 'शिवा' म्हणत असे.)

अखेर रामसिंहाच्या विनंतीवरून राजे संभाजीसह त्याच्याबरोबर गेले. दरबारात झालेली राजांची व औरंगजेबाची हीच पहिली व शेवटची भेट! रामसिंहाने राजांना समजवण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण व्यर्थ. राजे त्याला म्हणाले, "हा बादशाह कोण? त्याला जगाचा व्यवहारही कळत नाही!" अर्ध्या तासानंतर राजे आपल्या मुक्कामावर आले.

शिवाजीराजांच्या दरबारातल्या वर्तनाच्या प्रतिक्रिया निरनिराळ्या झाल्या होत्या. बादशाहाच्या ज्या सरदारांना दक्षिणेतल्या स्वाऱ्यात मराठ्यांचे-कडून मार खावा लागला होता त्यांनी बादशाहाचा गैरसमज करून देण्या-साठी ह्या संधीचा उपयोग केला. काही रजपूत सरदारांना मात्र राजांचे स्वाभिमानी वर्तन पाहून मनातून बरे वाटले.

## शिवाजीराजे मृत्यूच्या दाढेत!

दरबारात झालेल्या प्रकारामुळे, राजांना वाटू लागले की जयसिंगाने दाखवलेल्या प्रलोभनामुळे आपण येथे येऊन फसलो की काय. बादशाहाच्या मगरमिठीतून निसटायचे कसे हाही प्रश्न त्यांना पडला.

राजे मुक्कामावर पोचल्यावर, रामसिंहाने आपले सरदार राजांना समजवण्याकरता पाठवले. त्यांनी राजांना विनवले, "झाले ते विसरावे; बादशाहास नाराज करू नये." बादशाहाचा शिवाजींना समजवण्याचा निरोप पुन्हा रामसिंहास मिळाला होता. म्हणून तो स्वतः राजांना भेटला. अखेर राजांनी सांगितले की संभाजीला तुमच्याबरोबर दरबारात पाठवतो. मी काही दिवसानंतर येईन.

दुसऱ्या दिवशी बादशाहाने शिवा दरबारात येणार आहे का ह्याची चौकशी केली. रामसिंहाने नम्रपणे उत्तर दिले 'जी नहीं हुजूर वे बिमार हैं।" खरे पाहाता राजे आजारी वगैरे नव्हते. पण वेळ मारून नेण्यासाठी रामसिंहाने चतुराईने हे उत्तर दिले होते. त्याच दिवशी राजांनी रामसिंहाबरोबर संभाजींना बादशाहाकडे पाठविले. बादशाहाने त्यांना सरोपा, मोत्यांचा कंठा व जडावाची कट्यार बक्षीस दिली.

मध्यंतरीच्या काळात बादशाहाचे मन राजांचे विरुद्ध कलुषित करण्याचा प्रयत्न वजीर झाफरखान व जसवंतसिंग ह्यांनी केला होता. बादशाहाने हुकूम सोडला होता की शिवाला रादअंदाझखानाच्या कोठीवर पोचवा. हा राद-अंदाजखान आग्राचा किल्लेदार फार क्रूर म्हणून प्रसिद्ध होता. त्याच्या ताब्यात कोणाला देणे म्हणजे मृत्यूच्या जबड्यात लोटण्यासारखेच होते !

बादशाहाच्या हुकुमाचा रामसिंहास सुगावा लागला. तसाच तो एकदम ताडकन उठला कारण त्याच्या डोक्यात विचारांचा हलकल्लोळ माजला. तो बक्षी मुहम्मद अमीनखानाच्या घरी गेला व त्यास औरंगजेबाच्या हुकुमाबद्दल सांगितले. बक्षी एक वजनदार गृहस्थ होता. रामसिंह बक्षीस म्हणाला, "बादशाहाने शिवाजींना ठार करण्याचे ठरवलेले दिसते परंतु माझ्या वडिलांनी त्यांना वचन दिले आहे की तुमच्या केसालाही धक्का लागणार नाही. म्हणून मी म्हणतो की बादशाहाने प्रथम मला मारावे व मी मेल्यानंतर शिवाजींचे काही करावे"!

बक्षी उदार मताचा होता त्याने रामसिंहाचे म्हणणे औरंगजेबास सांगितले. औरंगजेब वचकला. तो बक्षीस म्हणाला, की शिवा पळून जाणार नाही अशी हमी रामसिंगाने द्यावी. रामसिंहाने ती दिली. तेव्हा बादशाहने आपला हुकूम मागे घेतला.

नंतर रामसिंहाने सर्व हकिकत शिवाजी राजांना सांगितली. राजांना वाटले रामसिंह स्वतःला आपला भाऊ मानतो, ते नाते त्याने आज खरे केले. संकटकाळी उपयोगी पडला त्या दिवसापासून राजांना त्याचेबद्दल अधिक आपुलकी वाटू लागली. राजांनी दुसऱ्या दिवशी महादेवाची पूजा रामसिंहाचे समक्ष करून वचन दिले की आपण आग्र्याहून पळून जाणार नाही.

जयसिंगाने आपणास दिलेली वचने बादशाहाने मोडली असे राजे सर्वांना स्पष्टपणे सांगू लागले. हे बादशाहाच्या कानावर गेल्यामुळे त्याने जयसिंगास पत्र पाठवून विचारले की तुम्ही कोण कोणची वचने शिवास दिली होती?

राजांनी ओळखले होते की ह्यापुढे आग्र्यात राहणे धोक्याचे आहे. म्हणून त्यांनी महाराष्ट्रात जायला मिळावे ह्यासाठी खटपट सुरू केली. त्यांनी बक्षी मुहम्मद अमीनखानाच्या मध्यस्तीने बादशाहास कळवले की, "मला घरी जायला परवानगी मिळावी. माझ्या मुलास, संभाजीस मी येथे ठेवून जातो. बादशाह सांगतील ती शपत घ्यावयास मी तयार आहे" परंतु ह्या प्रयत्नांचा उपयोग काही झाला नाही. उलट बादशाहाने आपला फौजदार फुलादखान ह्यास हुकुम दिला की शिवाच्या ठिकाणाभोवती कडेकोट बदोबस्त ठेव व तू स्वतः लक्ष ठेव !

लगेच फुलादखानाने राजांच्या निवासस्थानाला फौजेचा गराडा दिला. काही जागी खास पहारे बसवले. असे काही एकदम होईल असे राजांना वाटले

नव्हते, पण आता त्यांना आपणास बादशाहाने कैदेत टाकले आहे हे कळून चुकले. आपले आता काय होणार ह्या चिंतेने त्यांना घेरले. रामसिंहासही जास्त काळजी वाटू लागली. शिवाजीराजांचा केव्हा खूनही होईल अशी भीती त्याला वाट लागली. म्हणून रामसिंहाने सावधगिरी म्हणून आपली खास विश्वासाची माणसे राजाच्या अगदी जवळ पहाऱ्यावर ठेवली. आता अशी स्थिती झाली की राजांच्या निकट रामसिंहाच्या माणसांचा पहारा व नंतर फुलादखानाच्या लोकांचा. रामसिंहाने आपल्या विश्वासाच्या तेजसिंग कछवाहास राजांच्या पलंगापाशी ठेवले. असे करण्याचे मजेदार कारण रामसिंह सांगे. तो म्हणे की मी राजाबद्दल बादशाहाला लेखी जमानत दिली आहे. ते पळून गेले तर मला जबाब द्यावा लागेल! रामसिंह चतूर खरा. किती पटण्यासारखे कारण त्याने शोधून काढले!


राजांना औरंगजेबाने कैदेत ठेवल्याची वार्ता जयसिंगास दक्षिणेत कळली. लगेच त्याने पुन्हा रामसिंहास निक्षून लिहिले, "शिवाजीराजांच्या प्राणाला धक्का लागणार नाही ह्याची काळजी कसोशीने घे." त्याने बादशाहासही बजावले, "शिवाजीना कैद केल्याने किंवा ठार मारल्याने आपला काही फायदा होणार नाही. त्यांना सुखरूपपणे घरी जाऊ देण्यातच, दक्षिणेतल्या आपल्या राज्याच्या दृष्टीने, हिताचे होणार आहे. तरी त्यांना दक्षिणेत येऊ द्यावे."

## राजे आग्र्याहून निसटले!

आग्र्याच्या कडक बंदीत राजांनी व त्यांच्या बरोबरच्या काही लोकांनी काही दिवस काढले. बंदीतून सुटका कशी करून घेता येईल ह्याचा विचार आता राजे रात्रंदिवस करत होते. परका मुलूख, रात्रंदिवस शत्रूचा कडक पहारा, आजूबाजूस मदत करणारे आपले माणूस कोणी नाही अशा परिस्थितीत सुटका कशी होणार? आशेचा किरण कोठे दिसत नव्हता. परंतु राजे निराश होऊन गप्प बसणारांपैकी नव्हते. देवावर व आपल्या मातुश्रींच्या आशीर्वादावर दृढ विश्वास ठेवणारे ते होते. त्याचप्रमाणे ते प्रयत्नवादीही होते. त्यांनी प्रयत्न करून पाहायचे ठरवलेच. एके दिवशी त्यांनी आपल्या लोकांना सांगितले, तुम्ही सर्व निघून जा. बादशाहाची मला ठार मारण्याची इच्छा असेल तर मारू द्या!" राजांचे हे बोलणे ऐकून लोक थक्क झाले. रामसिंहास वरील गोष्ट समजली तेव्हा त्यालाही राजांच्या बोलण्याचे आश्चर्य वाटले. त्याला वाटले शिवाजी राजांनी असा त्रागा करून कसे चालेल? परप्रांतात आपली विश्वासू माणसे जवळ असायलाच पाहिजेत. म्हणून रामसिंगाने त्या माणसांना सांगितले की राजे म्हणतात तर येथे राहू नका; माझ्या कोठीच्या मागे असलेल्या बागेत

राहा. त्याच सुमारास राजांनी फुलादखानाच्या हाती बादशाहास विनंती केली की आपल्याबरोबर असलेली माणसे घरी पाठवण्यास परवानगी द्यावी. औरंगजेबाने राजांची ही विनंती लगेच मान्य केली ! त्याला वाटले असावे शिवा एकटा हाती सापडेल, बरेच आहे. आपली माणसे पुढे पाठवण्यात राजांचा धूर्त डाव होता. तो हा की बादशाहाच्या कैदेतून निसटून जाणे सोपे व्हावे. नंतर रामसिंहास राजांनी सांगितले की तुम्ही माझ्यासाठी बादशाहास दिलेली जामिनकी परत घ्या. त्याला माझे जे बरे वाईट करायचे असेल ते करू द्या ! राजांचे हे म्हणणे ऐकून रामसिंहास वाईट वाटले. त्याने तसे काही केले नाही.

एके दिवशी राजांनी औरंगजेबास अर्ज केला की काशीस जाऊन संन्यास घेण्याची परवानगी द्यावी. औरंगजेबही शेरास सवा शेर होता. त्याने कळवले



महाराजांनी आजारी असल्याचे सोंग घेतले

की शिवाने जरूर फकीर बनावे पण त्याने अलाहाबादच्या किल्ल्यात राहावे ! राजांनी रामसिंहास आपली जामीनकी रद्द करवून घेण्याबद्दल पुन्हा विनविले. राजांच्या आग्रहामुळे रामसिंहाने आपली जामीनकी रद्द करण्याचा अर्ज बादशाहाकडे पाठवला व तो मंजूर झाला. राजांना आपण आता एका नैतिक बंधनातून मोकळे झाल्यामुळे हायसे वाटले तथापि रामसिंहाने आपली माणसे

राजांच्या भोवती ठेवलीच होती कारण त्याला राजांविषयी मनापासून चिंता वाटत होती.

शिवाजी राजे इतक्या मंडळीसह बरेच दिवस आग्र्यास होते. त्यांना, देणग्या देण्यासाठी वगैरे, बराच खर्च करावा लागला होता. म्हणून त्यांनी रामसिंहास सहासष्ट हजार रुपये उसने मागितले. रामसिंहाने ते लगेच दिले. राजांनी पुढे रायगडला पोचल्यावर ते परत केले.

आतापर्यंत राजांनी कैदेतून निसटून जाण्याची एक योजना मनात आखली होती. त्याच सुमारास बादशाह आपणास ठार मारण्याचा विचार करत असल्याचा सुगावा राजांना लागला होता. राजांच्या योजनेप्रमाणे त्यांनी आजारी असल्याचे सोंग घेतले. काही दिवसांनी ते कण्हू कुथू लागले. ते म्हणू लागले की आपल्या पोटात भयंकर दुखते. दिवसेंदिवस आजार वाढत आहे अशी अफवा त्यांनी पसरवली. रोज राजांची माणसे औषध आणू लागली. बरेच दिवस औषध पाणी करूनही गुण येईना. प्रकृती जास्त झाली. राजांच्या आजाराची बातमी औरंगजेबापर्यंत पोचली. प्रकृतीला आराम पडत नाही तेव्हा राजांनी गोरगरीबांना, फकीरांना मिठाई वाटण्यास सुरवात केली. ते म्हणू लागले कदाचित त्यांच्या आशीर्वादाने बरे वाटेल. मोठ्या पेटाऱ्यातून रोज मिठाई बाहेर जाऊ लागली. काही दिवस पहारेकरी रोज पेटारे तपासत होते. पहारेकऱ्यांना मिठाई मिळत असणारच. पुढे पुढे पहारेकऱ्यांना वाटले पेटारे रोज काय तपासायचे ? आता पेटारे बरेच वेळा न तपासले जाता बाहेर जाऊ लागले. राजांना हे माहीत झाले.

आजकाल राजे अंथरुणावर निजूनच असत. त्यांचा इमानी नोकर मदारी मेहतर त्यांचे पाय चेपत असे (हा जातीने मेहतर नव्हता तर त्याचे ते नाव होते.) राजांनी पाहिले की आता सहसा पेटारे तपासले जात नाहीत, हीच संधी आहे. एके दिवशी दोन पेटारे रिकामे ठेवले. एकात राजे बसले व दुसऱ्यात संभाजी ! राजांची अंथरुणावर जागा हिरोजी फर्जंदाने घेतली ! तो राजांसारखा शेला पांघरुन निजला, पेटाऱ्यात बसण्यापूर्वी राजांनी आपल्या हातातले सोन्याचे कडे काढून फर्जंदाच्या हातात घातले ! मदारी हिरोजीचे पाय नेहमी प्रमाणे चेपत बसला. पेटाऱ्याची झाकणे बंद केली गेली व ते बाहेर पडले ! त्याच्या मागे व पुढे मिठाईचे पेटारे होतेच. पहारेकऱ्यांनी नेहमीप्रमाणे सुरवातीचे एक दोन पेटारे तपासले. त्यात त्यांना मिठाई दिसली. पहारेकऱ्यांनी सर्व पेटाऱ्यांना बाहेर जाऊ दिले. मिठाईचे पेटारे नेहमीच्या रस्त्याने गेले परंतु राजांचा व संभाजीचा असे दोन पेटारे आग्र्याच्या बाहेर बरेच दूर ठरलेल्या

ठिकाणी पोचले ! तेथे पूर्वी ठरल्याप्रमाणे घोडे तयार होते. शिवाजीराजे व संभाजी पेटाऱ्यातून सुखरुप बाहेर पडले. त्यांनी भवानी देवीचे व मातुश्रींचे स्मरण केले व वेळ न गमावता ते व इतर मंडळी घोड्यावर बसून अंधारात पसार झाली ! तो १७ ऑगस्ट १६६६ चा दिवस शुभ म्हटला पाहिजे. तो इतिहासात राजांचे बरोबर अजरामर झाला!

निघालेली सर्व मंडळी रात्र असतानाच मथुरेस पोचली. मथुरेसच जाण्याचे कारण हे होते की तेथे राजांचे पेशवे, मोरापंत पिंगळे, ह्यांचे मेहुणे कृष्णाजी पंत त्रिमल राहात होते. ते विश्वासू असल्यामुळे त्यांचेजवळ संभाजींना ठेवून आपण पुढे जायचे राजांनी ठरवले होते. संभाजींना तेथे सोडण्याची काही कारणे होती. एक असे की संभाजी लहान होते. त्यामुळे पुढचा दौडीचा व कष्टाचा प्रवास



तेथे पूर्वी ठरल्याप्रमाणे घोडे तयार होते.

त्यांना सहन झाला नसता. दुसरे, आपण पुन्हा पकडले गेलो तर संभाजी शत्रूच्या हातात पडू नयेत. तिसरे कारण हेही असावे की मथुरा महाराष्ट्राच्या उत्तर दिशेस आहे. बादशाहाच्या लोकांनी आपला पाठलाग केल्यास ते सहाजिकच दक्षिणेकडे जातील. मथुरेत पोचल्यावर शिवाजीराजांनी कृष्णाजीपंतांस विनंती केली की संभाजींना सांभाळावे, आपण घरी पोचल्यावर पत्र पाठवू तेव्हा त्यांना घेऊन स्वत: आपण यावे. पंतांनी हे धोक्याचे काम आनंदाने पत्करले! आता

अधिक वेळ तेथे घालवणे धोक्याचे होते. म्हणून राजांनी व इतर मंडळींनी साधू, वैराग्याचे वेष घेऊन मथुरा सोडली; सर्वांनी दक्षिणेचा रस्ता धरला.

राजे बादशाहाच्या कैदेतून नक्की कसे निसटले ह्या संबंधी जरा गूढ आहे. मोगलांची जी ऐतिहासिक कागदपत्रे आहेत त्यानुसार ते वेष पालटून पळाले परंतु इतर कागदपत्रानुसार मिठाईच्या पेटाऱ्यातून निसटले, असे आहे.

राजे निसटल्यावर काही वेळाने हिरोजी फर्जंद उठला. त्याने व मदारीने हांथरूणावर उशा व लोड असे ठेवले व त्यावर शेला असा पांघरला की जणू राजेच नेहमीप्रमाणे झोपलेले आहेत असे दिसावे! ते दोघे बाहेर पडले. त्यांनी चौकीदारांना व पहारेकऱ्यांना बजावले की आज राजांची प्रकृति अधिक बिघडली आहे, त्यांना कोणी त्रास देऊ नका, त्यांना थोडी झोप लागली आहे. आम्ही लवकर औषध आणतो. दोघे निसटले ते परत कशाला येतात?

दिवस उगवला, उन्हे वर आली पण कोठीत अगदी सामसूम होते. पहारेकऱ्यांना जरा विचित्र वाटले. त्यांनी फुलादखानास कळवले. त्याने कोठीत जाऊन पाहिले तो काय? सर्व केवळ उशा व गिरद्या! शिवाजी कोठे आहेत? फुलादखानाच्या डोळ्यापुढे अंधारीच आली! त्याला समोर बादशाहाचा रागीट चेहराच दिसत असावा. तो अगदी घाबरून गेला. त्याने धावत जाऊन रामसिंहास खबर दिली. रामसिंहास मनातून बरेच वाटले असणार. परंतु त्यालाही बादशाहाची भीती वाटली त्याने भीत भीत शिवाजी निसटून गेल्याची बातमी बादशाहाच्या कानावर घातली बादशाहाने मस्तकाला हातच लावला. इतक्यात फुलादखानही तेथे आला त्याला बादशाहाने चिडून विचारले, "हे काय झाले?" खान हळूच म्हणाला, "हुजुर माझी चूक नाही. मी वारंवार कोठीत जाऊन पाहात होतो. राजा एकाएकी नाहीसा झाला. जमिनीत घुसला की आकाशात उडाला कळलं नाही!" औरंगजेबाचे समाधान झाले नाही त्याने हुकुम सोडला की आग्रा शहरास लष्कराचा गराडा एकदम घाला व शिवाचा शोध करा. रामसिंहास बादशाहाने धोलपूराकडे शोध करण्यास पाठवले. इतर ठिकाणांकडे ही माणसे दौडवली.

शिवाजीराजे संभाजीसह कैदेतून निसटून गेल्याची बातमी वाऱ्यासारखी आग्रा शहरांत पसरली. सर्वत्र खळबळ उडाली. जो तो विचारू लागला, "इतक्या कडक पहाऱ्यातून शिवाजी पळाला कसा?" लोक आश्चर्याने थक्क झाले! फुलादखानाने शहराचा कानाकोपरा शोधला पण व्यर्थ स्वतः बादशाहाला भीती बसली की शिवा आपणास कधी एकाएकी येऊन दगा करेल की काय! म्हणून त्याने आपल्याभोवती कडेकोट पहारा बसवला! महाराष्ट्रात उत्तरेकडून

जातांना लागणारे घाट व रस्ते रोखण्याचे हुकुम सुटले, संन्यासी, बैराग्यांच्या झडत्या घेण्यात आल्या. परंतु सर्व व्यर्थ ठरले.

रामसिंह धोलपूर कडून हात हालवत परत आला. मध्यंतरी फुलादखानाने औरंगजेबाच्या मनांत भरवले की शिवाजीच्या पळून जाण्यात रामसिंहाचा हात जरूर असावा. बादशाहालाही तसे थोडे फार वाटत असावे. त्याने राम-सिंहाची जहागिरच रद्द केली. त्याला दरबारात येण्याचीही मनाई केली!

बादशाहाने जयसिंगास लिहिले की नेताजी पालकरास कैद करून दिल्लीस पाठवा. कारण काय तर नेताजी प्रतिशिवाजी समजला जाई. औरंगजेबाला राग कोणावर तरी काढायचा होता! काय हा न्याय! नेताजी त्यावेळी जयसिंगा-कडे नोकरीस होता. आग्रा शहराच्या झडतीत शिवाजी राजांच्या बरोबरचे केवळ रघुनाथपंत कोरडे व त्र्यंबकपंत डबीर फुलादच्या हाती पडले. त्यांनी शिवाजी कसे निसटले हे सांगावे अशी फुलादची अपेक्षा होती म्हणून त्यांचे पुष्कळ हाल केले. परंतु ती अपेक्षा पुरी झाली नाही.

## शिवाजीराजे राजगडला पोचतात

शिवाजीराजे व बरोबरची मंडळी मथुरेतून राजगडकडे येण्यास वेगाने निघाली. ते पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे नद्या, नाले वगैरे भरलेले होते. तरीही शक्य तितक्या जलद वेगाने सर्व पुढे सरकत होते. ही मंडळी कोणाच्या मार्गाने राजगडला आली ह्याबद्दल वाद आहे. राजे १२ सप्टेंबर १६६६ रोजी राजगडाला सुखरूप पोचले. राजे मातुश्रींना भेटले तो प्रसंग नाट्यमय होता! तो असा: त्या दिवशी बैराग्यांची एक टोळी राजवाड्यापाशी अचानक आली. त्यांनी जिजाबाईंना भेटण्याची इच्छा दर्शवली! पहारेकऱ्यांना आश्चर्य वाटले. ते आईसाहेबांना ही बातमी देण्यास गेले. जिजाबाई धार्मिक वृत्तीच्या होत्या त्यांनी बैराग्यांना आत सोडण्याची आज्ञा केली. बैरागी आत गेले. एका बैराग्याने आईसाहेबांच्या चरणांवर मस्तक ठेवले व तो त्यांच्या मांडीवर जाऊन बसला! त्याने आपले झाकलेले डोके उघडे केले तेव्हा आईसाहेबांनी त्याला ओळखले. त्या उद्गारल्या, "अरे हा तर शिवबा!" त्यांच्या व राजांच्या डोळ्यांतून आनंदाचे अश्रू वाहू लागले. आईसाहेबांनी शिवबाळाला पोटाशी घट्ट धरले. दोघांनाही जो आनंद झाला तो अवर्णनीय आहे

हा हा म्हणता राजे परत आल्याची बातमी गडावर पसरली. राजे परत आल्याचे लोकांना कळावे म्हणून तोफांचे आवाज करण्यात आले. वार्ताही सर्व ठिकाणी पाठवण्यात आली, स्वराज्यभर आनंदाची लाट उसळली. आपला राजा शत्रूच्या दाढेतून निसटून सुखरूप परतला ना! स्वराज्याचे भविष्य आता उज्ज्वल दिसू लागले. लोकांना नवा हुरूप आला.


२७५८ ५/३/८८

राजे राजगडला केव्हा, म्हणजे कोणच्या तारखेस, पोचले ह्या संबंधी इतिहासकारात दुमत आहे. काहींच्या मते सप्टेंबर १६६६ त तर इतरांच्या मते नोव्हेंबर १६६६ त पोचले. राजे परत आले परंतु संभाजींचे काय झाले असे लोक कुजबुजू लागले. राजांनी घट्ट मन करून त्यांना मृत्यू आल्याचे सांगितले! परंतु आईसाहेबांना मात्र ते मथुरेत असल्याचे गुप्तपणे सांगितले असावे. राजांनी मृत्यू आल्याचे मुद्दाम उठवले कारण खरे सांगितले असते तर संभाजींच्या जिवाला धोका होता.

राजांनी सुखरुप परत येणे ही घटना महाराष्ट्राच्या दृष्टीने फार भाग्याची म्हणावी लागेल. कारण ते जणु मृत्यूच्या कचाटयातूनच परतले होते ! समजा औरंगजेबाच्या हातून त्यांना दुर्दैवाने मृत्यु आला असता तर स्वराज्याचा इतिहास बहुधा तेथेच संपला असता. परंतु महाराष्ट्राचे भाग्य बलवत्तर होते. शिवाजीराजांचे परतणे म्हणजे इतिहासातला एक महान व अपूर्व चमत्कारही होता. हिंदूंचा कट्टर द्वेष करणाऱ्या औरंगजेबाच्या कडक कैदेतून निसटणे साधी गोष्ट नव्हे. शिवाय महाराष्ट्रापासून शेकडो मैल दूर असलेल्या व जेथे आपले कोणी मदत करणारे नाही अशा आग्रा शहराहून सुखरुप परत घरी पोचायचे किती कठीण ! हा चमत्कार घडवून आणण्याचे खरे श्रेय राजांच्या असामान्य बुद्धिमत्तेला व धाडसाला द्यावे लागते. त्यानंतरचे श्रेय राजांच्या एकनिष्ठ नोकरचाकरांना द्यावे लागेल. समजा, बरोबरच्या माणसांपैकी एकानेही फितूर होऊन राजांच्या योजनेची माहिती शत्रूला दिली असती तर सर्व व्यर्थ झाले असते. पण तसे काही घडले नाही. आदर्श राजाचे सेवकही आदर्श! त्यानंतर आणखी एका व्यक्तीला श्रेय देण्यास विसरता कामा नये. ती व्यक्ती म्हणजे रामसिंह होय. त्यानेच परमुलुखात राजांना प्रेम व जिव्हाळा दिला, त्याने राजांचे प्राण वाचवण्यासाठी आपले प्राण पणास लावले, व आपल्या वडिलांनी राजांना दिलेले वचन शेवटास नेले. त्याचे महाराष्ट्रावर किती मोठे उपकार !

## जयसिंगाचा मृत्यु व औरंगजेबाजी समेट

शिवाजीराजे आग्र्यास जाऊन परत आले. ह्या काळात जयसिंगाच्या आदिलशाहाविरुद्ध लढाया चालल्या होत्या. परंतु त्यांत त्याला यावे तसे यश येत नव्हते ! त्याचा काळ उलटला असे दिसत होते. राजांना आग्र्यास पाठवण्याचे राजकारण ज्या हेतूने जयसिंगाने घडवून आणले होते तोही फसला होता. ज्या चांगल्या हेतूने शिवाजींचे मन बादशाहाची भेट घेण्यासाठी त्याने मोठ्या प्रयत्नाने वळवले तो लक्षात घेऊन बादशाह त्याच्याशी नीट वागला नाही; उलट त्यांचा त्याने भर दरबारात अपमान केला व राजांना कैदेत टाकले. अशा तऱ्हेने

बादशाहाने राजकारण बिघडवले ह्याचे त्याला वाईट वाटत होते. आपणास चांगुलपणा मिळण्याच्याऐवजी काही वाईटपणा मिळतो की काय अशी भीती त्याला वाटू लागली होती. रामसिंगाची जहागीर बादशाहाने काढून घेतल्याचे वृत्त जयसिंगाला कळलेच होते. दक्षिणेच्या स्वारीवर येईपर्यंत जयसिंगाची मोगल दरबारात शौर्याबद्दल मोठी ख्याती होती. त्यामुळे त्याला असामान्य मानही होता. आता दुर्दैव आपला पाठलाग करणार की काय अशी भीती त्याला वाटू लागली! त्याची प्रकृतीही अलीकडे घसरली होती. म्हणून युद्ध स्थगित करून बादशाहाला दिल्लीत भेटायला जायचे त्याने ठरवले.

जयसिंग १७ नोव्हेंबर १६६६ रोजी बीडहून दिल्लीस जाण्यासाठी निघाला. त्याच्याबरोबर त्याचा मुन्शी उदयराज होता. वाटेत ब्ऱ्हाणपूर येथे जयसिंगाची प्रकृती बिघडली ती पुढे अधिकच बिघडत गेली. अखेर दुर्दैवाने त्याला ब्ऱ्हाणपूरलाच ११ जुलै १६६७ रोजी मृत्यूने गाठले! जयसिंगाबरोबर त्याचा लहान मुलगा कीरतसिंह होता. त्याला उदयराज मुन्शीने आपल्या वडिलास विषप्रयोग केल्याची शंका आली!

शिवाजीराजे आग्र्याहून राजगडला परतल्यानंतर काही दिवसांनी, त्यांच्याबरोबर गेलेली. पण मागे राहिलेली काही मंडळी परत महाराष्ट्रात आली. त्यांत कवींद्र परमानंद, हिरोजी फर्जंद व मदारी मेहतर होते. राजांनी आता संभाजींना घेऊन राजगडला येण्याविषयी कृष्णाजीपंताना मथुरेस पत्र लिहिले होते. त्याप्रमाणे पंत सहकुटुंब संभाजींना घेऊन, २० नोव्हेंबर १६६६ रोजी राजगडला पोचले. संभाजी सुखरूप घरी परत आल्यामुळे सर्वांना अर्थात आनंद झाला. विशेषत: जिजामातुश्रींना आवडत्या नातवाला भेटून परम हर्ष झाला. राजांनी कृष्णाजीपंतांचा व त्यांचेबरोबर आलेल्या मंडळींचा सन्मान केला. पंताना पन्नास हजार रुपये बक्षीस दिले व संभाजींचे चांगले पालन केल्याबद्दल आभार मानले.

शिवाजीराजांनी काही दिवस कोणाही राजसत्तेशी भांडण न करण्याचे धोरण स्वीकारले होते. मोगली स्वाऱ्यामुळे लोकही त्रस्त झालेले होते. राजांनाही विश्रांतीची गरज असावी. स्वराज्याची घडी नीट करण्याकरताही सवड हवी होती. म्हणून तह करण्याच्या दृष्टीने राजांनी पुढील आशयाचे सामोपचाराचे पत्र औरंगजेब बादशाहास लिहिले. त्यांनी कळवले, "मी आपला नम्र सेवक आहे. आपल्या सेवेस तत्पर आहे माझे किल्ले व दौलत आपल्या सेवेत अर्पण करत आहे!" वास्तविक ह्यावेळी बादशाहा राजांवर खूप रागावलेला होता. परंतु आश्चर्य हे की त्याने राजांचे विनंतीस मान्यता दिली. दूरवर विचार केला तर ह्यात आश्चर्य नव्हते एकतर अलीकडे मोगलांच्या

फौजांना दक्षिणेत अपयश आले होते. दुसरे असे की ह्याच सुमारास इराणचा बादशाह दिल्लीवर स्वारी करणार अशी बातमी औरंगजेबाला मिळाली होती. ह्या कारणांकरता बादशाहालाही दक्षिणेत तह हवाच होता.

ह्या तहानुसार संभाजींना बादशाहाकडून मनसब मिळाली, राजांचे मागचे गुन्हे माफ झाले, खुद्द शिवाजींना 'राजा' हा किताब बादशाहाकडून बहाल झाला व आदिलशाहाचा मुलुख काबीज करण्यास संमती मिळाली. तसेच ह्या तहानुसार रघुनाथपंत कोरडे व त्र्यंबकपंत डबीर ह्या आग्र्यास मोगलांच्या कैदेत अडकलेल्या ब्राह्मणांची सुटका झाली. हा तह स. १६६७ च्या आरंभी झाला.

ह्या तहामुळे राजांना थोडी शांतता लाभली. ह्या शांततेचा उपयोग त्यांनी स्वराज्याची पुनर्रचना करण्याच्या कामी केला. जमीन महसूल, जहागिरी व वतने, न्यायदान, लष्कर व आरमार ह्या संबंधांत बऱ्याच सुधारणा त्यांनी केल्या. गड किंवा किल्ले ह्यांचीही व्यवस्था नीट लावली.

### सिंहगड पुन्हा काबीज

सन १६६८ मध्ये शिवाजीराजे पुन्हा मुलुखगिरीकडे वळले. औरंगजेबाने राजांबरोबर केलेला तह स्वतःच काही दिवसांनी मोडला! त्याने संभाजींच्या वऱ्हाडच्या जहागिरीतून एक लाख रुपये वसूल करण्याचा हुकूम काढला. हे पैसे कसले? राजे आग्र्यास गेले तेव्हा म्हणे त्यांच्या प्रीत्यर्थ बादशाहास खर्च आला होता! संभाजीतर्फे प्रतापराव गुजर व निराजी रावजी हे दोन अधिकारी औरंगाबादेस सुभेदार शहाजादा मुअज्जम ह्याच्या जवळ होते. त्यांना पकडण्याचा गुप्त हुकुमही औरंगजेबाने पाठवला होता! मुअज्जमने ही गोष्ट त्या अधिकाऱ्यांना चुपचाप सांगितली. दोघेही राजांकडे पळून गेले. औरंगजेबाने स्वतःच तह मोडल्यामुळे राजांना बरे वाटले. आता आपण मोगलाकडे पुरंदरच्या तहामुळे गेलेला मुलूख घेण्यास मोकळे झालो असे त्यांना वाटले. राजांनी आता प्रथम सिंहगड घेण्याचे ठरवले.

सिंहगड (कोंडाणा) राजगडजवळ होता. तो पुण्यापासून सोळा सतरा मैलांवर असून त्याची उंची ४५०० फूट आहे. गडाच्या सर्व बाजूंना सरळ उभे कडे आणि पक्की तटबंदी होती. पूर्वेकडे पुणे दरवाजा व कल्याण दरवाजा असे दोन दरवाजे होते. पश्चिमेकडे कडा इतका ताठ व खोल होता की तेथून खाली पाहाणाऱ्याला भोवळ यावी! पायथ्याशी दाट जंगल होते. हा किल्ला पुरंदरच्या तहापासून मोगलांना मिळाला होता. तो परत स्वराज्यात आला पाहिजे असे राजांना वाटत होते. त्यांच्या आईसाहेबांचीही तशी इच्छा बरेच दिवसांची

होती. राजांनी तो परत काबीज करण्याचे ठरवले. त्यावेळी सिंहगडावर मोगलांचा उदयभानू राजपूत नावाचा किल्लेदार होता. त्याच्या हाताखाली पंधराशे राजपूत शिपाई होते. सिंहगड घेणे फार कठीण काम होते. पण तो घेणे आवश्यक होते.

ही कठीण कामगिरी शिवाजीराजांनी तान्हाजी मालुसरेकडे सोपवली व त्यानेही ती आनंदाने स्वीकारली. तान्हाजी वाघासारखा शूर होता. तान्हाजीला मदत त्याचा भाऊ सूर्याजी करणार होता. तान्हाजीने पाचशे निवडक मावळे बरोबर घेतले व ४ फेब्रुवारी १६७० रोजी रात्री सूर्याजीसह कामगिरीवर निघाला. रात्रीची वेळ मुद्दाम निवडली. शत्रूला अचानक गाठायचे होते ! गडद अंधारात मावळे सहा कोस अंतर चालून गेले! ते पश्चिमेस असलेल्या द्रोणागिरी नावाच्या कड्यापर्यंत पोचले. हा कडा अगदी सरळ असल्यामुळे चढण्यास फार कठीण होता. म्हणून त्या बाजूस किल्ल्याला तटबंदी नव्हती. कोणी कडा चढताना पाय घसरून खाली पडला तर त्याला मरण ठरलेलेच होते. मावळे ह्या कामात तरबेज होते. तान्हाजीने दोन मावळ्यांना वर चढवलेच ! त्यांनी दोराची माळ करून खाली सोडली. तिच्या आधाराने इतर सर्व सरसर वर चढले ! माकडेच ती सह्याद्रीतली!

इतक्यात गस्त घालणाऱ्या शिपायांना चाहूल लागली. अंधारात काही दिसत नव्हते. मशाली पेटवल्या गेल्या. लगेच मावळ्यांनी 'हर हर महादेव' आरोळी ठोकून शत्रूच्या माणसांची कापाकापी करण्यास सुरूवात केली. शत्रूकडच्या लोकांना हे काय होत आहे हे कळेना. अखेर मराठ्यांनी केलेल्या स्वारीची त्यांना कल्पना आली, धावपळ सुरू झाली. उदयभानूला खबर पोचली. तोही आपली ढाल तरवार घेऊन आला. मोगलाकडची इतर सेनाही जागी होऊन तेथे पोचली. युद्धास तोंड लागले. कापाकापी सुरू झाली. मुंडक्यांचा सडा पडला ! व थोड्याच वेळात तान्हाजी व उदयभानू ह्यांची गाठ पडली. द्वंद्व सुरू झाले. झुंजणाऱ्या हत्तींप्रमाणे ते एकमेकावर जाऊन पडले. तरवारीचे सपासप वार झाले. जवळ जवळ अर्धा तास असे युद्ध झाले. दुर्दैवाने इतक्यात तान्हाजीच्या ढालीचे दोन तुकडे झाले, घात झाला ! तरीही तान्हाजी उदयभानचे वार डाव्या हातावर झेलत होता. त्याने आपली शक्ती एकवटून उदयभानूवर असा वर्मी घाव केला की तो खालीच पडला! तान्हाजीही पडला. दोघेही मरून पडले !

आपला सेनापती तान्हाजी पडला ही गोष्ट मावळ्यांना कळताच ते धीर सोडून पळू लागले. हे सूर्याजीने पाहिले. तो जवळच दुसरीकडे लढत होता तान्हाजीला मृत्यू आलेला पाहून त्याला फार दुःख झाले. पण आपले दुःख

आवरून तो पळणाऱ्या लोकांना ओरडून म्हणाला, 'सुभेदार (तान्हाजी) येथ मरून पडला आहे आणि तुम्ही पळून जाता? नामर्दासारखे पळण्यापेक्षा लढता लढता मरा. महाराज काय म्हणतील तुम्हाला? पळून जाल तर कड्याखाली पडून व्यर्थ मराल. फिरा मागे. गड जिंकूनच दाखवा." आणि चमत्कार व्हावा तसा मावळे परत फिरले! घनघोर युद्ध पुन्हा सुरू झाले. काही वेळाने उदयभानूचे लोक वाट मिळेल तिकडे पळत सुटले. अनेक राजपूत शेवटी कड्याखाली पडले! मावळ्यांनी किल्ला घेतला. किल्ल्यावर भगवा ध्वज चढला! उदयभानूचे जवळ जवळ बाराशे लोक कापले गेले.

ठरलेल्या संकेताप्रमाणे सूर्याजीने जाळ पेटवून राजांना सुचवले की सिंहगड सर झाला. राजांनी जाळ पाहिला व त्यांना हर्ष झाला. सूर्याजीने जासुदाचे हाती नंतर निरोपही पाठवला तो ऐकून मात्र राजांना फार दुःख झाले कारण तान्हाजीसारखा नामी मोहरा नाहीसा झाल्याचे त्यांना कळले. राजे हळहळून उद्गारले, "गड आला पण सिंह गेला!"

सूर्याजी व वाचलेले मावळे परतले. तान्हाजीचा सुभा सूर्याजीकडे सोपवला. इतर मावळ्यांनाही यथायोग्य सोन्याची कडी, धन वगैरेंच्या रुपाने बक्षिसे दिली. जे कामी आले होते त्यांच्या बायकामुलांच्या पोषणाची व्यवस्था केली.

### सुरतची पुन्हा लूटः वणी दिंडोरीचे युद्ध

शिवाजीराजांच्या आयुष्यात फेब्रुवारी १६७० मध्ये एक सुखद घटना घडली. सोयराबाईंना २४ फेब्रुवारीला मुलगा झाला. त्याचेच नांव राजाराम ठेवण्यात आले.

सिंहगड काबीज झाल्यानंतर राजांनी मोगलांच्या ताब्यात गेलेल्या इतर मुलुखाकडे लक्ष वळवले. निळोपंत मुजुमदारांनी पुरंदर किल्ला घेतला. राजांनी स्वतः उत्तर कोकणात स्वारी करून कल्याण, भिवंडी, चांदवड, रोहिडा वगैरे ठिकाणे भराभर हस्तगत केली. कल्याणजवळचा माहुलीचा किल्ला घेतला. मराठ्यांच्या तुफानी दौऱ्यामुळे मोगल ठाणेदारांत व सरदारांत भीती पसरली. काही मारले गेले तर बरेच पळून गेले! जयसिंगाने स्वराज्याचा जो भाग काबीज केला होता तो बहुतेक सन १६७० अखेर राजांनी स्वराज्यात

— आता स्वराज्याला धनाची फार गरज होती. म्हणून राजांनी सुरतेची पुन्हा लूट करण्याचे ठरवले. २ ऑक्टोबर १६७० रोजी ते सुरतेस पोचले. ह्या आधीच शिवाजी राजे सुरतवर स्वारी करणार असल्याची दाट अफवा उठलीच

होती. मुंबईच्या इंग्रज व्यापाऱ्यांनी आपल्या सुरतेच्या बांधवांना ह्याबद्दल सूचना दिली होती. राजे आल्याचे कळताच पुष्कळ श्रीमंत लोक घरे सोडून पळून गेले. मोगलांचा सुभेदार किल्ल्यात लपून बसला! मराठ्यांनी वाडे, पेढ्या, दुकाने मनसोक्त लुटली पुष्कळ हिरे, सोने, चांदी हाती लागली.

इतर लोक पळाले तरी इंग्रज व्यापारी पळले नाहीत! त्यांनी उलट आपल्या वखारीचे संरक्षण करण्याचा प्रयत्न केला. 'मास्टर' नावाचा एक इंग्रज तीस माणसांना घेऊन वखारीत दाखल झाला. हे लोक मराठ्यांना तोंड देण्यास तयार झाले. त्यांनी मराठ्यांचेवर बंदुकींच्या गोळ्यांचा मारा केला. फ्रेंच व्यापाऱ्यांनी मात्र मराठ्यांशी सलोखा केला. त्यांनी मराठ्यांना पुष्कळ धन दिले. त्यामुळे मराठ्यांकडून त्यांना त्रास झाला नाही. मराठ्यांनी इंग्रजांच्या वखारीवर तीन दिवस मारा केला. काही इंग्रज व मराठे त्यात मेले. अखेरीस फ्रेंच वखारवाल्यांनी इंग्रजांना समजावले. मास्टरने मारा बंद केला. राजांनी नजराणा घेऊन इंग्रजांना सोडले.

त्यावेळी मक्केच्या यात्रेहून परत जातांना काहीं तार्तर लोक सुरतेत राहिले होते. त्यांच्याजवळ पुष्कळ सोने, जवाहीर वगैरे संपत्ती होती. मराठ्यांनी ती सर्व लुटली.

ह्या स्वारीत मराठ्यांना जवळ जवळ त्रेपन लक्षांची संपत्ती मिळाली! ती घेऊन राजे पांच ऑक्टोबरला सुरतहून निघाले. याही स्वारीत नेहमीप्रमाणे, विनाकारण कोणाला शारीरिक कष्ट होऊ नयेत, स्त्रियांना व मुलांना कोणी त्रास देऊ नये व धार्मिक संस्थांचे नुकसान होऊ नये ह्याबद्दल राजांनी काळजी घेतली होतीच.

शिवाजीराजांनी शत्रूच्या संपत्तीची लूट केलेली पाहून, आज काही लोकांना ते आचरण अनैतिक वाटेल. परंतु त्या काळच्या इतिहासाचे अवलोकन केल्यास दिसून येईल की त्यावेळी शत्रूच्या संपत्तीची लूट करण्याची प्रथा सर्व सम्मत होती. शिवाय स्वराज्यासाठी प्रचंड खर्च होत होता; तो खर्च केवळ सरकारी जमीन महसुलातून भागणे अशक्य होते. उत्पन्नाचे दुसरे मार्ग क्वचितच होते. तेव्हा लूट करण्याशिवाय गत्यंतर नव्हते. ही लूट चांगल्या कार्याकरता होती असेच म्हणावे लागेल.

सुरतेची लूट बरोबर घेऊन मराठे महाराष्ट्राच्या सरहद्दीवर असलेल्या बागलाण भागात आले. तेव्हा आपल्या मागे मोगलांची फौज असल्याचे राजांना कळले. म्हणून त्यांनी बरोबरची संपत्ती पांच हजार पायदळाबरोबर निराळ्या रस्त्याने पुढे रवाना केली व आपण फौजेसह मोगल सैन्यास तोंड देण्यासाठी

मागे राहिले. मोगल सेनेचा मुख्य दाउदखान कुरेशी होता. तो बऱ्हाणपुराहून चांदवडला आला होता. त्याने इखलास खानास मराठ्यांचेवर हल्ला करण्यासाठी पुढे पाठवले. राजे व सैन्य चांदवडजवळ असलेला कांचनमंचनचा घाट उतरुन पुढे आले होते. तेथे इखलासखानाने मराठ्यावर हल्ला केला. खडाजंगी युद्ध झाले. अखेरीस खान जखमी होऊन पडला. इतक्यात दाउदखान आणखी सेना घेऊन तेथे आला. त्याने इखलासखानास सुरक्षित जागी हालवले व मराठ्यांवर हल्ला केला. बरेच युद्ध झाले परंतु शेवटी मोगलांचा पराभव झाला. ह्या युद्धातही मराठ्यांना बरीच लूट मिळाली. शिवाजी राजे ऑक्टोबर १६७० मध्ये रायगडला पोचले. वरील लढाई वणी–दिंडोरीची लढाई म्हणून प्रसिद्ध आहे.

वणी-दिंडोरीचे युद्ध चालू असताना मोरोपंत पेशव्यांनी २५ ऑक्टोबर १६७० ला त्र्यंबकेश्वराचा त्र्यंबकगड किल्ला उर्फ ब्रह्मगिरी' घेतला.

नोव्हेंबर १६७० च्या सुमारास शिवाजी राजांनी वऱ्हाडातल्या लाडाच्या कारंज्यावर स्वारी केली. हे गाव सधन असल्याची त्यावेळी ख्याती होती. कारंजाची सर्व माहिती नेहमीच्या पद्धतीनुसार राजांनी आधीच मिळवली होती. कारज्यास पोचल्यावर मराठ्यांनी मुख्य प्रसिद्ध श्रीमंत लोकांना कैद केले. व त्यांचे वाडे खणून काढले. तीन दिवस धन एकत्र केले जात होते. कारंज्याहून निघाल्यावर वऱ्हाडातल्या इतर काही गावातून जितकी संपत्ती मिळवता आली तितकी मराठ्यांनी मिळवली. चार हजार बैल व गाढवांवरून ही संपत्ती राजगडाला आणली गेली!

## शिवाजीराजांशी छत्रसालाची भेट.

आतापर्यंत शिवाजीराजांची स्वतंत्र व शूर हिंदू राजा म्हणून बरीच कीर्ती उत्तर हिंदुस्थानात पसरली होती. विशेषत: मोगलसत्तेखाली वावरत असणाऱ्या राजपूत, बुंदेले वगैरे लोकांना राजांचे बद्दल अधिक कुतुहल वाटत असावे. आतापर्यंतचे त्यांचे मोगलाविरुद्धचे पराक्रमही आकर्षक असेच होते. अशा कुतूहल वाटणाऱ्या लोकांत छत्रसाल नावाचा बुंदेला होता. हा बुंदेल खंडातला राहाणारा होता छत्रसालाच्या बापाला औरंगजेबाने खूप छळले होते. त्याला औरंगजेबाशी लढता लढता मरण आले होते. छत्रसाल त्यावेळी केवळ अकरा वर्षांचा होता. पुढे त्याने जयसिंगाजवळ नोकरी केली. जयसिंगाच्या दक्षिणेच्या स्वारीत तो महाराष्ट्रात आला होता त्यामुळे शिवाजीराजांविषयी त्याला अधिक माहिती असावी. सन १६७१ च्या सुमारास दिलेरखान शिवाजीराजांचे विरूद्ध बागलाणात स्वारीवर आला असता, छत्रसालही

त्याच्याबरोबर आला होता. त्यावेळी एके दिवशी राजांना भेटण्याची छत्रसालाला फार इच्छा झाली. शिकारीस जाण्याचे निमित्त करून तो व त्याचे काही दोस्त राजांच्या छावणीपाशी आले! छत्रसाल आपल्या भेटीस आल्याची ऐकून राजांना आश्चर्य वाटले. छत्रसाल राजांच्या डेऱ्याजवळ येताच राजांनी त्याचे उठून स्वागत केले. ते उद्गारले, 'आइये, आइये वीर छत्रसालजी!" छत्रसालासंबंधी राजांना पूर्वी माहिती असावी असे दिसते.

शिवाजीराजांशी भेट झाल्यामुळे छत्रसालांस अत्यंत आनंद झाला. त्याने राजांना आदरपूर्वक वंदन केले. राजांनी छत्रसालाला जवळ बसवून काय हेतूने आलात असे विचारले. त्याने आपला सर्व इतिहास राजांना निवेदन केला; आपल्या मनांतले दु:खही राजांपुढे उघडे केले व छत्रसालाने राजांना विनंती केली, "मला आपण पदरात घ्या, मी आपली नोकरी करीन!"

राजांना गहिवरून आले. त्यांनी छत्रसालाला पुढील ओजस्वी उपदेश केला, "तुम्ही क्षत्रियांचे मुकुटमणी आहात. आपली मायभूमी बुंदेलखंड जिंका व तेथे स्वतंत्रपणे राज्य करा. आम्ही तुमच्यापासून निराळे नाही. मोगल हत्ती असतील तर तुम्ही सिंह आहात! मोगलांचे मुलुख जिंका. तलवार मारत असताना मृत्यू आला तर पुण्य लाभेल."

राजांचा हा उपदेश ऐकून छत्रसालाला स्फुर्ती आली. त्याने आपली मायभूमी स्वतंत्र करण्याची प्रतीज्ञा केली व तो निघाला राजांनी त्याच्या कमरेला तलवार बांधून आशीर्वाद दिला, "जा, तुम्ही विजयी व्हाल!"

### साल्हेरचे युद्ध

औरंगजेब बादशाहाने सन १६७१ च्या हिवाळ्यात बहादूरखान, दिलेरखान व महाबतखान ह्यांना मराठ्यांचा वाढणारा धुमाकूळ थांबवण्यासाठी दक्षिणेत पाठवले. ते बागलाणात आले. त्यांनी खानदेशातल्या साल्हेरच्या किल्ल्यास वेढा घातला. मराठ्यांनी अलीकडेच तो काबीज केला होता. मोगलांची जवळ जवळ साठ हजार सेना होती. राजांनी मोरोपंत पेशवे व प्रतापराव गुजर ह्यांना मोगलांचे विरूद्ध पाठवले. त्यांच्या बरोबर फक्त चाळीस हजार फौज होती. दोन्ही सैन्यांचे चार महिने युद्ध झाले. पुष्कळ रक्त वाहिले. अखेरीस मोगल सेनेची हार झाली. ह्या युद्धात १२५ हत्ती, ७०० उंट, ६००० घोडे अपार युद्ध साहित्य व संपत्ती मराठ्यांना मिळाली! परंतु मराठ्यांची एक मोठी हानी झाली. राजांचा लहानपणापासूनचा जिवलग साथी सूर्यराव काकडे मारला गेला! राजांना फार वाईट वाटले. मराठ्यांनी मुल्हेरगडही सर केला. हे युद्ध मैदानी मुलखांत लढले गेले होते. त्यामुळे

मैदानी युद्धातही आपण विजयी होऊ शकतो असा आत्मविश्वास राजांना व इतरांना आला. आतापर्यंतच्या लढाया डोंगराळ भागात गनिमी काव्याने लढल्या जात.

साल्हेरच्या यशाबद्दल राजांनी सर्वांना शाबासकी दिली. सर्वांचा योग्यते-प्रमाणे बक्षिसे देऊन सन्मानही केला. मोगलांकडची जी माणसे पकडून आणली होती त्यांना राजांनी सोडून दिले.

साल्हेरच्या विजयानंतर मोरोपंत पेशव्यांनी जव्हार व रामनगर ही कोळीराज्ये घेतली. आता स्वराज्याची सीमा सुरतच्या अलीकडे पंचवीस मैलावर पोचली. नंतर पेशव्यानीच नाशिकवर स्वारी करून ते गाव जून १६७२ मध्ये स्वराज्यात सामील केले. नाशिक हे हिंदूचे दक्षिणेतले अति पवित्र क्षेत्र, म्हणजे दक्षिणेतली 'काशी'च होती. हे क्षेत्र स्वराज्यात आल्यामुळे त्या भागातल्या हिंदूंना सहाजिकच फार आनंद झाला. आता हिंदूंना मुक्तपणे श्रीरामाची पूजाअर्चा करता येऊ लागली लोकानी राजांना दुआ दिला.

राजांनी अलीकडे रायगड किल्ल्यावर बांधकामे सुरू केली होती. येथे त्यांना स्वराज्याची राजधानी करायची होती. पूर्वी एकदा शहाजी राजांनीही राजधानीसाठी राजगडपेक्षा रायगड किल्ला अधिक चांगले ठिकाण आहे असा सल्ला राजांना दिला होता. राजांनी पन्नास हजार होन ह्या किल्ल्यावर खर्च करून राजधानीसाठी निरनिराळ्या सोयी केल्या. कचेऱ्या, महाल व कारखाने ह्यांचे बांधकाम केले.

### राजांची समर्थ रामदासस्वामींशी भेट

राजांची व समर्थ रामदासांची भेट केव्हा झाली ह्याबद्दल इतिहासकारात एक मत नाही. काहींच्या मताने ती सन १६४९ झाली, तर काहींच्या दृष्टीने १६५१ त व इतरांच्या मताने १६७२ साली झाली. लेखी पुरावा १६७२ सालाच्या संबंधी मिळतो त्यासाली राजांना एक पत्र अचानक मिळाले त्या पत्रावर सही नव्हती त्यात शिवाजी राजांची भरपूर स्तुती होती. लेखकाने त्याना आशीर्वाद लिहिला होता. महत्वाची गोष्ट ही लिहिली होती की "तुम्ही (राजानी) धर्मरक्षकाची कीर्ती मिळवलीत ती पुढे सांभाळली पाहिजे. तुम्ही सर्वज्ञ आहात!' हे पत्र कोणी लिहिले हे त्यांना कळेना. मग एकदम त्यांना आठवले की चौदा वर्षांपूर्वी रायगडच्या जवळ शिवथरच्या गुहेत एक रामभक्त रामदासस्वामी तपश्चर्या करत होते. त्यांनाही हिंदुधर्म रक्षणाची तळमळ होता. त्यांनी हिंदुस्थानभर प्रवास करून ठिकठिकाणी हनुमान मंदिरांची स्थापना केली होती. त्यानी महाराष्ट्रात ठिकठिकाणी आपले मठ स्थापले होते

व त्याद्वारे त्यांचे शिष्य धर्म जागृतीचे मोठे कार्य करत होते. रामदासांचा एक मठ चाफळ येथे होता व तेथे होणाऱ्या श्रीरामजन्माच्या उत्सवासाठी दरवर्षी दोनशे होन देण्याची आज्ञा आपण दिली होती हेही त्यांना आठवले. त्यानंतर दोघांचा संबंध वाढला नाही हे आश्चर्य होते.

आतामात्र वरील पत्रामुळे राजांना समर्थांच्या भेटीची ओढ लागली. त्यांनी चाफळला जायचे ठरवले. त्याप्रमाणे ऑगस्ट १६७२ मध्ये राजे चाफळ जवळ असलेल्या शिंगणवाडी मठात समर्थांना भेटले, राजांनी समर्थांना वंदन केले. समर्थांनी राजांना मनःपूर्वक आशीर्वाद दिला भेटीत दोघांचे काय बोलणे झाले ह्याबद्दल लेखी माहिती नाही परंतु स्वराज्याच्या व हिंदुधर्म संरक्षणाच्या संबंधात बोलणे झालेच असावे व समर्थांनी राजांना त्यांच्या कार्यात सुयश इच्छिले असणारच. ह्याचे कारण असे की दोघांच्याही कार्यांचा अखेरचा हेतू धर्मसंरक्षण, गोब्राह्मण प्रतिपालन व लोककल्याण हाच होता. राजे शिंगणवाडीस काही दिवस राहिले. राजांनी समर्थांना गुरूपदेश देण्याची विनंती केली. त्याप्रमाणे समर्थांनी तो दिला समर्थ राजांना म्हणाले, "धर्मस्थापना व देवब्राह्मण सेवा करावी. प्रजेची पीडा दूर करून तिचे रक्षण करावे. तुम्ही जे मनात धराल ते श्री पूर्ण करेल," हा उपदेश नम्रपणे स्वीकारून, राजे रायगडला परत आले समर्थांच्या भेटीमुळे राजांना आध्यात्मिक बळ व मानसिक समाधान लाभले. शिवाजी राजे व समर्थांचा हा संबंध ह्यापुढे अखेरपर्यंत राहिला समर्थांचे राजांकडे सतत लक्ष होते व ते त्यांना नेहमी सुयश इच्छीत होते.

अशी गुरूशिष्य जोडी इतिहासात मिळणे कठीण आहे. गुरू तपस्वी, निरिच्छ परंतु लोकांचे कष्ट नाहीसे व्हावे अशी तळमळ असलेला तर शिष्य राजर्षी, स्वतःच्या उपभोगासाठी कशाची इच्छा नसलेला परंतु सतत प्रजेच्या कल्याणाची तळमळ असलेला, धर्मसंरक्षक, शूर व सद्गुणी!

## पन्हाळगडचे युद्ध व बहलोलखानाशी सामना

शिवाजीराजांनी आता आपले लक्ष पन्हाळगडाकडे वळवले. हा गड पूर्वी स्वराज्यात आला होता पण सिद्दीजोहरने त्याला वेढा घातल्यानंतर, तो आदिलशाहाला द्यावा लागला होता. तो किल्ला आता स्वराज्यात आणण्याचे राजांनी ठरवले. ही कामगिरी अनाजीपंत सूरनीस ह्यांच्याकडे राजांनी सोपवली. अनाजीपंत स्वराज्याचे अनुभवी मुत्सद्दी व शूर लढवय्येही होते.

अनाजीपंतानी किल्ल्यावर अचानक छापा घालायचे ठरवले. त्या आधी त्यानी कोकणात 'राजापूर'ला जाऊन तेथून गडासंबंधी गुप्तपणे सर्व माहिती

मिळवायचे ठरवले. त्यानुसार ते फौजेसह राजापूरला गेले. तेथे दोन महिने राहून हेरांकडून सर्व माहिती मिळवली. अनाजींच्या मदतीसाठी राजांनी कोंडाजी फर्जंद नावाच्या धाडसी लढवय्यास, आणखी काही फौजेसह पाठवले. ६ मार्च १६७३ ला गडावर हल्ला करायचे ठरले. त्याप्रमाणे कोंडाजी केवळ साठ माणसे बरोबर घेऊन, अंधाऱ्या रात्री निघाला व किल्ल्याजवळ कष्टाने पोचला. अनाजीही आपल्या फौजेसह किल्ल्यापाशी पोचले होते. ते ठरल्याप्रमाणे, जंगलात लपून बसले. कोंडाजी व त्याचे सहकारी एका तुटलेल्या कड्याच्या बाजूने गडावर चढले! रात्र असल्यामुळे सर्वत्र सामसूम होती. एका मराठ्याने कर्ण्याने आवाज केला.

कर्ण्याचा आवाज ऐकून शत्रूकडील लोक जागे झाले. दोन्ही पक्षात जोराची लढाई जुंपली. कोंडाजी व त्याचे साठ लोक शत्रूवर तुटून पडले, लवकरच मुसलमान किल्लेदार मारला गेला. किल्ला मराठ्यांच्या हाती पडला. अनाजी-पंतही गडावर पोचले. विजयाची बातमी जासुदाच्या हाती राजांना पोचली. राजांनी आनंद होऊन जासुदाच्या तोंडात आपल्या हाताने साखर घातली! त्याला शंभर होन बक्षीस दिले. रायगडावरून विजयाच्या तोफा उडाल्या.

आठ दिवसांनी राजे प्रतापराव गुजरासह रायगडहून पन्हाळ्यास जाण्यास निघाले. वाटेत पाचाडला आईसाहेबांना पन्हाळगड सर झाल्याचे वृत्त सांगितले. त्यांनाही आनंद झाला. गडावर पोहचल्यावर राजांनी कोंडाजी व इतर लढवय्यांचे धनदौलत देऊन अभिनंदन केले. राजांनी डोळे भरून अनेक वर्षानंतर, गडाचे दर्शन घेतले!

पन्हाळगड मराठ्यांनी जिंकल्यामुळे आदिलशाहाच्या दरबारात खळबळ उडाली. दरबारने बहलोलखान नावाच्या सरदारास मराठ्यांचे विरुद्ध स्वारीवर पाठवले. त्याच्याबरोबर बारा हजार सैनिक होते. शिवाजी राजांनी प्रतापराव गुजरास बहलोलखानाचा सामना करण्यास पाठवले. पंधरा हजार फौज त्याच्या बरोबर दिली. त्याने बहलोलखानास उमारणी जवळ अचानक गाठले. तेथे खानाने छावणी ठोकली होती. प्रतापरावने खानाच्या लोकांस ज्या तळ्यातले पाणी पिण्यासाठी मिळत होते ते तळेच आपल्या ताब्यात घेतले! प्रतापरावाच्या सैन्याची व खानाच्या सैन्याची बराच वेळ निकराची लढाई झाली. परंतु पाणी तुटल्याने खानाची सेना शरण आली. प्रतापरावाने खानास क्षमा करून जाऊ दिले. ही घटना १५ एप्रिल १६७३ ला घडली.

खानास सोडल्याबद्दल राजे प्रतापरावावर खूप रागावले. त्यांनी पत्र पाठवून त्यास विचारले "काय कारणाने खानास सोडले?" प्रतापरावास आपली

चूक कळली. त्याची राजाकडे परत येण्याची हिंमत झाली नाही. तो हुबळी धारवाड कडे छापे घालत राहिला बहलोलखानही] परत गेला नव्हता. तो कोल्हापूर भागात सैन्याची जमवाजमव करून पराभवाचा सूड घेण्याची तयारी करत होता! पावसाळा संपल्यावर खानाने बंकापूर येथे मराठयांच्या तुकडीवर हल्ला केला. मराठयांचा पराभव झाला! हे समजल्यावर राजे रागावले. त्यांनी प्रतापरावास आज्ञा केली, "बहलोलखानाची गाठ घालून बुडवून फत्ते करणे. नाहीतर तर तोंड न दाखवणे!"

पत्रातील मजकुराने प्रतापरावास मोठी मानसिक इजा झाली. त्याला एरवीही खानाच्या त्याच्या कृतघ्नपणामुळे फार राग आला होता. खान ह्या वेळी एक खिंड ओलांडत होता. तेथे त्याला प्रतापरावाने गाठले. त्याचे सैन्य जरा दूर होते. वाट न पाहाता प्रतापराव बरोबरच्या केवळ सहा लोकासह बहलोलखानावर तुटून पडला! सातही माणसे विजेसारखी खानाच्या सैन्यात घुसली. त्यांनी सपासप वार केले, खानाचे काही लोक मेले. परंतु खानाच्या प्रचंड सेनेपुढे त्यांचा किती टिकाव लागणार! एक एक जण पडला. अखेर प्रतापरावही २४ फेब्रुवारी १६७४ रोजी पडला!

प्रतापराव पडल्यावर त्याच्या छावणीत असलेल्या आनंदराव सरदाराने पाहिले की एवढया मोठया सेनेशी तोंड देणे कठीण व व्यर्थ आहे. म्हणून त्याने आपले सैन्य एकत्र करून, कानडी भागात बहलोलची जहागीर होती तिच्यावर स्वारी केली. त्यामुळे खान कोल्हापूर सोडून तिकडे गेला. बंकापुराजवळ दोन्ही सैन्याची पुन्हा गाठ पडली. ह्या लढाईत खानास अखेर पळून जावे लागले. आनंदराव परत रायगडला मिरवत आला.

प्रतापराव सेनापतीचा मृत्यू झाल्यामुळे शिवाजी राजांना फार दुःख झाले. आपल्या पत्रातील बोचक मजकुरामुळे प्रतापरावाने आत्मबलिदान केले ह्या जाणीवेने राजांच्या मनाला क्लेश होत राहिले!

## शिवाजीराजांचा राज्याभिषेक

आतापर्यंत स्वराज्याचा विस्तार चारही दिशांना बराच झाला होता आता राजांना पूर्वीप्रमाणे पेंढारी, लुटारू, सह्याद्रीतला उंदीर वगैरे सारखी हीन विशेषणे लावण्याची कोणाला हिंमत होत नव्हती. कारण दक्षिणेतल्या सुलतानांनाच नव्हे तर औरंगजेबासारख्या हिंदुद्वेषी व गर्विष्ट बादशाहालाही शिवाजी एक स्वयंभू व स्वतंत्र राजा आहे हे मानणे भाग पडले होते. स्वतंत्र सैन्य, आरमार, किल्ले, अष्टप्रधान मंडळ, न्यायदान पद्धती ह्यासारखी स्वतंत्र राज्याची विविध अंगे स्वराज्याची आता होती. पण एक महत्त्वाची गोष्ट कमी होती.

राजांना स्वतंत्र राजा म्हणून रीतसर राज्याभिषेक झालेला नव्हता. शिवाजी-राजांना त्याची गरजही वाटली नाही, कारण स्वत:साठी काही हवे असे त्यांना वाटतच नव्हते! त्यांचे सर्व प्रयत्न प्रजेच्या कल्याणाकरता होते.

असे असले तरी राजांना राज्याभिषेक झाला पाहिजे असे काही विचारी व हिंदुधर्माभिमानी लोकांना वाटत होते. अशा लोकात महाराष्ट्रापासून दूर काशीत राहाणारे गागाभट्ट नावाने ओळखले जाणारे महाराष्ट्रीय पंडित होते. ते विद्वान होते व त्यांची प्रसिद्धी दूरवर पसरलेली होती. ते मूळचे महाराष्ट्रातल्या पैठण गावी राहाणारे. गागाभट्टापर्यंत स्वराज्याची माहिती पोचलेली होती. त्यामुळे गागाभट्टांचे दूरूनही राजांचेकडे लक्ष होते. त्यांना भेटण्याची व स्वराज्य स्वत:च्या डोळ्यांनी पहाण्याची भट्टांची खूप इच्छा होती. म्हणून ते एकदा नाशिकपर्यंत आले. ही गोष्ट राजांना समजली. राजांनी त्यांना सन्मानपूर्वक रायगडला आणले. ते काही दिवस तेथे राहिले. स्वराज्यासंबंधी त्यांनी जे काही पाहिले त्यामुळे गागाभट्टांचा राजांबद्दलचा अभिमान व आदर दुप्पट वाढला.

एके दिवशी भट्टांनी राज्याभिषेकाचा विषय राजांजवळ काढला. शास्त्रांचा संदर्भ देऊन राज्याभिषेकाचे महत्त्व राजांना त्यांनी पटवून दिले. अखेर राजांनी राज्याभिषेकास संमती दिली. हे पाहून जिजामातुश्रींना आनंद झाला. आपली आकांक्षा पूर्ण होणार म्हणून त्यांना समाधानाचे भरते आले. राज्याभिषेकाची वार्ता सर्वत्र पसरली. त्यामुळे वातावरण आनंदाने भरून गेले.

राज्याभिषेकाची तयारी सुरू झाली. अनेक शतकांनंतर हिंदूराजाला राज्याभिषेक समारंभ होणार होता. म्हणून त्याची अपूर्वाई होती. जो तो उत्साहाने कामाला लागला. राज्याभिषेकासाठी सोन्याचे सिंहासन घडवण्याची सुरूवात झाली. सर्व तयारीसाठी सहा महिने लागले. गागाभट्टांनी मुहूर्त पाहून ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी शनिवार, शके १५९६ (६ जून सन १६७४) हा दिवस राज्याभिषेकासाठी निश्चित केला. राज्याभिषेकाची निमंत्रणे गेली. निमंत्रित मंडळीत गाणारे, भाट, वादक, नृत्यांगना, ह्यांचाही समावेश होता. भारतातल्या सर्व मुख्य नद्यांची, तीर्थांची व समुद्रांची उदके राज्याभिषेकासाठी मागवली होती.

राज्याभिषेकाच्या निमित्त्याने गडाला एकाद्या शहराचे रूप आले होते. अनेक व्यापारी, हत्ती, घोडे, पालख्या, मेणे, कारागीर, कलावंत, वैरागी वगैरेमुळे गड फुलून गेला राजवाड्याशिवाय, राण्यांचे व प्रधानांचे महाल, राजसभा, महाद्वार, अधिकारी व नोकरवर्गाची घरे वगैरे इमारती उठून दिसत होत्या. गडाचा बहुतेक भाग त्यांनी झाकला होता.

राज्याभिषेक विधीच्यापूर्वी, राजांनी प्रतापगडला जाऊन कुलदेवता भवानी-देवीची पूजा केली. सव्वामण सोन्याचे छत्र देवीला अर्पण केले! चिपळूणच्या परशुरामाच्या मुर्तीचेही दर्शन त्यांनी घेतले.

राज्याभिषेकाच्या विधीला सुरूवात झाली. प्रथम महाद्वाराला तोरण बांधले गेले व गणपतीरायाची पूजा करून राज्याभिषेक निर्विघ्नपणे पार पडो अशी प्रार्थना करण्यात आली.

शिवाजी राजांची मुंज लहानपणी झाली नव्हती. मुंजीशिवाय झालेली लग्नेही शास्त्राला संमत नव्हती. म्हणून राजांची मुंज करण्यात आली नंतर त्यांचे त्यांच्या राण्यांशी लग्ने पुन: विधिपूर्वक लावण्यात आली!

४ जून रोजी राजांची सुवर्णतुला केली गेली. सतरा हजार होन तुलेला लागले. त्यात आणखी होन घालून राजांनी दान धर्म केला. इतर वस्तूंनीही तुला करून त्या वस्तूंचा दान धर्म केला. ६ जूनला पहाटे पांच वाजता राज्याभिषेकाचा मुहूर्त होता. आधीच्या दिवशी रात्रभर मशाली व चिरागदाने जळत होती. तो दिवस केव्हा गेला ते लोकांना समजले नाही.

६ तारखेस मोठ्या पहाटेस राजे उठले स्नान करून त्यांनी कुलदेवतेची पूजा केली. कुलगुरूंचीही केली. तोपर्यंत आप्तमंडळी, अष्टप्रधान, अधिकारी राजदूत, निमंत्रित पाहुणे वगैरे सर्व तयार होऊन आले. त्यांनी आपापल्या जागा घेतल्या.

वेळ होताच शिवाजीराजे, महाराणी सोयराबाईसाहेब व राजपुत्र संभाजी आले व सोन्याच्या चवरंगावर बसले. आठ दिशांना आठ प्रधान उभे राहिले. त्यांच्या हातात कलश होते. गागाभट्टांनी व इतर पंडितांनी मंत्रघोष सुरू केला. प्रधानांनी आपापल्या हातांतले कलश राजांच्या मस्तकावर ओतून रिकामे केले, त्यांत दुध, दही, तूप व मध ही द्रव्यें होती. नंतर समुद्राच्या व नद्यांच्या पाण्यांनी स्नाने घालण्यात आली. शेवटी ऊन पाण्याने स्नान झाले. नंतर सोळा सुवासिनींनी ओवाळले. तर राजांनी प्रथम तुपात व मग आरशात आपले प्रतिबिंब पाहिले. तिघानी मग उंची वस्त्र धारण केली व मौल्यवान अलंकार घातले. राजांनी आपल्या ढाल तलवारीची व धनुष्यबाणाची पूजा केली व ती आयुधे धारण केली. तिघांनी कुलदेवता, गागाभट्ट, राजोपाध्ये, आईसाहेब व वडील मंडळी ह्यांना नमस्कार केला. नंतर राजे राजसभेकडे निघाले.

भव्य राजसभा माणसांनी खच्चून भरली होती. महाद्वारावर नगारा वाजत होता द्वारावर दोन्ही बाजूंना दोन सजलेले हत्ती झुलत होते. द्वाराशी हातात सुवर्ण दंड घेऊन द्वारपाल उभे होते. सभामंदिर पडदे, झालरी, माळा, गाद्या,

गोंड, झुंबरे वगैरेंनी सुशोभित होते सभेत द्वारासमोर सोन्याच्या पत्र्याने मढव-लेला चवतरा उभारलेला होता. त्यावर आठ खांबाची सुंदर मंडपी उभारली होती. मंडपीत रत्नजडित सोन्याचे सिंहासन ठेवले होते! सिंहासनाच्या दोन्ही बाजूंस स्त्रियांची बसण्याची सोय केलेली होती. सिंहासनासमोर भाल्याच्या टोकावर सोन्याचा तराजू टांगला होता. त्याची दोन्ही पारडी सारख्या पातळीत होती. ती पारडी हे दर्शवत होती की स्वराज्यात सर्वांना सारखाच न्याय मिळेल.

राज्याभिषेकाची वेळ जवळ आली. शिवाजीराजे व अष्टप्रधान ह्यांनी राजसभेत प्रवेश केला. सर्वांचे लक्ष राजांचेवर खिळले होते. राजे सिंहासना-समोर उभे राहिले. त्यांनी एक गुढघा जमिनीवर टेकून, सिंहासनास वंदन केले. नंतर ते पूर्वेकडे तोंड करून उभे राहिले. पंडितांनी मंत्रघोष सुरू केला. सिंहा-सनाला पाऊल न लावता राजे त्यावर बसले. अष्टप्रधान आठ खांबाशी उभे राहिले. मंगल वाद्ये वाजू लागली, तोफा बंदुकांचे आवाज कडाडले. मागोमाग स्वराज्यांतल्या सर्व किल्ल्यावरून तोफा गरजल्या. उपस्थित लोकांनी राजांचेवर सोन्याची व सुगंधी फुले उधळली; "शिवाजी महाराजांचा जय असो" असा घोष केला प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले सोळा सुहासिनींनी व कुमारिकांनी राजांना ओवाळले. राजांनी त्यांना वस्त्रे व अलंकार दिले. नंतर स्वत: गागाभट्टांनी रत्नजडित छत्र राजांच्या डोक्यावर धरले व घोषणा केली की महाराज आज छत्रपती झाले. शास्त्री पंडितांनी महाराजांना शुभाशिर्वाद दिले. त्यांनी नत मस्तकाने ते स्वीकारले. (आता शिवाजीराजांचा उल्लेख महाराज असा करू या)

नंतर नजराणे अर्पण करण्याचा कार्यक्रम झाला. नजराणे अर्पण करणारात इंग्रजांचा हेन्री ऑक्झेंडन नांवाचा वकीलही होता. तो ह्या समारंभासाठी मुद्दाम रायगडला आला होता! त्याने १६५० रुपये नजराणा महाराजांस दिला. त्याने एक सुंदर खुर्चीही महाराजांना बक्षीस दिली. महाराजांनीही सर्वांना मानाची वस्त्रे दिली.

ह्या कार्यक्रमानंतर महाराज अंबारीतून देवदर्शनास गेले. सरसेनापती हत्ती चालवत होते. वाद्ये वाजत होती. भगवा ध्वज ऐटीने मिरवणुकीत फडकत होता. सुवर्णदंड हातात घेतलेले खास बारदार महाराजांचे नाव ललकारत होते. गडावर देवतांची दर्शन घेऊन महाराज सभाद्वारी परत आले. तेथे स्त्रियांनी त्यांच्यावरून निंबलोण उतरले. नंतर महाराजांनी आईसाहेबांना वंदन केले.

दुपारी समारंभासाठी आलेल्या मंडळींना निरोपाचे विडे देण्यात आले. मग महाराज आईसाहेबांचे जवळ जाऊन बसले. ते त्यांना गहिंवरून म्हणाले, "आपल्या आशीर्वादाने आमचे मनोरथ सिद्धीस गेले." महाराजांनी आईसाहेबांना वस्त्रे अर्पण केली. अशा प्रकारे राज्यारोहणाचा समारंभ पार पडला. ह्यामुळे स्वराज्यांत सर्वत्र आनंदाचे वातावरण पसरले.

राज्याभिषेकाची आठवण म्हणून महाराजांनी 'राज्याभिषेक' नावाचा शक सुरू केला. अष्टप्रधानांच्या हुद्यांची नावे फारशी भाषेतली होती, त्यांच्या जागी संस्कृत भाषेतले शब्द वापरात आणले. अशा शब्दांचा कोष तयार करण्याचे काम महाराजांनी रघुनाथ पंडिताना सांगितले.

राज्याभिषेकासाठी गडावर आलेल्या निमंत्रित ब्राह्मणपंडितांना महाराजांनी भरपूर दक्षिणा दिली. गागाभट्टांना एक लाख दक्षिणा देऊन वस्त्रे व अलंकार दिले. त्यांना प्रेमाने निरोप दिला. सर्व प्रधान, सरदार, इतर अधिकारी



**राज्याभिषेकाच्या प्रसंगी इंग्रजाच्या वकिलाने महाराजांना अभिवादन केले**

नोकरवर्ग, ह्यांपैकी सर्वांना योग्यतेप्रमाणे देणग्या दिल्या. कलावंतांचीही योग्य विदागी देऊन पाठवणी केली. संन्यासी, गोसावी, गोर गरीब सर्वांना ह्या निमित्ताने महाराजांनी दानधर्म केला. राज्याभिषेकाप्रीत्यर्थ पन्नास लक्ष रुपये खर्च आला असा अंदाज आहे.

आग्र्याच्या बंदीवासात आपल्यासाठी प्राण पणास लावणाऱ्या मदारी मेहतरास महाराजांनी विचारले, "तुला काय देऊ?" मदारीने उत्तर दिले, सिंहासनावर चादर घालण्याचे काम मला द्या!" त्यांने मोठी नोकरी, जमीन, घर दार काही न मागता हे काम मागितले! काय ही मदारीची निरपेक्ष स्वामीनिष्ठा! मदारी इतिहासात अजरामर झाला.

राज्याभिषेकामुळे महाराष्ट्रात स्वतंत्र हिंदू छत्रपतीचे सिंहासन निर्माण झाले. पुढे अटकेपार पसरणाऱ्या हिंदवी साम्राज्याचे बीज रोवले गेले!

## जिजाबाईंचा मृत्यु. कर्नाटक मोहीम

राज्याभिषेकाचा सोहळा आटोपल्यावर काही दिवसांनी आईसाहेब रायगडाच्या खाली काही अंतरावर असलेल्या 'पाचाड'च्या राजवाड्यात राहायला गेल्या. ह्याचे कारण हे की त्यांना गडावरची हवा मानवत नव्हती. तेथे परत गेल्यावर लवकरच त्यांची प्रकृती बिघडली. म्हातारपण झालेच होते, अंगात शक्ती राहिली नव्हती. आजार वाढत गेला औषधपाण्याला काय कमी होते? छत्रपती राजांची आई ती! अखेरीस मृत्यूने त्यांना गाठले! १७ जून १६७४ हा तो दिवस होता. आईच्या मृत्यूमुळे आपल्या पायाखालची भूमीच नाहीशी झाल्यासारखे महाराजांना वाटले! आईसाहेब हा त्यांना जन्मभर मोठा आधार होता. तो गेला. आता आपल्या जिव्हाळ्याच्या दोन गोष्टी सांगणारे व सल्ला देणारे वडील मनुष्य कोणी राहिले नाही ही गोष्ट जाणवली. महाराजांनी आईसाहेबांची समाधी पाचाडला बांधली. त्यांची क्रिया महाराजांनी यथासांग केली हे सांगायला नकोच.

पावसाळ्याचे तीन महिने गेले. शिवाजी महाराजांनी ऑक्टोबरात खानदेशावर स्वारी केली. धरणगाव येथे असलेली इंग्रजांची वखार त्यांनी लुटली, महाराजांनी पुढे बऱ्हाणपूरपर्यंत धडक मारली. त्यांनी ह्या भागातून सिंहासन पट्टी नावाचा कर वसुल केला व रायगडला ते परत आले.

वरील मोहीमेवर जाण्यापूर्वी महाराजांनी संभाजींची मुंज करवली.

सन १६७५ च्या आरंभी महाराजास मोगलसुभेदार बहादूरखान आपल्यावर चढाई करणार असल्याचे कळले होते. म्हणून त्याच्याशी तहाचे बोलणे त्यांनी सुरू केले. महाराजांना त्याच वेळी कोल्हापूर–फोंड्याकडे मोहीम काढायची होती. एकाच वेळी दोन शत्रूशी लढावे लागू नये हा तहाचा खरा हेतु होता. बहादूरखानाने तहाची विनंती बादशाहाकडे मंजुरीसाठी पाठवली व ती मंजूर झाली.

बहादूरखानाने बादशाहाची मंजुरी शिवाजीमहाराजांना वकीलाच्या हाती कळवली मध्यंतरीच्या काळात महाराजांची फोंड्याकडची मोहीम संपली होती.

काही दिवसांच्या लढाईनंतर फोंड्याचा किल्ला मराठ्यांना मिळाला होता. कोल्हापूरही मिळाले होते. फोंड्याच्या लढाईनंतर महाराजांनी अकोल्यापासून कारवारपर्यंतचा भाग काबीज केला होता. महाराजांनी वकीलाचे म्हणणं ऐकून घेतले. फोंड्याकडची मोहीम संपलेली असल्यामुळे आता तहाची गरज नव्हती, म्हणून महाराजांनी वकीलास विचारले, "आम्ही तह करावा असा खानसाहेबांनी कोणचा पराक्रम गाजवला आहे? तुम्ही लगेच निघून जा, नाहीतर अपमान होईल!" वकील थक्क होऊन निमूटपणे निघून गेला! पुढे बादशाहास हे सर्व कळल्यावर तो खानावर फार रागावला. बिचारा खान!

सन १६७६ च्या आरंभी महाराज सातारा येथे, आजारी पडले. बराच ताप येत होता. ते एक महिना आजारी होते. कोणीतरी ते वारल्याची अफवाही पसरवली! ती मुंबईपर्यंत पोचली होती. त्यांना विषप्रयोग केल्याचीही अफवा पसरली. परंतु ह्या सर्व अफवा खोट्या ठरल्या व महाराज बरे झाले.

### नेताजी पालकराचे शुद्धीकरण

स्वराज्याचा पूर्वीचा सेनापती नेताजी पालकर महाराजांस सोडून गेला होता. तो पुढे जयसिंगाच्या मोगली सैन्यात नोकरीला होता. शिवाजीमहाराज आग्र्याहून निसटले तेव्हा त्यांच्यावरील रागामुळे औरंगजेबाने नेताजीला पकडून दिल्लीस पाठवण्याचा हुकूम केला होता. त्याप्रमाणे जयसिंगाने त्याला पकडून बादशाहाकडे रवाना केले होते. तेथे त्याला अखेर इस्लाम धर्म स्वीकारावा लागला होता. नाहीतर त्याला आपले प्राण गमवावे लागले असते. नेताजीचे नवे नांव 'महम्मद कुलीखान' असे ठेवण्यात आले होते.

पुढे सन १६७६ मध्ये औरंगजेबाने दिलेरखानास मराठ्यांना पायबंद घालण्यासाठी दक्षिणेत पाठवले त्याच्याबरोबर नेताजीसही पाठवले कारण त्याला महाराष्ट्रातली बारीक सारीक माहिती होती. नेताजीला आयतीच स्वप्रांतात येण्याची संधी मिळाली नेताजी अशा संधीची वाट पाहातच होता.

मोगल फौज दक्षिणेकडे येत असताना नेताजी केव्हातरी सटकला व रायगडला पोचला! तो शिवाजी महाराजांना भेटला. महाराजांचा नेताजीबद्दलचा राग आता शांत झाला होता. नेताजीची निष्ठा अस्सल होती ह्याबद्दल महाराजांची खात्री होती नेताजी जबरदस्तीमुळे मुसलमान झाला होता हेही महाराजांना ठाऊक होते. नेताजीचीही हिंदू होण्याची इच्छा होती. १९ जून १६७६ रोजी महाराजांनी विधिपूर्वक नेताजीला हिंदू करवून घेतले. महाराजांचा धार्मिक दृष्टीकोन किती व्यापक होता हे ह्यावरून स्पष्ट होते.

## समर्थ रामदास सज्जनगडावर जातात

महाबळेश्वरच्या जवळ वाई नावाचे हिंदूंचे पवित्र क्षेत्र आहे. हे संस्कृत विद्येसाठी पूर्वीपासून प्रसिद्ध आहे. येथे अनेक विद्वान ब्राह्मण राहात. हे गाव अद्याप यावनी सत्तेखाली होते. महाराजांना ही गोष्ट बरेच दिवसांपासून बोचत होती. त्यांनी वाईवर स्वारी करून लवकरच ते गाव स्वराज्यात आणले. ह्यामुळे धर्मनिष्ठ व संस्कृताभिमानी लोकांनी महाराजांना दुआ दिला.

समर्थ रामदासांना महाराज आपले गुरु मानत. समर्थ आता थकले होते. ते शिवथरच्या घळीत (गुहेत) राहून तपश्चर्या करत. फक्त पोटापुरती भिक्षा मागून श्रीरामाची उपासना करावी असा समर्थांचा शिष्यांना आदेश होता. स्वत: आपणही त्याचप्रमाणे वागत.

आपल्या गुरूंनी इतक्या एकांतात न राहाता आपल्या एकाद्या गडावर राहावे अशी महाराजांची इच्छा होती. त्यांनी समर्थांना तशी विनंती केली. समर्थांनी ती मानली. ते सज्जनगडावर राहावयास गेले. महाराजांनी गडकऱ्यास स्वामींची सर्व व्यवस्था चांगली ठेवण्याची आज्ञा केली.

महाराजांच्या महान कार्यामुळे व त्यांच्या सद्‌गुणांमुळे समर्थ त्यांच्यावर अत्यंत संतुष्ट होते. ते महाराजांना नेहमी दीर्घायुष्य व यश चिंतीत. समर्थ भवानी देवीला स्वत:साठी काही मागत नसत. ते राजांसाठी काय मागत ते पहा. ते देवीला प्रार्थना करत, "येकची मागणे आता । द्यावे ते मजकारणे । तुझा तू वाढवी राजा । शीघ्र आम्हासी देखता ।।" समर्थांचे महाराजांवर केवढे हे प्रेम!

## स्वराज्याचा दक्षिण भारतात विस्तार

शहाजींच्या मृत्यूनंतर, कर्नाटकातल्या बंगळूर जहागिरीचा कारभार व्यंकोजी उर्फ एकोजी हे शिवाजी महाराजांचे सावत्र भाऊ करत होते. आदिलशाहाच्या हुकुमावरुन त्यांनी तंजावरचे राज्यही काबीज केले होते. तेथील सिंहासनावरही ते सन १६७६ साली बसले होते. एकोजी आदिलशाहाच्या नोकरीतही होते. एकोजीकडे रघुनाथपंत हणमंते व त्यांचे धाकटे बंधू नोकरीत होते. रघुनाथपंत तर एकोजींचे कारभारी होते. परंतु दोघांचे काहीतरी बिघडले. तेव्हा रघुनाथपंत शिवाजी महाराजांकडे सन १६७६ च्या आरंभी कर्नाटकाचे काही राजकारण करण्याच्या हेतूने आले होते. ते रायगडला काही दिवस होते. तेथे महाराजांचे व रघुनाथपंताचे पेशव्यांच्या सल्ल्याने बरेच बोलणे झाले होते. रघुनाथपंतांची महाराजांना अशी सूचना होती की त्यांनी कर्नाटकाची मोहीम करावी. तसे केल्यास त्यांना यश येण्यासारखी तेथे परिस्थिती आहे असे पंतांना वाटत होते.

2958

घुसले परंतु ते खानाच्या लोकांनी पाहिले होते. त्यांनी संभाजींना केस धरून ओढत आणले व खानापुढे उभे केले. ह्या लढाईत मल्होजी घोरपडे मारला गेला.

मुकर्रबखानाने संभाजींची व कवि कलशची शस्त्रे काढून घेतली. नंतर त्यांना आपल्यामागे हत्तीवर बसवले व तो कोल्हापूरकडे जाण्यास निघाला. संभाजींना व कवि कलशला आपण पकडल्याची व त्यांना घेऊन येत असल्याची खबर खानाने औरंगजेबास पाठवली. ती ऐकून औरंगजेबाचा आनंद गगनात मावेनासा झाला. त्याने बडू बुद्रूक येथे स्वत: येऊन खानाचे अभिनंदन केले.

स्वराज्याचा स्वामी दुर्दैवाने मोगलांच्या पिंजऱ्यात सापडला होता. औरंगजेबासारख्या धर्मवेड्या राक्षसाशी गाठ होती. संभाजींची आता धडगत नव्हती. त्यांची व कवि कलशची उंटावरून धिंड काढण्यात आली. नंतर औरंगजेबापुढे त्यांना उभे करण्यात आले. औरंगजेब बैठकीवरून खाली उतरला. त्याने अल्लाची प्रार्थना केली. नंतर तो संभाजीस म्हणाला, "तू विचार कर व जीवदान माग. एकाच अटीवर मी तुला जीवदान देईन. ती अट ही की तू इस्लाम धर्म स्वीकारला पाहिजे."

संभाजींनी बाणेदारपणाने उत्तर दिले, 'तुझ्यात खरे शौर्य असते तर तू मला रणांगणावर समोरा समोर सामना देऊन पकडले असतेस. कपट हेच तुझे खरे भांडवल आहे. मला प्राणापेक्षाही माझा धर्म प्रिय आहे मी कदापि स्वधर्म सोडणार नाही!" औरंगजेबाने संतापून हुकूम दिला, "ह्या बंडखोर काफिराची जीभ मुळापासून उपटा, डोळे काढा, प्रत्येक दिवशी एकेक अवयव छाटा व शेवटी शिरच्छेद करा!" संभाजीराजांनी हे सर्व शांतपणे ऐकून घेतले. त्यांनी आपल्या प्राणांवर केव्हांच तुळशीपत्र ठेवले होते.

हुकुमाची अम्मलबजावणी सुरू झाली. डोळे फोडले गेले, जीभ उपटली गेली व शेवटी ११ मार्च १६८९ रोजी बडू बुद्रूक येथे संभाजीराजे व कवि कलश ह्यांचा शिरच्छेद केला गेला काय ही संभाजी राजांची अभूतपूर्व स्वधर्मनिष्ठा! त्यांचा एकेक अवयव छाटला जात असताना त्यांना विचारले जात असावे, "आतातरी विचार कर आपला धर्म सोडून इस्लाम धर्मात येतोस! आणि संभाजी धीरगंभीरपणे उत्तर देत असावे कदापि नाही, कदापि नाही!" अखेरीस परधर्म द्वेष्टया औरंगजेबालाच पराभव पत्करावा लागला. संभाजीराजे इतिहासात आपल्या शौर्याचे व धैर्याने अजरामर झाले.

2958

"....छत्रपती शिवाजी एक निशानी - एक नमुना - देशकी स्वतंत्रताकें लिए लढनेका, उसको हांसील करनेका। वे स्वतंत्रता चहाते थे। उनमे देशका—और देश मैं कहता हूं याद रखीये कीं खाली देशका कोई भाग नहीं, कोई हिस्सा नहीं। वे बडे भारी महाराष्ट्रके पुरुष थे लेकीन उससे भी अधिक वे भारतके बडे भारी पुरुष थे। तो वे जो स्वतंत्रता चाहते थे, वों भारतकी स्वतंत्रता बल्की पूरे देशकी। और एक भारतके इतिहासमे एक नया अध्याय शुरू हुआ और देशने कर्वट ली, उनके जमाने से। . . . ."

"इस वीर पुरुषने, जिसने हिन्दुस्थानको जगाया, उठाया और जिसने बुनियाद डाली स्वतंत्र भारतकी। उसकी मूर्तीको देखके, मूर्ती तो याद रहें चाहें नही, उसके गुणको बढाना है, और उससे अपने शरीरको, अपने दिमाखको एक मजबूत करना है, ताके जो अब हमारी बडी यात्रा है स्वतंत्रताकें बाद देशको बढाना, जनताको उठाना और देशकी जनताकी सेवा करना और सारे सारे दुनियाकी जनताकी सेवा करना। उसमें मजबूतीसे हम कर सकें और उचें सिद्धांतको। लेकीन जो भी कुछ करे याद रखें, देशकी एकता एक असल चीज है। वो चली गई तो और सब बातें आप इस समय याद करें और जब जब आप इस पुराने नागपूर शहरमे इधर उधर फिरें और दूरसे देखें इस मूर्तीको छत्रपतीकी तो इस बातको याद किजीये की उनकी निगाहें आपपर है, और आपके आंखोमे देखती है और आपके दिलको टटोलती है, कीं कहांतक आप—उन्होने एक यात्रा शूरु कियी थी हमारी देशके तरफसे—कहांतक आप उस रास्तेपर चलें है की आप भूल गये उस बातको और इधर उधर भटक रहे। यह आंख आपके उपर होगीं, और खाली आपको उपर नहीं सारे देशके उपर होगी।"

"इस देशके सब लोग आगे बढे और इस यात्राके एक नये, नयी यात्रा को भीं पुरा करें। तो इन सब बातोंके करनेमे छत्रपति शिवाजी महाराजकी याद एक जबरदस्त याद है। एक ताकद देनेवाली, हिंमत देनेवाली याद है और वो आपको, हमको और देशको मुबारक हो। जय हिन्द !"

● ६।१।१९५९ रोजी शिवराज प्रेसवर छत्रपती शिवाजीमहाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण प्रसंगी पंडित जवाहरलाल नेहरूंनी केलेल्या भाषणातून ●

७०/रि.....

BVBK-0402154